




गुन्हेगारीचा कर्दनकाळ

# क्राईम संध्या

Tread Mark

संपादक : लक्ष्मणराव पाटोळे

वर्ष : १३ अंक : ३८ सोमवार दि. २९ सप्टेंबर २०२५ ते रविवार दि. ५ ऑक्टोंबर २०२५ पाने : ८ किंमत : ५/- रुपये

www.crimesandhya.com महाराष्ट्रातील १४ जिल्ह्यांत वितरीत होणारे साप्ताहीक crimesandhyavasai@gmail.com

ठाणे ■ पालघर ■ मुंबई ■ जळगाव ■ नाशिक ■ धुळे ■ बिड ■ परभणी ■ पुणे ■ संभाजीनगर ■ लातूर ■ धाराशिव ■ सोलापूर ■ नांदेड



|| जय माता जी ||



|| माता बारोंडादेवी प्रसन्न ||


## ‘माता न तू वैरीणी’ इतकी कशी कठोर झाली मुलगी रडली म्हणून तिची निर्घृण हत्या केली

रत्नागिरी : क्राईम रिपोर्टर

मुलाला ९ महिने उदरात वाढवणारी त्यानंतर त्याच पालनपोषण करून त्याला लहानाचे मोठे करणाऱ्या आईला साक्षात देवी मानतात. कारण जिच्या हाती पाळण्याची दोरी ती जगाला उद्धरी असे म्हणतात ते काही खोटे नाही. आई ही वात्सल्याची मूर्ती असते त्यामुळे मुलाने किती जरी चुका केल्या तरी त्या पोटात घालण्याचे काम करून आई सतत मुलाची पाठराखण करीत असते. त्यामुळेच माणूस आईला विसरू शकत नाही. आईच्या उपकाराची कशानेही परतफेड करता येत नाही. पण दुर्दैवाने आज लोकांची मानसिकता बदलली आहे. त्यामुळे लोकांना नात्यागोत्याचा विसर पडतो. जशी मुलांना आईच्या उपकाराची जाणीव रहात नाही. तशाच प्रकारे आजकाल काही निष्ठूर मातांना मुलांच्या प्रति असलेल्या जबाबदारीची जाणीव राहिलेली नाही. आईने मुलांच्या समोर आदर्श निर्माण करायचा असतो मुलांवर चांगले संस्कार करायचे असतात. पण जिथे आईवरच तिच्या आईवडिलांनी चांगले संस्कार केलेले नसतात तिथे ती आपल्या मुलांना काय वळण लावणार? आणि आजकालच्या मातांमध्ये मुलनप्रती असलेले प्रेम, वात्सल्य पूर्वीसारखे राहिलेले नसल्याने स्वतःच्या स्वार्थासाठी काही माता आपल्या मुलांचा जीव घ्यायलाही मागेपुढे पाहत नाहीत. मुलांच्या चुकांचा किंवा वाईट वागण्याचा आईला किती जरी त्रास झाला तरी आई तो त्रास सहन करीत असे पण आता मात्र मुलांचा त्रास सहन करण्याइतकी मानता आणि वात्सल्य आई मध्ये राहिलेले नाही. त्याचेच एक भयंकर उदाहरण रत्नागिरीच्या कुवरगाव पारसनगर भागात समोर आले आहे. मुलगी सतत रडते म्हणून आईने तिच्या तोंडांत बोळा कोंबून तिची हत्या केली या प्रकरणी कैदासीन ठरलेल्या त्या आईला पोलिसांनी अटक केली आहे.



कोकणात अलीकडे रत्नागिरी जिल्ह्यात जन्मदात्या मुलाने आईची हत्या केल्याचा धक्कादायक घटना ताजी असताना आता जन्मदात्या आईनेच आपल्या पोटच्या मुलीची हत्या केल्याची घटना समोर आली आहे. आठ महिन्यांच्या मुलीचा तोंडात बोळा कोंबून खून केल्याची मन हेलावून टाकणारी दुर्दैवी, संतापजनक घटना घडली आहे. रत्नागिरी कारवांचीवाडी परिसरात हा धक्कादायक प्रकार बुधवारी सायंकाळीच्या सुमारास घडला आहे. ही महिला मूळची चिपळूण तालुक्यातील आलोरे येथील आहे. शाहीन आसिफ नाईक (३५, चिपळूण अलोरे) असं या जन्मदात्या आईचं नाव आहे. या सगळ्या घटनेने अवघा जिल्हा हादरला आहे. दरम्यान या महिलेने आपली आठ महिन्याची मुलगी रडत होती म्हणून तिचा खून केल्याची प्राथमिक माहिती पोलिसांना मिळाली आहे. ती सारखी रडत आहे म्हणून तिचा तोंडात बोळा कोंबून हत्या केल्याची प्राथमिक माहिती पोलीस तपासात समोर आली आहे. या घटनेनंतर त्यांनी आपल्या बहिणीला फोन करून मी तिला झोपवल्याचे सांगितलं, मात्र दवाखान्यात गेल्यानंतर तिच्या बहिणींना घरच्यांना संशय आला, त्यानंतर हा सगळा धक्कादायक प्रकार समोर आला. ही महिला रत्नागिरी येथे आपल्या माहेरी आली होती तिचे पती नोकरी व्यवसायानिमित्त परदेशी असतात. रत्नागिरी कारवांचीवाडी पारस नगर या परिसरात सध्या वास्तव्य असलेल्या या महिलेने अत्यंत क्रूरपणे, निर्दयीपणे या मुलीची खून केला आहे. हुरेन असिफ नाईक (वय ८ महिने, रा. अलोरे, चिपळूण) असं या मृत मुलीचं नाव आहे. या हत्येमागील नेमकं कारण अद्याप समजू शकलेलं नाही. या धक्कादायक घटनेने ...पान २ वर

## दुसरा नवरा केला तोही अखेर अवगुणी ठरला चारित्र्याच्या संशयावरून पत्नीचा गळा चिरला



बंगळुरू : क्राईम रिपोर्टर

कोणत्याही माणसाने किती जरी प्रयत्न केले तरी त्याला नशिबाच्या पुढे जात येत नाही. जे नशिबात असते ते घडते. चन्नरायपट्टणम येथे राहणाऱ्या रेखाच्या बाबतीत असेच घडले. पहिला नवरा चांगला नव्हता म्हणून तिने दुसरे लग्न केले, पण तोही दारूडा निघाला. तसेच तिच्या चारित्र्यावर संशय घेऊ लागला. त्यावरून दोघांची भांडणे होऊ लागली आणि एक दिवस रागाच्या भरात त्याने रेखाची हत्या केली. या प्रकरणी पोलिसांनी तिच्या पतीला अटक केली असून पुढील तपास पोलीस करीत आहेत.

हसन जिल्हयातील चन्नरायपट्टणम येथील रेखाचा विवाह गेल्या काही वर्षांपूर्वी एका तरूणाशी झाला. त्याच्यापासून तिला दोन मुली झाल्या. सध्या एक मुलगी १३ वर्षाची तर दुसरी मुलगी ९ वर्षाची आहे. रेखाचे तिच्या नवऱ्यासोबत पटत नसल्याने काही वर्ष ती त्याच्या पासून वेगळे राहू लागली. नंतर तिने त्याच्यापासून घटस्फोट घेतला आणि आपल्या दोन्ही मुलीचा सांभाळ करू लागली. या दरम्यान तिचे परत दुसऱ्या तरूणासोबत म्हणजे लोहितश्वर बरोबर सुत जमले. त्याच्याबरोबर ती गेल्या दिड दोन वर्षापासून प्रेमसंबंधात होती. लोहितश्वर हा बंगळूरू जवळील सिरा येथे राहयला होता. त्याचे ही पहिले लग्न झाले होते, परंतु त्याची बायको त्याला सोडून गेल्याने तो एकटाच राहत होता. रेखाबरोबर त्याचे प्रेम संबंध असल्याने तिने त्याच्यासमोर लग्नाचा प्रस्ताव ठेवला. तो ही बायकोला सोडून एकटाच राहत असल्याने आणि तिचा ही पहिल्या नवऱ्याबरोबर घटस्फोट झाला असल्याने दोघांना ही एकमेकांच्या आधाराची गरज होते. या गरजेतूनच ते दोघे एकत्र आले होते. लग्न करण्यापूर्वी रेखाने त्याला स्पष्ट सांगितले होते की, तिची मोठी मुलगी ही तिच्यासोबतच राहिल तर दुसरी लहान मुलगी ही ती चन्नरायपट्टणम येथील तिच्या आई वडिलाकडे राहिल. लोहितश्वरला हा प्रस्ताव पटल्याने त्याने लग्नाला होकार दिला. त्या दोघांनी गेल्या तीन महिन्यापूर्वी प्रेमविवाह केला. आता ती आपली १३ वर्षाची मोठी मुलगी सोबत सिरा येथे लोहितश्वर याच्याबरोबर राहू लागली. त्याच्या लग्नाला जेमतेम तीन महिने झाले असतील तोच लोहितश्वर हा रेखाच्या चारित्र्यावर संशय घेऊ लागला. या कारणातून तो रोज रेखाबरोबर भांडण काढून तिला मारहाण करू लागला. लग्नाआधी तो काही तरी कामधंदा करीत होता, परंतु लग्नानंतर तो काहीच काम करीत नव्हता. म्हणून रेखाने एका कॉल सेंटरमध्ये नोकरी पत्करली. ती रोज सकाळी लवकर कामावर जात होती, परंतु कॉल सेंटरचे कामाला वेळेचे बंधन नसल्याने तिला घरी यायला उशिरा होत होता. नेमके हाच धागा पकडून लोहितश्वर हा तिच्या चारित्र्यावर संशय घेत तुझे दुसऱ्या पुरूषासोबत अफेयर चालू आहे तु त्याच्या सोबतच जातेस असे म्हरून तो तिचा शारिरीक आणि मानसिक छळ ...पान २ वर

## पत्नी आणि मुलानेच घात केला कौटुंबिक वादात हवालदार मेला

मुंबई : क्राईम रिपोर्टर

कौटुंबिक वाद कधी कधी इतक्या टोकाला जातात कि रागाच्या भरात माणसाला रक्ताच्या नात्याचे सुद्धा भान राहत नाही. आजवर अशा वादातून बापाने मुलाची किंवा भावाने भावाची पटीने पत्नीची हत्या केल्याच्या घटना घडलेल्या आहेत. मुंबईत अशाच एका घटनेत कौटुंबिक वादातून पोलीस हवालदाराला त्याच्या पत्नी व मुलाने मारून टाकले आणि अपघाताचा बनाव केला, परंतु पोलिसांनी त्यांचा हा बनाव हणून पाडला व दोघींना अटक केली आहे.

मुंबई पोलिस दलातील पोलिस हवालदाराच्या पत्नी आणि मुलालाच पोलिसाच्या मृत्यू प्रकरणी अटक करण्यात आली आहे. प्रवीण शालीग्राम सुर्यवंशी असे या मृत पोलिसाचे नाव आहे. मे महिन्यात प्रतिक्षानगर पोलिस अधिकारी वसाहत, सायन पूर्व येथे प्रवीण यांचे पत्नी स्मिता आणि मुलगा प्रतिक यांच्यासोबत कौटुंबिक वाद झाला होता, या वादातून दोघांनी प्रवीण सुर्यवंशी यांना खोलीतील खिडकीच्या काचेवर ढकलून दिले. यावेळी खिडकीची काचांनी प्रवीण यांच्या उजव्या हाताच्या नसा खोलवर कापल्या गेल्या, डोक्यालाही गंभीर जखमा झाल्या होत्या. त्यावेळी प्रवीण यांना उपचारासाठी तात्काळ दवाखान्यात नेहणं अपेक्षित असताना दोघांनी वैद्यकिय उपचारासाठी नेले नाही. त्यावेळी प्रवीणच्या शरीरातून मोठ्या प्रमाणात रक्तस्त्राव झाल्याने त्याचा जागीच मृत्यू झाला. या प्रकरणी सुरूवातीला वडाळा टीटी पोलिस ठाण्यात अपमृत्यूची नोंद ...पान २ वर

## स्त्यावर झालेला वाद प्राणावर बेतला आरटीआय कार्यकर्त्याचा जीव घेतला

लातूर : क्राईम रिपोर्टर



आजकाल प्रत्येक माणसाला इगो असतो आणि त्याचा इगो दुखावला कि मग समोरचा माणूस कोण आहे याची तो पर्वा करीत नाही. लातूरमध्ये रस्त्यावर आर्टिका कारने क्रुझर कारला कट मारल्याच्या वादातून आरटीआय कार्यकर्त्याची हत्या करण्यात आली होती. तसेच त्याच्या सोबत असलेल्या महिलेलाही जखमी कारण्यातबा आले होते. या प्रकरणाचा छडा लावण्यात पोलिसांना यश आले असून या प्रकरणातील आरोपींना अटक करण्यात आली आहे. रस्त्यावर गाड्या चालवणाऱ्या वाहन चालकांमध्ये ओव्हरटेक करण्यावरून किंवा गाडीला कट मारण्यावरून छोटे मोठे वाद होतात. मात्र अशाच वादातून एका सामाजिक कार्यकर्त्याची हत्या होण्याची घटना चिंताजनक होती. पण दोन्ही गाड्यांमधील लोक प्यायलेले असल्याचे समजते. त्यामुळेच तू मोठा की मी मोठा असा इश्यू झाला आणि त्यातूनच एकाला आपला जीव गमवावा लागला म्हणूनच कुणी इगो बाळगू नये. इगोमुळे माणूस स्वतःवरचे नियंत्रण हरवून बसतो आणि त्यातून अशा घटना घडतात.






लातूर शहरातील पीव्हीआर चौकापासून बार्शी रोड लगत असलेल्या प्रणवश्री मंगल कार्यालयामध्ये अखिल भारतीय भ्रष्टाचार निर्मूलन संघर्ष समिती एवम ब्रिक्स मानव अधिकार मिशन च्या वतीने १७ आणि १८ सप्टेंबर २०२५ रोजी मराठवाडा मुक्ती संग्राम सोहळा आणि राष्ट्रीय अधिवेशन आयोजित करण्यात आले होते. याबाबतची माहिती अखिल भारतीय भ्रष्टाचार निर्मूलन संघर्ष समितीचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रदीप पाटील खंडापूरकर यांनी एका पत्रकातून प्रसिद्ध केली होती. या अधिवेशनासाठी राज्यातील आणि परराज्यातील ...पान २ वर

## कुटुंब कंटाळले होते दारुड्यांच्या छळा मुलाने चिरला वडील व आजोबांचा गळा

मुंबई : क्राईम रिपोर्टर

दारुडी माणसे कुटुंबासाठी तापदायक असतात. मात्र तरीही नाती जपताना कुटुंबातील लोक त्याचा त्रास सहन करीत असतात. पण शेवटी माणसाच्या सहनशीलतेला सुधा मर्यादा असतात. त्रास वाढला की माणूस नात्यागोत्याचा जराही विचार करीत नाही. मुंबईतील अंधेरीच्या एमआयडीसी भागात अशीच एक भयंकर घटना घडली आहे. अशीच एक या ठिकाणी वडील आणि आजोबा रोज दारू पिऊन भांडण करायचे त्याचा कुटुंबातील लोकांना त्रास होण्याचा मुलाने रागाच्या भरात वडील आणि आजोबाचा गळा चिरून दोघांची हत्या केली. या प्रकरणी आरोपी मुलाला अटक केली आहे.

मंगळवारी रात्री एमआयडीसी येथील घरी एका २३ वर्षीय तरुणाने त्याच्या ५० वर्षीय वडील आणि ७५ वर्षीय आजोबांची निर्घृण हत्या केली. त्याने त्याच्या काकांवरही चाकूने हल्ला केला, ज्यामुळे ते गंभीर जखमी झाले. नंतर, आरोपीने एमआयडीसी पोलिस ठाण्यात आत्मसमर्पण केले. चेतन भत्रे असे आरोपीचे नाव असून तो अंधेरी पूर्वेतील तक्षशिला बिल्डिंगमध्ये राहतो. त्याचे वडील मनोज (५०) आणि आजोबा बाबू भत्रे (७५) अशी मृतांची नावे आहेत. पोलिसांनी सांगितले की, वडील आणि आजोबा रोज रात्री घरी दारू पिऊन एकमेकांशी भांडायचे. त्यामुळे चेतन नाराज होता. तो आणि त्याची बहीण दोघेच कुटुंबाचा आधार होते. मंगळवारी ...पान २ वर

## एकांतात गाठून त्याने अचूक साधला नेम पत्नीच्या प्रियकराचा पतीनेच केला गेम



हुक्केरी (बेळगावी) : क्राईम रिपोर्टर

दुसऱ्याच्या सुखी संसारात विष कळवणे योग्य नसते. त्याची कधी ना कधी शिक्षा मिळतेच हुक्केरी जवळच्या शहाबंदर येथे राहणाऱ्या महांतेश बुकनट्टी याचेही तसेच झाले. त्याने भावकीतल्याच बसवराजच्या पत्नीला पटवले आणि तिच्या सोबत मजा मारू लागला बसवराजचा अगोदरच पत्नीच्या चारित्र्यावर संशय होता. त्यातच आपल्या पत्नीचे महांतेशबरोबर संबंध आहेत हे कळताच त्याने महांतेशला खूप मारहाण केली, पण ती एकट नव्हती. अखेर आपल्या एका नातेवाईकांच्या मदतीने त्याने महांतेशचा काटा काढला. या प्रकरणी पोलिसांनी आरोपींना अटक केली आहे.



हुक्केरी तालुक्यातील शहाबंदर येथे बसवराज बुकनट्टी हा पत्नी अक्षता आणि मुलासह हुक्केरी येथील संगम हॉटेलजवळ भाड्याने राहयला आहे. बसवराज याचे अक्षता हिच्याबरोबर गेल्या पाच वर्षापूर्वी समाजाच्या रितीरिवाजाप्रमाणे झाला. बसवराज हा शेतीबरोबर ॲटो रिक्षा चालवून आपला उदर निर्वाह करीत होता. लग्नानंतर त्याचा संसार सुखा समाधानाचा चालू असताना बसवराज हा दारू पिण्याच्या आहरी गेला होता. तो दिवस रात्र दारू पिऊन येवून पत्नी अक्षता हिला मारहाण करीत तिच्यावर संशय घेऊ लागला होता. अक्षता हिचे परपुरूषाबरोबर शारीरिक संबंध असल्याची माहिती त्याला मिळालेली होती या कारणातून तो तिच्यावर संशय घेऊन तिला शिवीगाळ करीत मारहाण करीत होता. अक्षता ही दिसायला सुंदर देखणी असल्याने त्याचा तिच्यावर संशय होता. त्यामुळे त्याच्या मनात तिच्या विषयी संशयाची पाल चुकचुकत होती. देखणी बायको दुसऱ्याची असते जी म्हण आहे तसे त्याचे झाले होते. त्याच्या मनातील संशयाला खरे तर जागा होती कारण अक्षता ...पान ६ वर

## पेट्रोल पंपावरून वाद झाला मोठा सुपारी देऊन काढला भावाचा काटा

अमरावती (बडनेरा) : क्राईम रिपोर्टर

आजकाल पैशांसाठी माणूस नाती गोतीही विसरतो. त्यामुळेच संपती वादातून नात्यातली माणसेच आपल्या नातेवाईकांचे मुडदे पाडतात. अमरावती जवळच्या बडनेरामध्ये अशाच एका घटनेत पेट्रोल पंपावरून दोन चुलत भावांमध्ये वाद होता. पुढे हा वाद इतका वाढला की चुलत भावाने पेट्रोल पंप मालकाच्या हत्येची सुपारी देऊन त्याचा काटा काढला. या प्रकरणी पोलिसांनी २ अल्पवयीन मुलांसह ८ जणांना अटक केली.

पेट्रोल पंपाच्या वादातून सख्ख्या चुलतभावानेच पेट्रोल पंप चालक असलेल्या चुलतभावाची हत्या घडवून आणली. तब्बल दहा लाख रुपयांमध्ये ती सुपारी घेत दोन अल्पवयीन मुलांकडून तो खून करवून घेण्यात आला. मिलिंद मुरलीधर लाड (४२, रा. बारीपुरा, जुनी वस्ती, बडनेरा), असे मृताचे नाव आहे. तर या प्रकरणी त्यांच्या खुनाची सुपारी देणाऱ्या विक्रम राजेंद्र लाड (३२, बडनेरा) याच्यासह आठ संशयिताना ताब्यात घेण्यात आले आहे. बडनेरा ठाण्याच्या हद्दीतील राम मेघे कॉलेज ते हॉटेल रानमाळ दरम्यान २४ सप्टेंबर रोजी रात्री ९:३० च्या सुमारास ही घटना घडली. प्राथमिक तपासानुसार, मिलिंद यांचा चुलतभाऊ विक्रम याने पेट्रोलपंप मालमत्तेच्या वादातून ८ ते १० लाख रुपयांमध्ये त्यांच्या हत्येची सुपारी दिल्याची बाब उघड झाली आहे. मिलिंद लाड यांच्या मालकीचा अंजनगाव बारी रोडवर नायरा पेट्रोल पंप आहे. बडनेरा पोलिसांनी मृताचा चुलतभाऊ...पान २ वर

## पित असताना काहीतरी गडबड झाली दारूच्या नशेत मित्राचीच हत्या केली



धुळे : क्राईम रिपोर्टर

काही दारुडे विसराळूही असतात. दारूच्या नशेत त्यांनी काय केले याची त्यांना शुद्ध नसते. धुळे जिल्ह्यातील झेंडे अंजन गावातील देविदास आणि विकास हे दोघे मित्र होते. दोघेही मजूर असल्याने अधून मधून एकत्र दारू प्यायला बसायचे. एकेदिवशी विकास देविदासला दारू प्यायला घेऊन गेला आणि दारूच्य नशेतच त्याने विकासाची हत्या केली. मात्र पोलिसांनी पकडताच आपल्या काही आठवत नाही असे ते सांगतोय या पिकांनी त्याची अधिक चौकशी सुरू आहे.



धुळे जिल्ह्यातील शिरपूर तालुक्यात झेंडेअंजन नावाचे गाव आहे. या गावात मोलमजुरी करून आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करणारं गुलाब आणि मांगीबाई याचं छोटेसं कुटुंब आहे. आता हे दोघे वयस्कर झाले आहेत. आता कुटुंबाची जबाबदारी मुलगा गोटू आणि सून पिंटीबाई उर्फ छोटीबाई यांच्याकडे आली. या कुटुंबात गुलाब आणि मांगीबाई त्यांचा मुलगा गोटू, सून पिंटीबाई उर्फ छोटीबाई, नातू गुरूदास गोटू बहिरम, सतनाम गोटू बहिरम, तसेच गुलाब आणि मांगीबाई यांचा लहान मुलगा देविदास उर्फ देवा असे सर्व जण एकत्र रहातात. मोठे कुटुंब असल्याने गोटू, देविदास उर्फ देवा आणि गोटूची पत्नी पिंटीबाई उर्फ छोटीबाई हे सर्व जण मोलमजुरीसाठी जातात. देविदास उर्फ देवा हा मोलमजुरीतून मिळालेला पैसा घरखर्चासाठी देत असे. गेल्या दोन-तीन महिन्यांपासून देविदास उर्फ देवा हा झेंडेअंजन गावातील विकास विजय महाले याच्यासोबत काम करत होता. या कमी कालावधीत त्या दोघांची चांगली गट्टी जमली होती. दोघे जण एकत्र मजुरी करायचे आणि श्रमपरिहारासाठी एकत्रच दारू पित बसायचे. आता ते एकमेकांच्या घरीसुद्धा जावू लागले होते, त्यामुळे दोघांचीही एकमेकांच्या घरच्या लोकांशी ओळख झाली होती. सोमवार दि. ७ जुलै २०२५ चा दिवस. देविदास ...पान ६ वर

पान १ वरून...

## ‘माता न तू वैरीणी’ इतकी कशी ...

परिसरात खळबळ उडाली आहे. या घटनेची माहिती मिळताच रत्नागिरी ग्रामीण पोलीस ठाण्याच्या सहाय्यक पोलिस निरीक्षक तेजस्वीनी पाटील यांनी तातडीने आपल्या पोलीस पथकासह घटनास्थळी धाव घेतली. या सगळ्या घटनेचा पंचनामा करून बालकाचा मृतदेह पुढील कार्यवाहीसाठी शासकीय रुग्णालय पाठवला आहे. दरम्यान या सगळ्या घटनेचा तपास रत्नागिरी ग्रामीण पोलिसांनी सुरू केला असून ही महिला मानसिक रुग्ण असल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. मात्र नेमकं कारण अद्याप समजू शकलेलं नाही. रत्नागिरी ग्रामीण पोलीस ठाण्यात या घटनेची नोंद करण्यात आली असून सहाय्यक पोलीस निरीक्षक तेजस्वी पाटील अधिक तपास करीत आहेत.

## दुसरा नवरा केला तोही अखेर ...

करू लागला. त्याला काही कामधंदा नाही तो सकाळ पासून संध्याकाळ पर्यत फक्त दारूच पित असतो त्याला काही तरी कामधंदा लावावा म्हणून ती प्रयत्नात होती. यातच तिने ती काम करीत असलेल्या कॉल सेंटरमध्येच कॅब ड्रायव्हरची नोकरी मिळवून दिली. आपल्या पत्नीने आपल्याला काम मिळवून दिले यात त्याचा इगो दुखावला गेला. आधीच तो ती ज्या कॉल सेंटरमध्ये काम करीत होती त्या कॉल सेंटर मधील एका तरूणाशी तिचे अफेयर आहे असे त्याच्या मनात शंका येत होती. त्यातच तिने त्याला आपल्याच कॉल सेंटरमध्ये कॅब ड्रायव्हरची नोकरी मिळवून दिल्याने तिचे लफडे त्याला उघडया डोळ्यांनी बघावे लागणार असे त्याच्या मनात येत होते म्हणून तो तेथे काम करण्यास नकार देत होता. तरी ही तिने त्याला आपल्या कॉल सेंटरमध्ये कॅब ड्रायव्हर म्हणून काम करण्यास सांगितले. याचा ही त्याला राग येत होता. या कारणातून आणि तिच्या चारित्र्याच्या संशयातून तो रोज दारू पिऊन येवून तिला मारहाण करीत शिवीगाळ करीत होता.त्या दोघांची भांडणे तिच्या मोठया मुलीला समजत होते. ती आपली आई रेखा हिला भांडणता गप्प बसवित होती.याचाच गैरफायदा घेत लोहितश्वर हा जास्तच तिच्यावर संशय घेऊ लागला होता. भांडणात तु मला फसवले आहेस. तुझे लग्नाच्या आधीपासूनच दुसऱ्याबरोबर प्रेमसंबंध आहेत तु त्याच्याबरोबर मजा मारत असतेस असे म्हणून तो तिला त्रास देत होता. तिने लोहितश्वरपासून होणारा त्रास चन्नारायपट्टणम येथील आपल्या अशई वडिलांना सांगितला होता. त्यांनी ही तिला सांगितले की. तु विनाकारण त्याच्याशी लग्न केले आहेस. तुला त्याच्याशी लग्न करू नकोस म्हणून सांगितले असताना देखील तु लग्न केले आहेस तर तुझे तु आता बघ. त्यामुळे रेखाला आपलेच नशिब फुटके आहे असे वाटत होते तिचा पहिला नवरा ही तिच्यावर संशय घेत होता या कारणातून त्याच्यासोबत भांडणे होऊ लागल्याने तिने त्याच्यापासून घटस्फोट घेतला होता पण मागचे तसे पुढे चालू झाल्याने तिला दुसऱ्या नवऱ्यापासून ही तोच त्रास होऊ लागला. हल्ली भांडणात ती लोहितश्वर यालाच खडे बोलत असल्याने तो जास्तच तिच्यावर चिडत होता. खरे तर त्याला तिच्या मुलीची जबाबदारी नको होती. पण भांडणात तो तसे तिला सांगत नव्हता. तिच्या ही लक्षात ही गोष्ट येत होती भांडणात ती त्याला म्हणत होती की, तुला फक्त माझे नागडे शरीर पाहिजे मला भोगायला पाहिजे आणि माझी मुलगी नको काय? माझ्या मुलीला मी कमवून घालते ती तुझ्यात मिंद्यात नाही तिचे हे बोल त्याला लागत असल्याने तो उलट तिच्या चारित्र्यावर संशय घेऊन तु दुसऱ्याबरोबर झोपतेस आणि मला शहाणपणा शिकवतेस काय असे म्हणत तिलाच जबर मारहाण करीत शिवी गाळ करीत होता. हल्ली तो जास्तच दारू पिऊ लागला होता. त्याच्या या व्यसनाने तर रेखाला जेरीस आणले होते. एक सोडला आणि दुसऱ्याला धरले तर तिच गत आपली झाली आहे असे तिच्या मनात येत होते. काय म्हणून आपण या माणसाशी लग्न केले याचा तिला पश्यताप होत होता. त्या दोघांची भांडणे मोठी मुलगी रोज पाहत होती पण ती काहीच करू शकत नव्हती. हल्ली रेखा कामावर किंवा बाहेर कुठे फिरायला गेली तरी ही तो तिच्या मागे गुपचुपपणे जात होता.कुठे काही शंकास्पद वाटते का ते पाहत होता. यातच हल्ली रेखा ही आपल्या मोबाईलवरून कोणाशी तरी सारखी बोलत असल्याचे त्याला दिसत होते. तिच्या कानाला लागलेला मोबाईल ती खाली ठेवत नव्हती. यातच त्याला मागील दोन चार दिवसापूर्वी कोणाच्या तरी बाईकवरून जाताना दिसली. तिला दुसऱ्याच्या बाईकवर मागे बसून हसताना त्याच्या तळपायाची आग मस्कात गेली होती. त्याला त्याची शंका खरीच आहे हे वाटत होते. आता नवरा बायकोची भांडणे जास्तच विकोपाला गेली होती. ती बाहेर गेली की, तो तिच्या मागे लपून छपून जात होता. ती कोणाबरोबर बोलते काय करते याच्यावर त्याचे बारकाईने लक्ष होते. देखणी बायको दुसऱ्याची असते हेच त्याच्या मनात येत होते. ३२ शीतील रेखा ही मादक आणि सेक्सी तर होतीच तिला पाहताच कुणी ही तिच्या प्रेमात पडावे असे तिचे सौदर्य होते तिचे सौदर्यच तिच्या चारित्र्याला डाग लावीत होते लोहितश्वरने तिला दुसऱ्याच्या बाईकवर फिरताना बघितल्यावर तो तिच्यावर जास्तच शंका घेत होता.हिला आता कायमची संपवायला हवी नाही तर ही बया आपली इज्जत अब्रु घालविणार असे त्याच्या डोक्यात आले. तिला मारण्याचा तो प्लॅन करू लागला. तो तशा संधीच्या शोधात होता. तशी संधी त्याला लवकर मिळाली. सोमवार दि.२२ सप्टेंबर २०२५ रोजी ती सिरा येथील आपल्या घरातून मुलीसोबत साधारणता सकाळी १० ते १०.३० च्या दरम्यान बाहेर पडली. शॉपिग वैगरे करून ती सुनकडकट्टे बस स्टॅन्डवरील रस्त्यावर आली. तेथून रस्ता पार करून त्या दोघी ११.३० वाजणेच्या सुमारास जात असताना रस्त्याच्या मध्ये त्या दोघी आल्या असता लोहितश्वर हा एका बाईकवरून त्याच्या आडवे येवून थांबला. रेखाला पाहत त्याने तिला भर रस्त्यात शिवी गाळ करीत आता तु कोणाबरोबर झोपून आली आहेस असे म्हणत त्याने बाईकवरून उतरून आपल्याकडील चाकूने तिच्या गळ्यावर, मानेवर आणि हातावर तीन सपासप वार केले. तिच्यावर वार होत असताना तिच्या सोबत असणाऱ्या १३ वर्षाच्या मुलीने त्याला अडविण्याचा प्रयत्न केला त्यावेळी लोहितश्वर याने तिच्यावर ही चाकूने वार केले. त्यात ती गंभीर जखमी झाली. आधीच रेखावर त्याने वार केल्याने ती ओरडतच रस्त्यात खाली पडली. तिच्या मानेतून रक्ताची धार लागली होती. हे बघून रस्त्यावरील लोक लोहितश्वर याला अडविण्यासाठी पुढे येत होते. मात्र त्याने आपल्या हातातील रक्ताने माखलेला चाकु दाखवित त्यांना मागे केले. तिच्यावर वार करून त्याचा राग अजुन शांत झाला नव्हता. म्हणून खाली पडलेल्या रेखावर परत त्याने ८ वेळा वार करून तिच्या शरीराचा चेंदामेंदा केला. त्याने तिच्यावर जवळ पास ११ वेळा वार केल्याने ती रक्ताच्या थारोळ्यात रस्त्यात पडली. भर दुपारी भर रस्त्यात ही थरारक घटना घडल्याने लोक ही घाबरले होते. एखाद्या मारझाड कन्नड चित्रपटाला शोभेल अशी ही घटना होती. तिला मारून तो लोकांना बाजुला सारून आपल्या बाईकवरून निघून गेला. इकडे रक्ताच्या थारोळ्यात पडलेल्या रेखाला आणि गंभीर जखमी असलेल्या तिच्या मुलीला काही लोकांनी जवळच्या हॉस्पिटलमध्ये उपचारासाठी नेले. परंतु तेथील उपचाराआधीच रेखाचा मृत्यु झाल्याचे तेथील डॉक्टरांनी सांगितले. कुणी तरी या घटनेची माहिती जवळच्या कामाक्षीपल्या पोलीस स्टेशनला कळवली.या घटनेनंतर लागलीच लोहितश्वर हा कामाक्षीपल्या पोलीस स्टेशनला स्वत:हून हजर झाला होता. त्याच्या कपडयावर रक्ताचे डाग होते तर हातात रक्ताने माखलेला चाकू होता. पोलीसांनी त्याला ताब्यात घेतले. त्याने आपण आपल्या बायकोचा चारित्र्याच्या संशयाने खून केल्याचे पोलिसांना सांगितले. पोलीसांनी घटनास्थळ गाठून घटनेची माहिती घेत पंचनामा केला. या घटनेतील जखमी मुलगी शुध्दीवर आल्यावर तिने पोलिसांना घडलेली घटना सांगितली. तसेच मयत रेखा ही आपली आई असून संशयीत आरोपी लोहितश्वर हा तिचा सावत्र बाप असून तो आईवर संशय घेत होता या कारणातून त्याने आपल्या आईला मारल्याचे तिने पोलिसांना सांगितले. या घटनेची माहिती पोलीसांनी मयत रेखा हिच्या चन्नरायपट्टणम येथील आई वडिलांना दिली. तिचे आई वडिल आणि नातलग ही घटनास्थळी दाखल झाले. तिच्या वडिलांनी दाखल केल्या फिर्यादीनुसार कामाक्षीपल्या पोलीसांनी रेखा (वय ३२) हिच्या खूनाबद्दल तिचा दुसरा पती लोहितश्वर (वय ३५) याच्या विरोधात आयपीसी कलम १०३(१) प्रमाणे गुन्हा दाखल केला. पोलीसांनी त्याला कोर्टासमोर उभे केले असता मा.कोर्टाने लोहितश्वर याची रवानगी जेलमध्ये केली. या दरम्यान पोलीसांनी लोहितश्वर याच्याकडून गुन्हयात वापरलेला चाकू आणि बाईक जप्त केले. या घटनेचा पुढील तपास वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्याचा मार्गदर्शना खाली कामाक्षीपल्या पोलीस करीत आहेत. पतीच्या मनात एकदा का पत्नीच्या चारित्र्याचा संशय बसला की तो संशय काही केल्या त्याच्या मनातून जात नाही तसेच चारित्र्याच्या संशयाने मन पोखरले गेले की संसार ही उद्धवस्त होतो त्यातूनच अशा घटना घडतात हेच या घटनेवरून दिसून येते.

## पत्नी आणि मुलानेच घात केला...

करण्यात आली होती. मात्र पोलिसांनी या प्रकरणाची सखोल चौकशी केल्यानंतर हा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. दरम्यान वडाळा टिटि पोलिसांनी आता प्रवीणची पत्नी स्मिता आणि मुलगा प्रतिक याच्या विरोधात सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करून दोघांना अटक केली आहे. या प्रकरणी वडाळा टिटि पोलिस अधिक तपास करत आहेत. या प्रकरणात पोलिसांच्या तपासातून समोर आलेल्या माहितीनुसार, प्रवीण सुर्यवंशी यांच्या मृत्यूला सुरुवातीला साधा अपघात मानण्यात आला होता. मात्र चौकशीतून कळले की कौटुंबिक वाद चिघळल्यानंतरच हा प्रकार घडला होता. खिडकीच्या काचेवर आदळल्यानंतर रक्तस्त्राव थांबविण्यासाठी आवश्यक ती मदत किंवा तातडीची वैद्यकीय उपचार व्यवस्था करण्यात आली नाही, ही बाब तपासात गंभीर मानली गेली आहे. पोलिसांच्या म्हणण्यानुसार, उपचारासाठी वेळेत दवाखान्यात नेले असते तर प्रवीण यांचा जीव वाचू शकला असता. या बेपर्वाईमुळे आणि जाणूनबुजून दुर्लक्षामुळेच त्यांच्या मृत्यूला कारणीभूत ठरल्याचे तपासात स्पष्ट झाले आहे. त्यामुळेच सुरुवातीला दाखल करण्यात आलेली अपमृत्यूची नोंद बदलून आता सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्यात आला असून, या धक्कादायक घटनेमुळे पोलिस दलातही मोठी खळबळ उडाली आहे.

## रस्त्यावर झालेला वाद प्राणावर...

समितीचे पदयाधिकारी आणी कार्यकर्ते उपस्थित राहणार होते. या अधिवेशनात स्वातंत्र्य सैनिकांचा सन्मान, वीर पत्नी, वीर मातांचा सन्मान होणार होता. तसेच ज्यांनी संघटना वाढीसाठी मोर्चा, आंदोलने केली, मेळावे घेतली, अभ्यास शिबिरे घेतली, संघटनात्मक बांधणीवर कार्य केले अशा विविध पदाधिकाऱ्यांचा देखील सन्मान करण्यात येणार होता. त्यामुळे या अधिवेशनामध्ये सहभाग नोंदवण्यासाठी सकाळपासूनच अखिल भारतीय भ्रष्टाचार निर्मूलन संघर्ष समितीचे पदाधिकारी प्रणवश्री मंगल कार्यालयाकडे जात होते. सकाळी दहा वाजल्यानंतर सदरील मंगल कार्यालयामध्ये पदाधिकाऱ्यांची हळूहळू गर्दी वाढू लागली. याच मेळाव्यासाठी सोलापूर येथील अनमोल कवटे आणि सोनाली भोसले ईरटीका कार मधून चालकासह आल्या होत्या. काही वर्षापूर्वी अनमोल कवठे हा अखिल भारतीय भ्रष्टाचार निर्मूलन संघर्ष समितीचा पदाधिकारी होता. तसेच सोनाली भोसले देखील या समितीच्या पदाधिकारी म्हणून कार्य करत होत्या. दरम्यान दि. १७ ते १८ सप्टेंबर रोजीचे मध्यरात्री १२.४५ वाजण्याचे सुमारास पीव्हीआर चौक ते औसाकडे जाणाऱ्या बायपास रोडवर असलेल्या लहुजी साळवे चौकत गाडीला कट मारण्याच्या कारणावरून क्रुझर गाडीमधून आलेल्या चौघांनी ईरटीका गाडी मधील प्रवाशांसोबत वादावादी करून ईरटीका गाडीतील प्रवाशांना शिवीगाळ करुन लाथा बुक्याने मारहाण केली. तसेच क्रुझर गाडीतील एकाने हातातील चाकुने ईरटीका गाडी मधील तरुण अनमोल केवटे याच्या अंगावर वार करुन खुन केला तसेच सहप्रवासी सोनाली भोसले यांना जीवे मारण्याचे उद्देशाने चाकूने भोसकून गंभीर जखमी केले असल्याची माहिती शिवाजीनगर पोलीस ठाण्याला मिळाली. घटनेची माहिती मिळताच शिवाजीनगर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक दिलीप सागर, सहाय्यक पोलीस निरीक्षक मनोज जिरगे, पोहो. राहुल सोनकांबळे, काकासाहेब बोचरे, बालाजी कोतवाड, पद्माकर लहाने अभिजीत थोरात, बुधोडकर, अमरजीत पांगळ यांनी घटनास्थळाकडे धाव घेतली. घटनास्थळावर लोकांनी गर्दी केली होती. घटनास्थळी अखिल भारतीय भ्रष्टाचार निर्मूलन संघर्ष समितीचे पदाधिकारी दाखल झाले होते. घटनास्थळावर तर्क वितर्क याला उधान आले होते. दरम्यान घटनास्थळावर लातूर जिल्हा अप्पर पोलीस अधीक्षक मंगेश चव्हाण, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सुधाकर बावकर, लातूर शहर उपविभागीय पोलीस अधिकारी समीरसिंह साळवे यांनी भेट दिली. दरम्यान उपस्थित लोकांकडून वरिष्ठ अधिकाऱ्यांनी प्राथमिक माहिती घेतली असता क्रुझर आणि ईरटीका गाडीमधील प्रवाशांची वादावादी होऊन क्रुझर गाडीमध्ये असलेल्या चौघांनी ईरटीका गाडी मधील अनमोल कवठे आणि सोनाली भोसले यांच्यावर अचानक चाकू हल्ला केला. या हल्ल्यात अनमोल कवटे याला गंभीर दुखापत झाल्याने अमोल कवठे आणि सोनाली भोसले रक्ताच्या थारोळ्यात पडल्या होत्या त्यांना पुढील उपचारासाठ काही कार्यकर्त्यांनी शासकीय रुणालयात दाखल केल्याची माहिती समोर आली. तसेच या वादावादीत गंभीर जखमी झालेले तरुण आणि तरुणी ही सोलापूर येथील असल्याची माहिती समोर आली. पोलिसांनी तपासाचे चक्र अधिक गजमान करून शासकीय रुग्णालयाशी संपर्क साधून सदरील तरुण तरुण संबंधी माहिती घेतली असता यातील अनमोल कवठे नामक तरुण जागीच ठार झाले असल्याचे ही माहिती समोर आली. तसेच सोनाली भोसले तिच्यावर शासकीय रुग्णालयात उपचार चालू असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. पोलिसांनी ईरटीका गाडीचा चालक नवनाथ धाकपाडे यांच्याकडे अधिक माहिती घेतली असता. एम एच २६ व्ही २३५६ या क्रमांकाच्या क्रुझर गाडीतून आलेल्या चौघांनी आमच्या हे ठिकाण गाडी समोर क्रुझर गाडी आडवी लावून शिवीगाळ आणि मारहाण केली तसेच चाकू हल्ला करून पोबारा केला असल्याची माहिती पोलिसांना दिली. ईरटीका गाडीचा चालक नागनाथ धाकपाडे यांच्या फिर्यादीवरून क्रुझर (गाडी क्रमांक एम. एच.२६ व्ही २३५६) मधील लोकाविरोधात शिवाजीनगर पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक ३६७/२५ कलम १०३(१), १०९(१), १२६(२), ३५२,३(५) BNS प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला. जिल्हा पोलीस अधीक्षक अमोल तांबे, अप्पर पोलीस अधीक्षक मंगेश चव्हाण, लातूर शहर पोलीस अधिकारी समीरसिंह साळवे, शिवाजीनगर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक दिलीप सागर यांच्या मार्गदर्शनाखाली तपासाची सर्व सूत्रे सहाय्यक पोलीस निरीक्षक मनोज जिरगे यांच्या हाती देण्यात आले. तसेच वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी सर्वच पोलीस ठाण्यांना समांतर तपासाचे आदेश दिले. शिवाजीनगर पोलीस ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक मनोज जिरगे यांनी या प्रकरणातील प्राथमिक माहिती घेण्यास सुरुवात केली. मुंबई सारख्या मेट्रो सिटी मध्ये पोलीस सेवा बनवलेले मनोज जिरगे यांनी या खून प्रकरणातील प्रत्येक बाजूचा सूक्ष्म अभ्यास करण्यास सुरुवात केली. अनमोल कवठे आणि सोनाली भोसले यांची कोणासोबत पूर्व वैमान्यस्य आहे का याची देखील माहिती घेण्यास सुरुवात केली. दरम्यान सोलापूर- विजापूर रस्त्यावर असलेल्या मुद्रुप गावातील मूळ रहिवासी असलेला अनमोल कवठे हा सामाजिक कार्यकर्ता म्हणून सोलापूर जिल्ह्यात वावरत होता. शालेय शिक्षण पूर्ण केल्यानंतर काही काळ महाविद्यालयीन शिक्षण घेतलेला अनमोल कवठे याला राजकारणाची वेड लागले होते. राजकारणा बरोबरच विविध सामाजिक संघटना यांचा माध्यमातून तो समाजकार्य करू लागला. आशातच तो आरटीआय कार्यकर्ता म्हणून देखील वावरू लागला. शासकीय, निम शासकीय कार्यालय, शिक्षण संस्था संस्था इत्यादी तो माहिती अधिकाराच्या माध्यमातून विविध विषयांची माहिती मागून घेत होता. बऱ्याचदा अधिकारी आणि कर्मचारी यांना कागदी मेळ्यात अडकवून त्यांच्या विरोधात तक्रारी करणे असा नित्यनेम अनमोल कवठे याचा सुरू झाला होता. याच माध्यमातून बऱ्याचदा त्याला आर्थिक लाभ ही झाले होते.आंदोलन, उपोषण त्याचे आता हत्यार बनले होते. त्यामुळे सोलापूर सारख्या शहरांमध्ये अनमोल कवठे यांची चांगली दहशत निर्माण झाली होती. अशातच त्यांनी अखिल भारतीय भ्रष्टाचार निर्मूलन समितीचे पद देखील मिळवले होते. दरम्यान सोलापूर पासून जवळच असलेल्या अंत्रोळी गावातील सोनाली भोसले या महिलेची आणी अनमोल कवठे याची एका सामाजिक कार्यक्रमांमध्ये भेट झाली होती . सोनाली भोसले या देखील सामाजिक कार्यकर्त्या म्हणून ओळखत होत्या. गेल्या नऊ ते दहा वर्षापासून त्या आपल्या पतीपासून विभक्त राहत होत्या. त्यांना एक नऊ वर्षाची मुलगी देखील होती. दरम्यानच्या काळात अनमोल कवठे आणि सोनाली भोसले यांची चांगलीच ओळख झाली. सोनाली भोसले यांचे राहणीमान उच्चभ्रू असल्याने आणि त्यांचे व्यक्तिमत्व उजळ असल्याने याचा फायदा अनमोल कवठे यांनी घ्यायला सुरुवात केली. बऱ्याच अंशी अनमोल कवठे यांनी सोनाली भोसले यांच्या माध्यमातून आरटीआय कार्यकर्ता म्हणून माहिती मागण्यास सुरुवात केली. अवैद्य वाळू उपसा, अवैद्य उत्खनन यांच्या विरोधात देखील आंदोलने उभे केले. दरम्यान अनमोल कवठे हा आपल्या गावापासून वेगळा राहून सोलापूर शहरात राहत होता. अनमोल कवठे यांच्या घरची परिस्थिती बेताची होती. मात्र गुन्हेगारी स्वरूपाच्या कारवाईमुळे त्याचे गावाशी नाते तुटले होते. काही वर्षापूर्वीही अनमोल कवठे याच्यावर खंडणी सारख्या गुन्ह्याची नोंद झाल्यामुळे अखिल भारतीय भ्रष्टाचार निर्मूलन समितीने त्याचे पद रद्द केले असल्याची ही माहिती पोलिसांना मिळाली. दरम्यान अनमोल कवठे हा सोनाली भोसले यांना पुढे करून अखिल भारतीय भ्रष्टाचार निर्मूलन समितीचे पद मिळवण्यासाठी इच्छुक होता. त्यासाठीच हे दोघे लातूर येथे अखिल भारतीय भ्रष्टाचार निर्मूलन समितीच्या मेळाव्यास उपस्थित झाला असल्याची ही माहिती पोलिसांना मिळाली. दरम्यान गाडीला कट मारण्यावरून झालेल्या वादात एखाद्याचा खून व्हावा व एका महिलेवर निर्घनपणे चाकू हल्ला व्हावा याच्यावर पोलिसांचा विश्वास बसत नव्हता. सदरील घटना अनैतिक संबंधातून किंवा पैशाच्या आर्थिक व्यवहारातून झाली असावी का? याचाही अंदाज पोलीस बांधत होते. या प्रकरणाच्या तपासासाठी पोलिसांनी चहूबाजूनी प्रयत्न सुरू केले. दरम्यान स्थानिक गुन्ह्या शाखेचे पोलीस निरीक्षक सुधाकर बावकर यांच्या पथकाने या प्रकरणातील क्रूजर गाडी एका गुप्त माहिती आधारे शोधली. सदरील गाडी ही रेनापुर तालुक्यातील घनसरगाव येथे रोडवर आढळून आली. रेनापुर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक निकम यांच्या मदतीने स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलीस पथकाने सदरील गाडी ताब्यात घेतली तसेच या प्रकरणातील संशयित आरोपी शुभम जयपाल पतंगे यांच्या देखील मुस्क्या आवळल्या. त्याला शिवाजीनगर पोलीस ठाण्यात हजर केले त्याच्याकडे अधिक विचारपूस केली असता त्यांनी अन्य तीन लोकांची नावे घेतली. या प्रकरणातील मुख्य आरोपी विष्णू उर्फ संदीप शिवाजी मामडगे असल्याची ही माहिती समोर आली.तसेच मंथन चंद्रकांत मामडगे आणि वैभव कुमार स्वामी याचाही सहभाग असल्याची माहिती समोर आली. यावरून पोलिसांनी या तिघांचा माघ काढण्यास सुरुवात केली. रेनापुर तालुक्यातून वैभव स्वामी याला ताब्यात घेण्यात आले. त्यांच्याकडे अधिक विचारपूस केली असता त्यांनी पोलिसांना आवश्यक ती माहिती दिली. मात्र या प्रकरणातील मुख्य आरोग्य विष्णू उर्फ संदीप शिवाजी मामले व मंथन चंद्रकांत मामडगे हे दोघे पोलिसांना गुंगारा देत होते. दरम्यान शिवाजीनगर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक मनोज जिरगे यांनी या फरार दोन आरोपीचा माग घेण्यासाठी पोलिसांचे एक पथक तयार केले होते. या पथकात पोहे राहुल सोनकांबळे, अमरजीत पांगळ, बुधोडकर, बालाजी कोतवाड, पद्माकर लहाने, अभिजीत थोरात यांचा समावेश करण्यात आला होता. शिवाजीनगर पोलीस ठाण्याचे पथक या फरार आरोपीच्या हालचालीवर बारीक लक्ष ठेवून होते. शिवाजीनगर पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक मनोज जिरगे व त्यांची टीम आधुनिक माहिती आणी तंत्रज्ञानाचा वापर करून या आरोपीचा शोध घेत होते. दरम्यान या प्रकरणातील आरोपी हे हैदराबाद येथे असल्याची ही माहिती शिवाजीनगर पोलीस ठाण्याला मिळाली होती. दरम्यान त्यांच्या मागावर पोलिसांचे एक पथक रवाना करण्यात आले होते. मात्र या पथकाच्या हाती काहीच लागली नाही. एका गुप्त माहिती आधारे या प्रकरणातील संशयित आरोपी विष्णू उर्फ संदीप शिवाजी माडगे व मंथन चंद्रकांत मावळगे हे बीड जिल्ह्यातील घाटनांदुर गावातील एका शेतात लपून बसल्याची माहिती समोर आली. मिळालेल्या माहिती आधारे शिवाजीनगर पोलीस ठाण्याच्या पोलीस पथकाने घाटनांदुर येथे छापा टाकून पळून जाण्याच्या बेतात असलेल्या विष्णू उर्फ संदीप शिवाजी मामडगे व मंथन चंद्रकांत मामडगे यांना ताब्यात घेतले त्यांना शिवाजीनगर पोलीस ठाण्यात हजर केले. या दोघाकडे अधिक माहिती विचारली असताना त्यांनी सुरुवातीला पोलिसांना समाधानकारक उत्तरे दिली त्यांना पोलीस खाक्या दाखवतात त्यांनी आपल्या गुण्याची कबूल देऊन सांगण्यास सुरुवात केली. विष्णू उर्फ संदीप मामडगे हा ड्रायव्हर म्हणून काम करत होता. तो कला केंद्रामध्ये आंबट शौकीन लोकांना ने आन करत होता. त्यामुळे त्याला गाडीच्या भाड्या व्यतिरिक्त आणखीन जास्त पैसे मिळत होते. त्याच्या हातात पैशांचा चांगलाच खुळखुळाट होता. वेगवेगळ्या कला केंद्रावर त्याची चांगलेच वजन होते त्यामुळे त्याच्या बराच परिचय वाढला होता. दरम्यान १७ सप्टेंबर रोजी तो आपल्या काही निवडक लोकांना घेऊन कलाकेंद्र निघाला होता. त्यावेळेस त्याच्यासोबत मंथन चंद्रकांत मामाडगे हा पण होता. दरम्यान त्याच्या ओळखीचा आणि महाविद्यालयीन शिक्षण घेणारा शुभम जयपाल पतंगे हा त्याला भेटला. शुभम पतंगे याला पाहून विष्णू उर्फ संदीप मामाडगे यांनी त्याला आपल्या सोबत चल अशी विनवणी केली. शुभम पतंगे यांनी देखील त्याला होकार दिला आणि गाडीत बसला. विष्णू उर्फ संदीप मामाडगे हा या सर्वांना घेऊन एका कला केंद्रात गेला. काही वेळांना सगळ्यांना सोडून तो परत निघाला. तेव्हा विष्णू उर्फ संदीप मामडगे यांच्यासोबत शुभम पतंगे, मंथन चंद्रकांत मामडगे हे निघाले होते. इतक्यात तेथे वैभव कुमार स्वामी आला. वैभव कुमार स्वामी हा या तिघांच्या जुन्या परिचयाचा होता तो पुण्यात रोजंदारी काम करून आपला उदरनिर्वाह चालत होता. कला केंद्र पासून काही अंतरावर निघताच सगळ्यांनी पार्टीचा बेत आखला. भौतिक सुख आणि चैन मौजमजा करणाऱ्या विष्णू यांनी सगळ्यांना दारू पाजली. व ते रात्री बारा वाजण्याच्या सुमारास लातूरच्या दिशेने निघाले. त्यांची गाडी ही पीव्हीआर चौकात येताच त्यांच्या गाडीला एका ईरटीका गाडीने कट मारला. याचा राग विष्णू उर्फ संदीप मामाडगे याला आला. आणि पीव्हीआर चौक ते छत्रपती चौक या बायपास रोडवर दोन गाड्यांचा थरारा सुरु झाला. ईरटीका गाडी खाडगाव परिसरातील लहुजी साळवे चौकात येतात रस्त्यावर गतिरोधक असल्यामुळे तिचा वेग कमी झाला इतक्यातच ईटीका गाडीच्या पुढे क्रुझर गाडी आडवी लावण्यात आली. ईरटीका गाडी बसलेल्या प्रवासी आणि क्रुझर गाडीतील प्रवाशांमध्ये चांगलाच वाद सुरू झाला. या वादाचे रूपांतर अश्लील शिवीगाळ मध्ये सुरू झाली आणि काही क्षणातच हा वाद आणि मारीच्या स्वरूपात सुरू झाला. क्रुझर गाडीतील चौघेही तरुण खाली उतरले. ईरटीका गाडीतून एक महिला आणि पुरुष रस्त्यावर उतरले. यांच्यात वाद सुरू झाला. तू बडा की मी बडा असाच विषय समोर आला. कोण कोणाला ऐकण्यास तयार नव्हते. बहुतेक हे सर्व लोक मध्य धुंद अवस्थेत असल्यासारखे वागत होते. कुणाला काही समजायचा मार्ग नव्हता. सर्वांचे राग अनावर झाला होती. ईरटीका गाडीतील अनमोल कवठे आणि क्रुझर गाडीतील विष्णू उर्फ संदीप मामाडगे यांच्या जोराची बाचाबाची सुरू झाली होती. काही कळण्याच्या आत विष्णु उर्फ संदीप मामाडगे यांनी आपल्या जवळील चाकू काढून अनमोल कवठे यांच्या नरड्यावर छातीवर सपासप वार केली. अनमोल कवठे रक्ताच्या थारोळ्यात रस्त्यावर आडवा पडला. व काय क्षणात शांत झाला. हा सगळा प्रकार पाहून विष्णू उर्फ संदीप मामडगे शुद्धीवर आला. व सगळ्यांना चला इथून सटकून चला असे म्हणत असताना सोनाली भोसले या तरुणीने मंथन मामाडगे याला गच्च पकडून धरले होते. मंथन सोनालीच्या हातून सुटण्याचा पूर्णपणे प्रयत्न करत होता. मात्र सोनाली भोसले त्याला सोडत नव्हती. त्यामुळे विष्णू उर्फ संदीप मामाडगे यांनी तिच्यावरील चाकू हल्ला करण्यात सुरुवात केली. सोनाली पासून कशीबशी सुटका करत मंथन गायकवाड गाडीत येऊन बसला व हे सर्वजण पळून गेले. दरम्यान या प्रकरणात गंभीर जखमी झालेली सोनाली भोसले हिची प्रकृती स्थिर असून या प्रकरणाचा पुढील तपास शिवाजीनगर पोलीस ठाण्याचे साहेब पोलीस निरीक्षक मनोज जिरगे हे करत आहेत.

## कुटुंब कंटाळले होते दारुड्यांच्या छळा...

रात्री ११ वाजण्याच्या सुमारास चेतन त्याच्या कुटुंबासह घरी असताना त्याचे वडील मनोज आणि आजोबा बाबू पुन्हा भांडू लागले. भांडण वाढल्याने चेतनचा राग अनावर झाला आणि त्याने स्वयंपाकघरातून चाकू उचलून वडील मनोज यांची गळा चिरून त्यांची हत्या केली. त्यानंतर आजोबा बाबू यांनी मध्ये पडण्याचा प्रयत्न केला असता त्यांच्याही गळ्यावर चाकू फिरवून मनोजने त्यांची हत्या केली. याचदरम्यान, त्याचे काका अनिल यांनीही हस्तक्षेप करण्याचा प्रयत्न केला, परंतु चेतनने त्यांच्यावरही चाकूने हल्ला केला. मात्र, अनिल पळून जाण्यात यशस्वी झाले आणि त्यांनी घडल्या प्रकाराबाबत पोलिसांना माहिती दिली. आम्ही याप्रकरणी चेतनविरोधात गुन्हा दाखल केला असून त्याला अटक करण्यात आली आहे. तसेच त्याचे जखमी काका अनिल यांच्यावर नायर रुग्णालयामध्ये उपचार सुरू आहेत, असे परिमंडळ १०चे पोलिस उपायुक्त दत्ता नलावडे यांनी सांगितले.

## पेट्रोल पंपावरून वाद झाला मोठा...

गजानन लाड यांच्या तक्रारीवरून २५ सप्टेंबर रोजी पहाटे ०२:५५ वाजेच्या सुमारास अज्ञातांविरुद्ध गुन्हा दाखल केला. तथा लाड यांचा खून करणाऱ्या दोन विधिसंघर्षित बालकांना गुरूवारी पहाटेच ताब्यात घेतले. त्यातून लाड यांचा खून ‘कॉन्ट्रॅक्ट किलिंग असल्याच्या निष्कर्षाप्रत पोलिस पोहोचले आहेत. चंदन मोरे हा पेट्रोल पंपावर असताना दोन अनोळखी मुले तेथे आली. पेट्रोल पंपावर काम आहे का, अशी विचारपूस करून ते निघून गेले. त्यानंतर रात्री ०९:३० वाजेच्या सुमारास मोरे व मिलिंद लाड हे पेट्रोल पंपाहून दुचाकीने राम मेघे कॉलेज चौक ते हॉटेल रानमाळ रोडने घरी जात होते. लाड हे दुचाकी चालवीत होते, तर मोरे हा मागे बसला होता. त्याचवेळी पेट्रोल पंपावर काम विचारण्यासाठी आलेली तीच दोन मुले मागून दुचाकीने आली. त्यापैकी एकाने मिलिंद यांच्या खांद्यावर चाकू खुपसला. त्यामुळे दोघेही दुचाकीसह खाली पडले. त्या दोघांनी पुन्हा मिलिंद यांच्यावर चाकूने वार केले. ’तू जा, नाही तर तुझाही जिव घेऊ’, अशी धमकी त्यांनी चंदनला दिली. पेट्रोल पंपाच्या वादातून ती हत्या सुपारी देऊन घडवून आणल्याचे प्रथमदर्शनी समोर आले आहे. दोन विधिसंघर्षित बालकांसह सात ते आठ संशयितांना ताब्यात घेतले आहे, असे पोलिस उपायुक्त गणेश शिंदे यांनी सांगितले.

## मध्य रेल्वे विभागीय सल्लागार समिती सदस्यपदी संजय निलेगांवकर यांची नियुक्ती

**लातूर : वार्ताहर**



लातूर येथील यशस्वी युवा उद्योजक संजय निलेगांवकर यांची मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागीय सल्लागार समिती सदस्यपदी नियुक्ती करण्यात आली आहे. संजय निलेगांवकर यांच्यावर यापूर्वी मध्य रेल्वेच्या लातूर स्थानिक सल्लागार समिती सदस्यपदाची जबाबदारी होती. त्यावेळी त्यांनी रेल्वे प्रवाशांच्या समस्या सोडविण्याकामी महत्वपूर्ण योगदान दिले आहे. त्याचप्रमाणे माल वाहतुकीसंदर्भातील समस्या मांडून त्या समस्यांची सोडवणूक यशस्वीपणे करण्याचे काम केले आहे. रेल्वेशी संबंधित समस्या आणि प्रश्नांचा त्यांना चांगला अभ्यास आहे. लातूर लोकसभा मतदार संघाचे खासदार डॉ. शिवाजी काळगे यांनी निलेगांवकर यांची मध्य रेल्वेच्या मुंबई विभागाचे मुख्य महाव्यवस्थापकांकडे शिफारस केली होती. त्यांच्या शिफारसीनुसार वरिष्ठ विभागीय वाणिज्य व्यवस्थापक योगेश पाटील यांनी निलेगांवकर यांना नियुक्ती पत्र प्रदान केले आहे. संजय निलेगांवकर यांच्या या नियुक्तीचे खासदार डॉ. शिवाजी काळगे, सहकार महर्षी तथा माजी मंत्री दिलीपराव देशमुख, माजी मंत्री आ. अमित विलासराव देशमुख, माजी आमदार तथा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्ष धीरज विलासराव देशमुख, अभय साळुंके, ॲड. किरण जाधव, दीपक कोटलवार, उदय चौंडे, उदय पाटील, जगदीश कुलकर्णी, ॲड.संजय पांडे, अशोक गोविंदपूरकर, शिवकुमार क्षीरसागर, प्रसाद उदगीरकर, शिवाप्पा कोरके, हरिराम कुलकर्णी, दगडूआप्पा मिटकरी, लक्ष्मण कांबळे, बाळासाहेब देशपांडे, डॉ. श्रीनिवास संदीकर यांसह अनेक मान्यवरांनी अभिनंदन केले आहे.

## औसा कृषि उत्पन्न बाजार समितीची वार्षिक सर्वसाधारण सभा संपन्न



**औसा : शिवाजी मोरे**

आमदार अभिमन्यु पवार यांच्या मार्गदर्शना खाली वाटचाल करीत असलेल्या औसा कृषि उत्पन्न बाजार समितीची सन २०२४-२०२५ ची सर्वसाधारण सभा मोठ्या उत्साहात संपन्न झाली. या सभेच्या सुरवातीला बाजार समितीचे सभापती चंद्रशेखर सोनवणे व उपसभापती भिमाशंकरप्पा राचट्टे, संतशिरोमणी मारोती महाराज सहकारी कारखान्याचे संचालक सुभाष जाधव, बाबासाहेब पाटील यांच्या शुभहस्ते सरस्वतीच्या प्रतिमेचे पुजन करुन दिप प्रज्वलन करण्यात आले. या प्रसंगी बाजार समितीचे संचालक प्रकाश काकडे, युवराज बिराजदार, संदीपान लंगर, प्रविण कोपरकर, रमेश वळके, गोविद भोसले, ईश्वर कुलकर्णी, वीर, झिरमिरे, सुरेशऔटी, धनराज जाधव, मोहन कावळे आलमला, वि.का. सो.चेअरमन विश्वनाथ बिराजदार, अडत असोसिएशनचे अध्यक्ष शिवलींगप्पा औटी, उपाध्यक्ष गोविंद दळवे आदी मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते.

दरम्यान चालू अहवाल वर्षातील व्यापारी, शेतकरी, सभासद, अशा ज्ञात-अज्ञात त्यांच्या दु:खात सहभागी होऊन बाजार समिती तर्फे मौन पाळुन भावपुर्ण श्रध्दांजली अर्पण करण्यात आली. या नंतर बाजार समितीचे सचिव संतोष हुच्चे यांनी प्रास्ताविक व आहवाल वाचन केले. यानंतर सभेच अध्यक्ष व बाजार समितीचे सभापती चंद्रशेखर सोनवणे यांनी मा.आमदार अभिमन्यु पवार यांच्या मार्गदर्शनाखाली बाजार समितीने केलेली विकास कामाची व संचालक मंडळाच्या कालावधीत केलेल्या शेतकऱ्यासाठी केलेल्या लोकभिमुख व पारदर्शक कारभारची माहिती दिली, व पुढील काळात करावयाच्या विकास कामाची माहिती दिली. बाजार समितीच्या वतीने लवकरच राष्ट्रसंत तुकडोजी महाराज शेतकरी भवन योजने अंतर्गत नवीन शेतकरी भवन व ईतर सुविधा ईमारत बांधण्यात येणार असल्याचे सांगितले. तसेच बाजार आवारातील उर्वरीत सर्व रस्ते सिमेंट कॉक्रीटचे व सौर पथदिवे व शेतमाल तारण योजनेसाठी १००० मे. टनाचे गोदाम बांधण्यात येणार असल्याचे ही सांगीतले. याप्रसंगी वार्षिक सभेला सेवा सहकारी सोसायटीचे चेअरमन, प्रतिनिधी, ग्राम पंचायत सरपंच तथा प्रतिनिधी आडते, व्यापारी व हमाल, तालुक्यातील शेतकरी तसेच बाजार समितीचे सर्व अडते व व्यापारी बाजार समितीचे कर्मचारी वसिम शेख, भुजंग सोमवंशी, महादेव कांबळे, रामेश्वर विभूते आदी उपस्थित होते. या वार्षिक सर्वसाधारण सभेचे आभार प्रदर्शन बाजार समितीचे संचालक गोविंद भोसले यांनी मांडले.

## मुसळधार पावसामुळे शेती पिकाचे नुकसान पंचनामे करण्यास नाविंदगीचे तलाठी बंधाऱ्यावर



**सोलापूर : इरप्पा बोरीकरजगी**

अक्कलकोट तालुक्यातील नाविंदगी परिसरात पडलेल्या मुसळधार पावसामुळे शेती पिकाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. हातातोंडाशी आलेला पीक वाया गेल्याने शेतकरी भयभीत अवस्थेत आहे. नुकसानग्रस्त शेतकरी पंचनाम्यापासून वंचित राहू नये, म्हणून तलाठ्याने पिकांचे पंचनामा करण्यासाठी थेट शेतकऱ्यांच्या बंधाऱ्यावर जाऊन प्रत्यक्ष पाहणी करून पंचनामे करत आहे. काही दिवसापासून नाविंदगी परिसरात पाऊस सुरु आहे.अति पावसामुळे पिकांचे आतोनात नुकसान झाले. ऐन तोडणीच्या वेळेस आलेल्या मुसळधार पावसामुळे संपूर्ण पिक उध्वस्त झाले. त्यात उडीद सोयाबीन कांदा तूर अन्य पिकाचा समावेश आहे. शेतकरी पंचनामापासून वंचित राहू नये म्हणून त्या गावचे ग्राम महसुल अधिकारी आर.एस. हिरेमठ यांनी शेतकऱ्याच्या बंधाऱ्यावर जाऊन पिकांचे पंचनामे करत आहेत. त्यांच्या समवेत महसूल सेवक एस आर रामपुरे, राजशेखर सोरेगांव, लक्ष्मण रामपुरे, नागनाथ सलगरे, सुभाष जाधव, रामचंद्र बडूरे, संतोष राठोड आदी ग्रामस्थ उपस्थित होते.

## लातूर जिल्ह्यात धामणकर नाका मित्र मंडळ गणेशोत्सव मंडळाने पटकावला प्रथम क्रमांक




**भिवंडी : वार्ताहर**

राज्य शासनाच्या सांस्कृतिक विभागाकडून आयोजित केलेल्या गणेशोत्सव स्पर्धेत पुन्हा एकदा धामणकर नाका मित्र मंडळ सार्वजनिक गणेशोस्तव मंडळ जिल्ह्यात अव्वल ठरले आहे. मुंबई येथील सोहळ्यात सांस्कृतिक कार्यमंत्री अँड.आशिष शेलार, कौशल्य विकास मंत्री मंगलप्रभात लोढा यांच्या शुभहस्ते सन्मानपत्र रोख ५० हजार रुपये देऊन मंडळाचे अध्यक्ष संतोष शेट्टी यांना गौरवण्यात आले. धामणकर नाका मित्र मंडळाने हा पुरस्कार सलग दुसऱ्या वर्षी पटकावला आहे.

धामणकर नाका मित्र मंडळाच्या गणेशोत्सव हा धार्मिक उत्सव म्हणून साजरा न करता सामाजिक उपक्रमांच्या माध्यमातून जनतेसाठी विविध उपक्रम राबविले जात आहेत. रक्तदान, नेत्र चिकित्सा शिबिर, विद्यार्थ्यांसाठी शस्त्र प्रदर्शन, सांघिक खेळ, बुद्धिबळ स्पर्धा, पारंपरिक भजन कार्यक्रम आयोजन केले गेले होते अशी माहिती अध्यक्ष संतोष शेट्टी यांनी दिली आहे. प्रथम पारितोषिक म्हणून मिळालेल्या ५० हजारांच्या पुरस्कार रक्कमेमध्ये मंडळाच्या वतीने ५० हजार रुपये भर घालून एक लाख रुपयांचा निधी ओला दुष्काळग्रस्तांच्या मदतकार्यासाठी मुख्यमंत्री सहाय्य निधी मध्ये जमा करणार असल्याची माहिती संतोष शेट्टी यांनी शेवटी दिली. हा पुरस्कार स्वीकारताना मंडळाचे पदाधिकारी हसमुख पटेल, राजेश शेट्टी, राकेश पटवारी, प्रशांत पुजारी, ईश्वर पामु, राम बुरा, दिनेश शेट्टी, सतीश सुंकी, मुन्ना शेट्टी, चंद्रकांत हेगडे, अभिजित म्हसकर, मनीष मिश्रा, सागर कानकुटला आदी उपस्थित होते.

## लातूरमध्ये अण्णासाहेब पाटील जयंतीनिमित्त उद्योजकता मार्गदर्शन सत्र

**लातूर : वार्ताहर**

अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाच्या लातूर जिल्हा कार्यालयात अण्णासाहेब पाटील यांच्या ९२ व्या जयंतीनिमित्त विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या निमित्ताने उद्योजकाभिमुख युवकांना महामंडळामार्फत राबविल्या जाणाऱ्या विविध योजनांची माहिती देण्यात आली. मराठा समाजातील युवकांसाठी स्थापन करण्यात आलेल्या या महामंडळाच्या माध्यमातून बेरोजगारीच्या समस्येवर मात करण्यासाठी स्वयंरोजगाराला प्रोत्साहन देण्यावर भर देण्यात येत आहे.

जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राचे सहायक आयुक्त निशांत सूर्यवंशी यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की, नोकरीच्या संधी कमी होत असताना युवकांनी आपली कौशल्ये ओळखून आवडीच्या क्षेत्रात उद्योजकता निर्माण करावी. छोट्या व्यवसायातून मोठे उद्योजक घडू शकतात, ज्यामुळे व्यक्ती, कुटुंब, राज्य आणि देशाच्या अर्थव्यवस्थेला हातभार लागेल. या सत्रात महामंडळाच्या योजनांचा लाभ घेऊन यशस्वी झालेले श्रीराम हांडगे आणि विनायक पवार यांनी आपल्या प्रवासाचे आणि यशाचे अनुभव कथन केले. कार्यक्रमाला विद्यार्थी, लाभार्थी आणि उद्योजक मोठ्या संख्येने उपस्थित होते. महामंडळाचे सहायक व्यवस्थापक प्रशांत पाटील यांनी प्रास्ताविकात महामंडळाची स्थापना आणि जिल्ह्यातील कामकाजाचा आढावा सादर करून युवकांना योजनांचा लाभ घेण्याचे आवाहन केले. सूत्रसंचालन गायत्री राऊत यांनी, तर आभारप्रदर्शन नागेश लामदाडे यांनी केले.

## उमरोळी येथे तालुकास्तरीय प्लास्टिक कचरा व्यवस्थापन प्रकल्प व फिरते वाहन उद्घाटन!



**पालघर : वार्ताहर**

स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) टप्पा-२ अंतर्गत ग्रामीण भागातील प्लास्टिक कचऱ्याचे योग्य व्यवस्थापन करण्यासाठी ग्रामपंचायत उमरोळी येथे तालुकास्तरीय प्लास्टिक कचरा व्यवस्थापन प्रकल्प उभारण्यात आला आहे. या प्रकल्पाचे व प्लास्टिक संकलनासाठीच्या फिरत्या वाहनाचे उद्घाटन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मनोज रानडे यांच्या हस्ते करण्यात आले. या प्रसंगी जिल्हा पाणी व स्वच्छता विभागाचे प्रकल्प संचालक अतुल पारसकर, गटविकास अधिकारी पंचायत समिती पालघर राहुल काळभोर, सहाय्यक गटविकास अधिकारी बापूराव नाळे, विस्तार अधिकारी शिंदे, ग्रामपंचायत उमरोळीचे सरपंच प्रभाकर पाटील, उपसरपंच, सदस्य, ग्रामपंचायत अधिकारी मोरे, तसेच जिल्हा व पंचायत समिती कक्षातील कर्मचारी, ग्रामपंचायत कर्मचारी व ग्रामस्थ उपस्थित होते. प्लास्टिकचा वाढता वापर व चुकीची विल्हेवाट यामुळे शेती, ओढे, नदी, समुद्रकिनारे, पर्यटनस्थळे तसेच गावातील नाल्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर प्लास्टिक कचरा साचत आहे. यामुळे ग्रामीण भागाचे विद्रुपीकरण होण्याबरोबरच पर्यावरणीय धोकाही निर्माण होत आहे. हे संकट रोखण्यासाठी उमरोळी ग्रामपंचायतीतील हा प्रकल्प महत्त्वपूर्ण ठरणार आहे. या प्रकल्पाला जोडलेल्या ग्रामपंचायतींमधून प्लास्टिक संकलनासाठी सोमवार ते शनिवार असा दैनिक मार्ग निश्चित करण्यात आला आहे. प्रकल्प प्रभावीपणे राबविण्यासाठी सर्व ग्रामपंचायतींनी आपापल्या हद्दीतील प्लास्टिक कचरा नियमित जमा करण्याच्या सूचना मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी दिल्या.

## स्व.अशोकअण्णा लुल्ले यांच्या पुण्यस्मरणानिमित्त शालेय साहित्य वाटप



**देवणी : वार्ताहर**

येथील सामाजिक कार्यकर्ते स्व. अशोक अण्णा लुल्ले यांच्या द्वितीय पुण्यस्मरणानिमित्त शुक्रवारी (दि. २६) त्यांच्या प्रतिमेला अभिवादन करून विविध मान्यवरांच्या हस्ते विद्यार्थीना शालेय साहित्य वाटप करण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उदगीर लिंगायत समाजाचे तालुकाध्यक्ष चंद्रकांतण्णा वैजापूरे, लातूर जिल्हा मध्यवर्ती बँकेचे संचालक भगवानदादा पाटील तळेगावकर, डॉ.अरविंद भातांब्रे, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती सदाशिवराव पाटील तळेगावकर, भाजपाचे ज्येष्ठ नेते हावगीराव पाटील, ज्येष्ठ उद्योजक शेषराव मानकरी, माणिकराव लांडगे, कॉंग्रेस कमिटीचे तालुकाध्यक्ष अजित बेळकुणे, मल्लिकार्जुन डोंगरे आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी जि.प. प्राथमिक कन्या शाळा, देवणी, जि. प. प्रशाला, देवणी, जि. प. प्रशाला जावई नगर, देवणी, विवेक वर्धिनी प्राथमिक विद्यालय देवणी, योगेश्वरी प्राथमिक विद्यालय देवणी, जिजामाता प्राथमिक विद्यालय देवणी, किशनराव जाधव आश्रम शाळा देवणी, जि.प. प्रशाला हंचनाळ, जि.प.प्रशाला देवणी खुर्द, जि. प. प्रशाला अजनी, न्यूमिलियम पब्लिक स्कूल देवणी या विद्यालयातील विद्यार्थ्यांना स्कूल बॅग व शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात आले. यावेळी राजकुमार उस्तुर्गे, वैजनाथ अष्टूरे, गोपीनाथ सगर, वैजनाथ लुल्ले, अँड.शेषराव बिराजदार, जावेद तांबोळी, अमर मुर्के, शिवलिंग रासूरे, उपनगराध्यक्ष अमित मानकरी, नगरसेवक प्रा.अनिल इंगोले, योगेश ढगे, प्रा महादेव मळभगे, माजी सरपंच बाबुराव लांडगे, औदुंबर पांचाळ, यशवंत पाटील, बाबुराव इंगोले, रमेश कोतवाल, रमेश मन्सुरे, विविध कार्यकारी सोसायटीचे चेअरमन विजयकुमार लुल्ले, व्यापारी संघटनेचे अध्यक्ष सोमनाथ लुल्ले, रमेश बेलुरे, प्रवीण कोरे आदी उपस्थित होते. प्रास्ताविक नरसिंग सुर्यवंशी यांनी केले तर सूत्रसंचालन व आभार सचिन मंगनाळे यांनी मानले.

## खासदार डॉ. हेमंत सवरा यांचा व्यापारी व ग्राहकांशी संवाद

**वाडा : वार्ताहर**




देशाचे यशस्वी पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांच्या सूचनेवरून देशात जीएसटीमध्ये आमूलाग्र बदल करत दरकपात करण्यात आली. जवळपास ९० टक्के जीवनावश्यक वस्तूंवरील जीएसटी आकारणी ही १८ टक्क्यांवरून ५ टक्क्यांपर्यंत कमी करण्यात आली. याच पार्श्वभूमीवर वाडा शहर मंडळात खासदार डॉ. हेमंत सवरा यांनी भारतीय जनता पार्टीच्या वतीनं आयोजित उपक्रमात व्यापारी आणि ग्राहकांशी संवाद साधला. वाडा शहरात विविध रस्त्यावरील दुकानांमध्ये जात व्यापारी आणि ग्राहकांच्या प्रतिक्रिया जाणून घेतल्या. जीएसटी दरात कपात केल्याबद्दल व्यापारी संघटनांनी भाजपाचे धन्यवाद व्यक्त केले. यावेळी प्रदेश कार्यकारीनी सदस्य बाबजी काठोळे, माजी नगरसेवक राम भोईर यांच्यासह इतर पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. जीएसटीमध्ये केलेली कपात ही केवळ आर्थिक सुधारणा नाही तर सामान्य माणसाच्या खिशाला दिलासा देणारे आणि व्यापार क्षेत्राला नवसंजीवनी देणारे ऐतिहासिक पाऊल आहे. मोदीजींच्या नेतृत्वाखाली आज देशाची अर्थव्यवस्था नवनवीन उंची गाठत आहे. व्यवसाय सुलभता या संकल्पनेला बळ देत व्यापाऱ्यांच्या अडचणी कमी करण्यावर भर दिला जात आहे.

यामुळे लघु व मध्यम उद्योगांना मोठा हातभार लागणार आहे. जीएसटीमधील कपात ही गरीब, मध्यमवर्गीय कुटुंबं आणि छोट्या व्यापाऱ्यांसाठी थेट दिलासा आहे. मोदीजींचं नेतृत्व हे केवळ निर्णयक्षम नाही तर दूरदृष्टी दाखवणारं नेतृत्व आहे. त्यामुळे देशाच्या आर्थिक सुधारणांचा प्रवास हा जनसामान्यांच्या हिताला प्राधान्य देत सुरू आहे. या निर्णयामुळे ग्राहकांना बचत, व्यापाराला गती आणि रोजगार निर्मितीला चालना मिळणार असून मोदी सरकारच्या सुधारक धोरणांची सातत्यपूर्ण दिशा पुढे सुरू राहणार असल्याचे मत डॉ.सवरा यांनी व्यक्त केले आहे.

## खड्ड्यांमुळे अपघात झाल्यास खर्च महापालिकेने द्यावा -अभिलाषा वर्तक

वसई : वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या हद्दित रस्त्याच्या दुर्दशेमुळे नागरीक चांगलेच संतप्त झाले आहेत. उमेळे गावातील रस्त्यांची अवस्था दिवसेंदिवस अधिकच बिकट होत चालली आहे. ठिकठिकाणी पडलेले खोल खड्डे हे केवळ वाहतुकीस अडथळा ठरत नाहीत, तर अपघातांचे कारण बनत आहेत. अनेक दुचाकीस्वार आणि वाहनचालक खड्डे चुकवण्याच्या प्रयत्नात गंभीर जखमी झाले आहेत. काही घटनांमध्ये नागरिकांचे प्राणही गेले आहेत. रस्त्यांवर पॅचवर्क करून वेळकाढूपणा केला जातो, पण मूलभूत डांबरीकरण किंवा दर्जेदार दुरुस्ती होत नाही. नागरिकांचा ठाम आग्रह आहे की, अपघात झाल्यास त्याचा संपूर्ण खर्च महानगरपालिकेने, संबंधित कॉन्ट्रॅक्टरने किंवा पॅचवर्क करणाऱ्या इंजिनियरने भरावा. कारण ही केवळ निष्काळजीपणाची बाब नाही, तर लोकांच्या जीवाशी खेळ आहे. या पार्श्वभूमीवर उमेळे गावात संतप्त वातावरण निर्माण झाले असून, रस्त्यांच्या दुरुस्तीसाठी तातडीने पावले उचलावीत अशी मागणी जोर धरत आहे. प्रशासनाने याकडे गांभीर्याने लक्ष देऊन नागरिकांच्या सुरक्षेची जबाबदारी स्वीकारावी, अशी अपेक्षा वर्तक फाऊंडेशनच्या अध्यक्षा अभिलाषा वर्तक यांनी केली जात आहे.

## अनुभूती निवासी स्कूलला १९ वर्षाखालील महाराष्ट्र क्रिकेट संघाच्या निवड चाचणीच्या सामन्यांना सुरवात

### राज्यातून १४ रणजीपटूंसह २७ खेळाडूंचा सहभाग

**जळगाव : वार्ताहर**



१९ वर्षाखालील महाराष्ट्र राज्य क्रिकेट संघासाठी अनुभूती निवासी स्कूलच्या क्रिकेट मैदानावर निवड चाचणीची सुरवात झाली आहे. दि. २४ सप्टेंबर ते ३ ऑक्टोबर दरम्यान ही निवड चाचणी घेण्यात येणार आहे. यामध्ये संपूर्ण राज्यातून २७ खेळाडू आपले कौशल्य अजमावीत आहेत. त्यांच्यासोबत वरिष्ठ गटातील १४ रणजीपटूसुद्धा खेळत आहे. पहिल्या निवड चाचणीच्या सामनाची सुरवात महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनचे ॲपेक्स कौन्सीलचे सदस्य व जळगाव जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष अतुल जैन यांच्या हस्ते नाणेफेक करुन करण्यात आली. खेळांमध्ये हार जीत सुरुच असते, मात्र खेळाचा आदर ठेवला पाहिजे, यातून खेळ भावना विकसीत होते आणि चांगले व्यक्तिमत्व घडते असा संवाद खेळांडूशी अतुल जैन यांनी साधला. सामन्याच्या सुरवातीला अतुल जैन यांच्यासमवेत अरविंद देशपांडे, सुयूश बुरकूल, रविंद्र धर्माधिकारी उपस्थित होते. पंच म्हणून मुश्ताक अली, घनश्याम चौधरी यांनी काम पाहिले. वरूण देशपांडे यांनी सूत्रसंचालन केले.

महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशन (MCA) तर्फे अधिकृत असलेल्या निवड चाचणीचे आयोजन जळगाव जिल्हा क्रिकेट असोसिएशनतर्फे करण्यात आले आहे. यासाठी जैन इरिगेशन सिस्टीम्स लि. व जैन स्पोर्टस अक्॓डमीचे सहकार्य लाभत आहे. १९ वर्षाखालील महाराष्ट्र संघाच्या निवड चाचणी कमिटीचे अध्यक्ष अतुल गायकवाड-रत्नागिरी, सदस्य शैलेश भोसले-कोल्हापूर, मंगेश भुस्कटे-पुणे, शिरीष कामटे-पुणे, केतन दोशी-कराड यांच्या निरीक्षणातून संघ निवडला जाणार आहे. त्यांची उपस्थिती यात आहे. रणजी टीममधील १४ वरिष्ठ खेळाडूंमध्ये महेश म्हस्के, सिध्दांत दोशी, उबेद खान, ऋषिकेश सोनवणे, रणजीत नीका थेम, अभिनव तिवारी, वैभव विभूटे, हर्षल हडके, यश खलाटकर, आयुष बिरादर, अक्षय वाईकर, तनय संघवी, बालकृष्ण कशिद, ऋषभ राठोड आहेत. त्यांच्यासोबत महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्ह्यातून निवड झालेल्या २७ खेळांडूमध्ये मोहीत कटारीया, प्रज्वल मोरे, मोहम्मद अक्रम, अनिश जोशी, शुभम कदम, सुहशिक जगताप, कार्तीक शेवाळे, श्रीवात्सा कुलकर्णी, यतीराज पोतोडे, आयुष रत्काडे, समांथा धोरनार, साई परदेशी, राम राठोड, एकनाथ देवदे, इंद्रजीत शिंदे, सुश्रृत सावंत, राजवर्धन शितोडे, आर्यन देशमुख, अभिनंदन अदाक, जशन सिंग, व्यंकटेश बेहरे, ओमकार मोगर, रोनक अदानी, अभिशेक आमरे, रितविक रडे, इशान खोंडे, हर्षल मिश्रा यांचा समावेश आहे. निवड चाचणी क्रिकेट स्पर्धा यशस्वीतेसाठी जैन स्पोर्टस अकडमीचे सर्व सहकारी सहकार्य करीत आहेत.

29 SEPTEMBER TO 05 OCTOBER 2025 - Page 4 (CRIME SANDHYA):Layout 1 9/27/2025 10:05 PM Page 1



# अंधभक्तांचा धार्मिक लव्हेरिया!

देशात सध्या नवरात्र उत्सव सुरू आहे आणि याच उत्सवाच्या दरम्यान काही धार्मिक कट्टर पंथीयांनी, दोन समाजात तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न चालवलेला आहे. त्याची सुरुवात ४ सप्टेंबरला कानपूर मधून करण्यात आली. कानपूर मध्ये आय लव मोहम्मद चे पोस्टर झळकले. त्यानंतर तिथे काही रॅली काढण्यात आल्या. त्यातही आय 'लव मोहम्मद'च्या घोषणा देण्यात आल्या. वास्तविक कानपूर हा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा मतदारसंघ त्यामुळे या मतदारसंघाच्या सुरक्षेवर पोलिसांचे विशेष लक्ष असायला हवे होते असे वाद निर्माण होणार नाहीत याची पोलिसांनी काळजी घ्यायला हवी होती. परंतु पोलीस बेफिकीर राहिले. आणि पंतप्रधानांच्या मतदार संघातून एका नव्या वादाला तोंड फुटले. कानपूरमध्ये 'आय लव मोहम्मद'चे पुस्तक लागल्यानंतर, उज्जैन मध्ये हिंदूंनी 'आय लव महाकाल'चे पोस्टर लावले. तर इतर राज्यांमध्ये आय लव महादेव चे पोस्टर लागले. कानपूर मधून सुरू झालेला वाद हा हा म्हणतात देशभर पसरला. आणि आता तो देशाची आर्थिक राजधानी असलेल्या आणि अत्यंत संवेदनशील म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मुंबई पर्यत येऊन ठेपला आहे. या वादाचा दोन्हीकडचे कट्टरपंथी राजकीय फायदा घेत आहे. आणि मुंबईमध्ये सहा डिसेंबर सारखी तणावपूर्ण स्थिती निर्माण करीत आहे. सरकार सध्या अतिवृष्टीने बाधित झालेल्या शेतकऱ्याच्या मदतीसाठी प्रयत्न करीत असल्याने ,आय लव मोहम्मद आणि आय लव महादेव असा वाद निर्माण करणाऱ्यांकडे सरकारला लक्ष द्यायला वेळ नाही. परंतु हा जर वाद चिघळला, तर भयानक परिस्थिती निर्माण होऊ शकते. त्यामुळे या वादाची सुरुवात करणाऱ्यांवर अत्यंत कठोर कारवाई करायला हवी. त्यासाठी कठोर कायदे करायला हवेत. धर्माला रस्त्यावर आणून धार्मिक तणाव निर्माण करणाऱ्यांच्या विरोधात नॉन बेलेबल पात्र गुन्हा तर दाखल व्हायलाच हवा, पण अशा गुन्ह्यांमध्ये आरोपीची सर्व संपत्ती जप्त करण्याची तरतूद असायला हवी. तरच या लोकांना अद्दल घडेल. आणि देशात सौहार्दाचे वातावरण तयार होईल. देशात शांतता नांदेल.हे गरजेचे आहे.कानपुरमधून सुरु झालेला हा वाद आता देशाच्या दुसऱ्या शहरात पोहोचला आहे. तिथून येणारे फोटो चिंताजनक आहेत. मुस्लिम समाज हातात आय लव्ह मोहम्मद चे फलक घेऊन प्रदर्शन करत आहेत. लखनऊ, कानपूर, काशीपुर, लातूर आणि हैदराबादपासून गुजरातच्या गोधरापासून अनेक शहरात असे फोटो दिसले आहेत. अनेक विरोध प्रदर्शना दरम्यान लोकांनी कायदा आपल्या हातात घेतला. पोलिसांसोबत वादावादी, धक्काबुक्की झाली. पोलिसांना पळवलं. त्यांच्या युनिफॉर्मवर लावलेले स्टार सुद्धा खेचून काढले. ४ सप्टेंबर रोजी यूपीच्या कानपुरमध्ये एक पोस्टर लागले होते. त्यावर लिहिलेलं 'आय लव्ह मोहम्मद' असे लिहिले होते. या पोस्टरला हिंदू संघटनांनी विरोध केला. त्यानंतर यूपी पोलिसांनी कारवाई करत २५ युवकांविरोधात गुन्हा नोंदवला. यामुळे मुस्लिम समाज भडकला आणि अनेक शहरात विरोध प्रदर्शन सुरु झालं. कुठल्या कटाअंतर्गत हे विरोध प्रदर्शन सुरु आहे का? हा प्रश्न आहे. कानपुरपासून सुरु झालेला हा वाद आता देशाच्या दुसऱ्या शहरात पोहोचला आहे. उत्तराखंडच्या काशीपुरमध्ये परिस्थिती नियंत्रणाबाहेर गेली. विनापरवानगी निघालेल्या मिरवणुकीमुळे शहरात दंगली सारखी स्थिती निर्माण करण्याचा प्रयत्न झाला. दगडफेक, तोडफोड आणि पोलिसांवर हल्ला सुद्धा झाला. पण पोलिसांनी लगेच कारवाई करुन परिस्थिती नियंत्रणात आणली. काशीपूरच्या अलीखान भागात अचानक काही लोकांनी आय लव्ह मोहम्मद लिहिलेला बॅनर हाती घेऊन मिरवणूक काढली. प्रशासनाकडून कुठलीही परवानगी घेतली नव्हती. पोलिसांना या बद्दल काही माहित नव्हतं. बघता, बघात जमाव वाढत गेला आणि परिस्थिती नियंत्रणाबाहेर गेली. दगडफेक, धक्काबुक्की आणि पोलिसांना मारहाणीपर्यंत परिस्थिती चिघळली.महाराष्ट्राच्या लातूरमधून हैराण करणारं चित्र समोर आलं. लातूरमध्ये मुस्लिम समुदायाकडून 'आय लव्ह मोहम्मद'च्या घोषणा देत एक भव्य रॅली काढण्यात आली. ही रॅली आजमगंज गोलाई येथून सुरु होऊन टाऊन हॉल पर्यत पोहोचली. रॅली दरम्यान भावना खूप तीव्र होत्या. जागो जागी मुस्लिम समाजाचे लोक मोठ्या संख्येने या रॅलीमध्ये सहभागी होत होते. पाहता, पाहता हजारोंची संख्या लाखोंमध्ये बदलली. या रॅलीमध्ये यूपी सरकार मुर्दाबादच्या सुद्धा घोषणा देण्यात आल्या. प्रशासनाकडून सुरक्षेची काटेकोर व्यवस्था करण्यात आलेली. जमावाला नियंत्रणात ठेवण्यासाठी पोलीस प्रत्येक ठिकाणी तैनात होते. लातूरमध्ये ही रॅली शांततापूर्ण राहिली पण घोषणाबाजीमुळे वातावरण गरम झालेले आहे. आणि या गरम झालेल्या वातावरणामुळेच दोन समाजामध्ये तणाव आहे या तणावातून जो कधीही रस्त्यावर उतरू शकतात आणि त्यातून मोठी दंगल घडू शकते त्यामुळे धार्मिक वाद रस्त्यावर आणणाऱ्यांच्या विरोधात आता शांतता प्रेमी लोकांनीच रस्त्यावर उतरायला हवे कारण हा देश धर्माच्या आधारे नाही तर संविधानाच्या आधारे चालतो त्यामुळे आपापल्या धर्माचं रस्त्यावर प्रदर्शन करणे म्हणजे देशात शांततेने जगणाऱ्या लोकांना त्रास देण्यासारखे आहे सरकार मतांच्या लाचारीसाठी या लोकांविरुद्ध काहीही कारवाई करायला तयार नाही पण किमान न्यायपालिकेने तरी अशा गोष्टींमध्ये लक्ष घालून दंगलीला कारणीभूत ठरणाऱ्या या घटना थांबवण्याचा प्रयत्न करायला हवा तरच या देशातील सद्भावना कायम राहील जे लोक आय लव मोहम्मद किंवा आय लव महादेव ची नारेबाजी करीत आहेत, ते आय लव इंडियन असे का म्हणत नाहीत किंवा तशा घोषणा का देत नाही. म्हणजे देशापेक्षा त्याला त्यांचा धर्म अधिक महत्त्वाचा वाटतोय का? त्यामुळे अशा लोकांच्या अंधभक्तीचा समाचार घेण्याची वेळ आलेली आहे. या लोकांना आवडले नाही तर हे अंध भक्त पुन्हा एकदा देशात फाळणीसारखे वातावरण तयार करतील. कारण धर्माधता ही एक अफूची गोळी आहे जी माणसाला माणुसकी आणि समाज व देश कर्तव्याबाबतची जबाबदारी विसरायला लावते. वास्तविक धर्मा वाचून माणसाचे काही अडत नाही. हवा पाणी यासारख्या नैसर्गिक जीवनावश्यक गोष्टीचा धर्माशी काहीही संबंध नसतो. जगण्यासाठी त्या हिंदूंनी आवश्यक असतात आणि मुस्लिमांना सुधा आवश्यक असतात आणि निसर्गाकडून त्या सर्वांना सारख्याच प्रमाणात मिळतात. राहता राहिला प्रश्न अन्न, वस्त्र, निवारा, रोजगार या जगण्यासाठी आवश्यक असलेल्या गोष्टी धर्म पाहून दिल्या जात नाहीत.त्यासाठी केवळ पैसे लागतोआणि माणूस नेमकी हीच गोष्ट विसरतो. त्यामुळेच सध्या आय लव्ह मोहम्मद आणि आय लव्ह महादेव सारख्या घोषणा दिल्या जात आहेत. त्यातून धार्मिक तेढ निर्माण केली जात आहे. हे जर थांबले नाही तरदेशात भयंकर स्थिती निर्माण होईल. त्यामुळे कट्टरपंथीयांची ही पैदास रोखायला हवी. त्यांच्या बाबत कठोर निर्णय घ्यायला हवेत. तरच या देशाचे स्वातंत्र्य अबाधित राहील.

# शिक्षण सर्वांसाठी विशेषत: गरीब वंचितांसाठी : कर्मवीर भाऊराव पाटील



भारतीय समाजात विसाव्या शतकाच्या सुरुवातीला सामाजिक, आर्थिक आणि शैक्षणिक विषमता अत्यंत तीव्र होती. जात-पात, अंधश्रद्धा, अज्ञान आणि गरिबी यामुळे समाजातील बहुसंख्य जनतेला शिक्षण व प्रगतीपासून दूर ठेवण्यात आले होते .अशा अंधाऱ्या वातावरणात काही थोर समाज सुधारक पुरुषाने आपल्या कार्याने सामान्य माणसाला नवा मार्ग दाखविला. संत ज्ञानेश्वर, तुकाराम, संत एकनाथ, महात्मा फुले, शाहू महाराज, महात्मा गांधी, डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांच्या विचारानुसार पुढे कार्य केलेल्या कर्मवीर भाऊराव पाटील यांचे शिक्षणा विषयक योगदान अनन्यसाधारण आहे. त्यांनी आयुष्यभर सामान्य शेतकरी, मजूर, गरीब, वंचित आणि बहुजन समाजातील मुला-मुलींना शिक्षणाचा अधिकार मिळवून देण्यासाठी संघर्ष केला आहे. त्यांच्या शिक्षण चळवळीमुळे ग्रामीण महाराष्ट्रातील समाज जीवनात एक नवी क्रांती घडली आहे.

कर्मवीर भाऊराव पाटील यांचा जन्म २२ सप्टेंबर १८८७ रोजी कोल्हापूर संस्थानातील हातकणंगले तालुक्यातील कुंभोज या खेडेगावात झाला. शेतकरी कुटुंबात ते वाढले घरची परिस्थिती गरिबीची होती. लहानपणीच त्यांनी शेतात बैल हाकणे गुरे राखणे यासारखी कामे केली. परंतु त्यांच्यातील ज्ञान लालसा प्रखर होती. त्यांनी प्राथमिक शिक्षण गावात घेतले आणि पुढे सातारा व कोल्हापूर येथे शिक्षणासाठी गेले. कोल्हापूर संस्थानचे राजर्षी शाहू महाराज हे त्यांच्या आयुष्याचे प्रेरणास्थान ठरले. शाहू महाराजांनी शूद्र : अति शुद्राना शिक्षणाची दारे खुली केली होती. अस्पृश्यते विरुद्ध लढा दिला होता. या विचारांचा खोल ठसा भाऊराव पाटील यांच्या मनावर बसला. शिक्षण हेच खरे मुक्तीचे साधन आहे हा विश्वास त्यांनी मनाशी पक्का केला होता. भाऊराव पाटील यांनी शिक्षक म्हणून आपली कारकीर्द सुरू केली. परंतु लवकरच त्यांना जाणवले की केवळ अध्यापन पुरेसेनाही तर गरीब मुलांना शिक्षणाचीसंधी मिळून देण्यासाठी मोठ्या प्रमाणावर संस्थात्मक प्रयत्न करणे आवश्यक आहे. म्हणून १९१९ साली त्यांनी रयत शिक्षण संस्थांची स्थापना केली. या संस्थेचा मूलमंत्र होता शिक्षण सर्वांसाठी' विशेषता :गरीब व वंचितांसाठी त्यांनी ठामपणे सांगितले की, शेतकरी आणि कामगार यांच्या मुलांना शिक्षणाशिवाय अन्य कोणताही मुक्तीचा मार्ग नाही या विचारातूनच रयत शिक्षण संस्थेची उभारणी झाली. रयत शिक्षण संस्थेने सुरुवातीला फार मोठ्या प्रमाणावर साधन संपत्ती नव्हती. भाऊराव पाटील स्वतः गावोगावी फिरून निधी मागत लोकांना शिक्षणाचे महत्त्व समजावून सांगत अनेक वेळा त्यांना अपमान सहन करावा लागला. परंतु त्यांनी हार मानली नाही शेतकऱ्यांच्या घरात दिवा लावण्यासाठी माझ्या अंगावरचा झगा विकावा लागला तरी चालेल अशी त्यांची तयारी होती. त्यांच्या ध्येयवेडेपणामुळे हळूहळू समाजानेही त्यांच्या कार्याला पाठिंबा द्यायला सुरुवात केली. रयत शिक्षण संस्थेच्या माध्यमातून त्यांनी उभारलेली कमवा आणि शिका योजनाही त्यांच्या कार्याची वैशिष्ट्यपूर्ण देणगी आहे. या योजनेत गरीब विद्यार्थी दिवसभरातील काही तास शेतात बागेत वस्तीगृहात किंवा शाळेच्या कामात श्रम करीत आणि त्या बदल्यात थोडे पैसे मिळवीत हे पैसे ते शिक्षणासाठी वापरत यातून विद्यार्थ्यांमध्ये कष्टाची तयारी स्वावलंबनाची जाणीव आणि श्रमाची प्रतिष्ठा ही मुल्य रुजली जात होती. शिक्षण म्हणजे केवळ पैशाच्या जोरावर मिळणारे साधन नाही तर श्रमाच्या मोबदल्यात मिळणारे पवित्र फलित आहे ही जाणीव विद्यार्थ्यांना झाली.

कर्मवीर भाऊराव पाटील यांचा दृष्टिकोन केवळ शिक्षणापुरता मर्यादित नव्हता ते शिक्षणाला सामाजिक परिवर्तनाचे साधन मानत असत. त्यांच्या मते शिक्षण घेतलेलाविद्यार्थी समाजासाठी काम करणारा असावा शेतकरी कामगार कष्टकरी यांच्या समस्या ओळखून त्यांच्यासाठी आवाज उठविणारा असावा त्यांनी विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक बांधिलकी निर्माण करण्यावर भर दिला. त्यांच्या शाळातून घडलेल्या विद्यार्थ्यांनी नंतर समाजकारण राजकारण साहित्य पत्रकारिता विज्ञान आदी क्षेत्रात महत्त्वपूर्ण योगदान दिले. त्यांच्या कार्यात स्त्री शिक्षणाला विशेष महत्त्व होते. त्या काळात मुलींना शाळेत पाठविणे लाजिरवाणे समजले जात असे परंतु भाऊराव पाटील यांनी समाजाच्या या चुकीच्या मानसिकतेला आव्हान दिले त्यांनी मुलीसाठी शाळा सुरू केल्या वस्तीग्रह उभारली स्त्री शिक्षणाशिवाय समाजाची प्रगती शक्य नाही हा त्यांचा ठाम विश्वास होता या विचारामुळेच पुढे ग्रामीण भागातील मुलींनाही शिक्षणाची संधी मिळाली. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या कार्याचा प्रभाव केवळ महाराष्ट्रापुरता मर्यादित राहिला नाही तर भारत भर पसरलेला आहे. आज या रयत शिक्षण संस्थेच्या शाळा महाविद्यालय वसतिगृह कृषी शिक्षण केंद्र व्यवसायिक शिक्षण संस्था अशा विविध शाखातून लाखो विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. त्यांच्या शैक्षणिक चळवळीने गरिबांना ज्ञानप्रकाश दिलाआणि समाजातील विषमता कमी करण्याचे कार्य केले. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या कार्यात आपल्याला महात्मा फुले शाहू महाराज, महात्मा गांधी आणि डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा संगम दिसतो. फुले यांनी अस्पृश्यता व अज्ञानाविरुद्ध केलेली लढाई शाहू महाराजांनी दिलेला सामाजिक न्यायाचा मंत्र, गांधीजींनी दिलेली श्रम प्रतिष्ठेची शिकवण आणि डॉक्टर आंबेडकरांचे समतेचे तत्त्वज्ञान हे सर्व भाऊराव पाटील यांच्या कार्यातून प्रत्यक्ष साकार झाले म्हणूनच त्यांना खऱ्या अर्थाने कर्मवीर ही पदवी बहाल झाली. त्यांच्या जीवनात अनेक अडचणी आल्या आर्थिक संकटे समाजातील प्रतिकार रूढी परंपरा उपेक्षा यांनी त्यांना थांबवले नाही अनेकदा त्यांना अपमान सोसावा लागला परंतु त्यांनी आपल्या ध्येयापासुन माघार घेतली नाही ते म्हणत मी अपयशी झालो तरी चालेल पण प्रयत्न सोडणार नाही. त्यांच्या चिकाटीमुळे आज त्यांच्या कार्याचे भव्य रूप महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात दिसते.

आज आपण कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या कार्याकडे पाहतो तेव्हा जाणवते की त्यांनी घडविलेली चळवळ ही केवळ शिक्षणाची चळवळ नव्हती तर ती सामाजिक समतेची चळवळ होती. त्यांनी शिक्षणाला सामाजिक न्यायाशी जोडले. त्यांनी गरिबांच्या मुलांना शिक्षण देऊन त्यांना आत्माअभिमान दिले. त्यांना समाजात आपले स्थान आहे आपली किंमत आहे हे पटवून दिले. शिक्षणाच्या माध्यमातून त्यांनी समाजातील विषमता कमी करण्याचा प्रयत्न केला. आजच्या काळात त्यांचे विचार अधिक महत्त्वाचे ठरतात कारण आजही ग्रामीण भागात शिक्षणापासून वंचित असलेले अनेक कुटुंबे आहेत. लिंगभेद, आर्थिक विषमता, सामाजिक अन्याय हे प्रश्न अजूनही डोके वर काढत आहेत. अशा परिस्थितीत कमवा आणि शिका ही योजना नव्या स्वरूपात राबविण्याची गरज आहे. विद्यार्थ्यांनी शिक्षणाबरोबरच स्वावलंबन कष्टाची तयारी आणि समाजसेवा या मूल्यांना जपले पाहिजे तंत्रज्ञानाच्या या युगात भाऊराव पाटील यांचा संदेश तितकाच लागू पडतो. कर्मवीर भाऊराव पाटील हे नाव उच्चारले की डोळ्यासमोर एक साधा कष्टाळू ध्येय वेडा आणि समाजासाठी जीवाची बाजी लावणारा माणूस उभा राहतो. त्यांनी राजकीय पदांची मोहिनी पत्करली नाही संपत्ती जमवली नाही. परंतु सामान्य माणसाच्या जीवनात बदल घडविण्यासाठी आयुष्य खर्च केले. त्यांच्या शैक्षणिक चळवळीने लाखो घरामध्ये ज्ञानदीप प्रज्वलित केला. त्यांच्या निधनानंतरही त्यांचे कार्य आजही तितक्याच जोमाने सुरू आहे.

रयत शिक्षण संस्था आज ग्रामीण भागात शिक्षणाचा महासागर बनली आहे. या संस्थेच्या शाळा व महाविद्यालयातून शिकलेली पिढी समाजाच्या विविध क्षेत्रात आपले योगदान देत आहे हे सारे भाऊराव पाटील यांच्या ध्येय वेडेपणाचे फलित आहे. आज आपण त्यांच्या जयंतीनिमित्त त्यांना अभिवादन करतो तेव्हा त्यांच्या कार्याचा केवळ गौरव न करता त्यांचे आदर्श आचरणात आणणे ही खरी त्यांना वाहिलेली आदरांजली ठरेल. शिक्षण सर्वांसाठी उपलब्ध करून देणे स्त्री पुरुष समानतेवर भर देणे श्रमाची प्रतिष्ठा जपणे आणि समाजातील विषमता दूर करणे या त्यांच्या संकल्पना आणि मार्गदर्शक ठरतात.अशा या महान कर्मयोगी पुरुषाच्या जयंतीनिमित्त क्राईम संध्या परिवारातर्फे मानाचा मुजरा...!

**– प्राचार्य शंकर सोनवणे**

# गडांचा राजा : राजगड

सह्याद्रीच्या उंच डोंगररांगांच्या कुशीत उभा असलेला, भव्यता आणि ऐतिहासिक वैभव यांचा अद्वितीय संगम म्हणजे राजगड! छत्रपती शिवाजी महाराजांच्या हिंदवी स्वराज्याच्या उभारणीतील पहिला भक्कम पाया या गडाने घातला. तब्बल पंचवीस वर्षे स्वराज्याची राजधानी म्हणून राजगडाने अनेक ऐतिहासिक घटना, शौर्यगाथा, राजकीय निर्णय आणि युद्धांचा साक्षीदार होण्याचा मान मिळवला. मराठ्यांच्या पराक्रमाला व स्वराज्याच्या कर्तृत्वाला दिशा देणारा हा गड, केवळ एक किल्ला नसून स्वराज्याच्या आत्म्याचे मूर्तिमंत प्रतीक आहे. राजगड किल्ल्यावर पोहोचण्याचा प्रवास रोमांचकारी आहे. दाट जंगलातून जाणाऱ्या पायवाटा, खडतर चढण आणि सह्याद्रीच्या निसर्गसौंदर्याचा आनंद यामुळे हा प्रवास अविस्मरणीय ठरतो. गडावर पोहोचल्यानंतर दिसणारे विस्तीर्ण पर्वत आणि खोल दऱ्यांचे विहंगम दृश्य थकवा दूर करून मन भारावून टाकते. इतिहास, साहस आणि निसर्ग यांचा अद्भुत संगम राजगडावर अनुभवता येतो. हा किल्ला केवळ एक पर्यटनस्थळ नाही, तर मराठ्यांच्या गौरवशाली इतिहासाचे दार आहे. इथली शांतता, प्राचीन वास्तू आणि डोंगरमाथ्यावर वाहणारा गार वारा प्रत्येकाला पुन्हा-पुन्हा येथे येण्यासाठी प्रेरित करतो.

**प्राचीन इतिहास :** आजचा राजगड किल्ला मुळात मुरुंबदेव या नावाने ओळखला जात होता. विविध राजवटींच्या अखत्यारीत असताना या ठिकाणी फक्त बालेकिल्ल्याचा भाग अस्तित्वात होता. परंतु इ.स. १६४३ मध्ये छत्रपती शिवाजी महाराजांनी हा किल्ला ताब्यात घेताच त्याचे पुनर्निर्माण सुरू झाले. तेव्हाच या गडाला राजगड म्हणजेच गडांचा राजा हे साजेसे नाव लाभले आणि स्वराज्याची राजधानी म्हणून तो घोषित करण्यात आला. या गडावर अनेक ऐतिहासिक घटना घडल्या. इथेच शिवाजी महाराजांचे सुपुत्र राजाराम यांचा जन्म झाला. त्यांची पत्नी सईबाई यांचे याच ठिकाणी दुःखद निधन झाले. १६६४ मध्ये सूरत लुटल्यानंतर मिळालेल्या संपत्तीचे संरक्षण याच गडावर करण्यात आले. छत्रपती शिवाजी महाराजांनी अनेक महत्त्वाच्या लढायांची रणनीती राजगडावर आखली. भक्कम तटबंदी, मजबूत बुरुज आणि चतुराईने बांधलेल्या रचना यामुळे हा किल्ला अभेद्य बनला. मुघल आणि आदिलशाही सैन्याने कित्येक वेळा किल्ला जिंकण्याचा प्रयत्न केला. आजही राजगड हा इतिहास, साहस आणि निसर्ग सौंदर्याचा संगम आहे. पर्यटनासाठी हा किल्ला एक उत्तम ठिकाण आहे. किल्ल्यावरील सुवेळा माची, संजीवनी माची आणि बालेकिल्ला ही विशेष आकर्षणाची ठिकाणे. राजगडावरून दिसणारे सह्याद्रीचे डोंगर आणि धुके भरलेले निसर्गदृश्य मन मोहून टाकतात. इतिहासप्रेमी, साहसिक पर्यटक आणि निसर्गप्रेमी यांच्यासाठी राजगड एक अनोखा अनुभव देणारे ठिकाण आहे.

**नैसर्गिक रचना आणि संरक्षण व्यवस्था :** राजगड किल्ला मध्ययुगीन स्थापत्यकलेचा अद्वितीय नमुना आहे. सुमारे ४० किलोमीटर परिघ असलेल्या या किल्ल्याची समुद्रसपाटीपासून उंची १३७६ मीटर आहे. भक्कम तटबंदी आणि सुयोग्य रचना यामुळे हा किल्ला संरक्षण आणि प्रशासनासाठी अत्यंत महत्त्वाचा ठरला. या किल्ल्याचा मध्यभाग पद्मावती माची म्हणून ओळखला जातो. येथे छत्रपती शिवाजी महाराजांचे निवासस्थान होते. पद्मावती देवीचे मंदिर, पद्मावती तलाव आणि राजवाड्याचे अवशेष येथे पाहायला मिळतात. ही माची केवळ निवासासाठीच नव्हे, तर सैन्याच्या हालचालींसाठीही अत्यंत महत्त्वाची होती. किल्ल्याच्या पश्चिमेला संजीवनी माची आहे. येथे तीन स्तरांमध्ये बांधलेली तटबंदी आजही मराठ्यांच्या लढाऊ कौशल्याची साक्ष देते. शत्रूच्या हल्ल्यांपासून संरक्षण करण्यासाठी ही संरचना अत्यंत उपयुक्त ठरली. पूर्व बाजूला सुवेळा माची आहे. येथून दिसणारे निसर्गसौंदर्य विलोभनीय आहे. याच ठिकाणी नेढे नावाची मोठी नैसर्गिक दगडी कमान आहे. हा भूशास्त्रीय चमत्कार किल्ल्याच्या सौंदर्यात भर घालतो. बालेकिल्ल्यावरून सह्याद्री पर्वतरांगेचे अप्रतिम दृश्य दिसते. पूर्वी येथे राजवाडा होता आणि याच ठिकाणी अनेक महत्त्वाचे निर्णय घेतले जात असत. राजगडाची भौगोलिक व लष्करी रचना अतिशय अद्वितीय आहे. किल्ला डोंगरांच्या उंचसखल उतारांवर बांधलेला असल्याने तो जिंकणे जवळजवळ अशक्य होते. एका सरळसरळ तटबंदीवर अवलंबून न राहता तीन प्रमुख माच्या-पद्मावती, संजीवनी आणि सुवेळा या गडाला त्रिसूत्री स्वरूपात जोडलेल्या आहेत. या प्रत्येक माचीचा आपापला वेगळा उपयोग होता : पद्मावती माची – गडाचे हृदय मानली जाणारी ही माची प्रशासनिक व निवासी केंद्र होती. येथे राजसदर, पद्मावती देवीचे मंदिर, महाराजांचे निवासस्थान, राणीवसा तसेच मंत्र्यांचे निवासस्थान यांचा समावेश होता. मोठमोठ्या पाण्याच्या टाक्यांमुळे या माचीवर वर्षभर पाणी उपलब्ध असे. संजीवनी माची – पश्चिमेकडे पसरलेली ही माची मजबूत तटबंदी, अर्धगोलाकार बुरुज आणि पहारेकऱ्यांसाठी सोयीस्कर स्थानांनी युक्त होती. संरक्षण आणि आक्रमण अशा दोन्ही दृष्टींनी ती अत्यंत महत्त्वाची मानली जात असे. सुवेळा माची-पूर्वेकडे असलेली ही माची अरुंद व उग्र कड्यांवर पसरलेली आहे. येथे पाण्याची टाकी, पहारेकऱ्यांची ठाणी आणि गुप्त, अरुंद प्रवेशद्वार होते. शत्रूवर लक्ष ठेवण्यासाठी हे स्थान अनन्यसाधारण उपयोगी ठरत असे. या तिन्ही माच्या एका ठिकाणी येऊन मिळतात – तो म्हणजे बालेकिल्ला. उंच मनोरे, भक्कम भिंती आणि विस्तीर्ण परिसरावर नजर ठेवणारा हा भाग म्हणजे गडाचा सर्वोच्च आणि अंतिम संरक्षणस्तर. गडाच्या प्रवेशासाठी पाली, गुंजवणे व अळू दरवाजा हे मार्ग वापरले जात. तसेच खडकात कोरलेल्या असंख्य टाक्यांमुळे पाणी व धान्यसाठा अखंड उपलब्ध राहावा याची काळजी घेण्यात आली होती.

**गडाचे वैशिष्ट्य :** राजगडाच्या बांधणीत केवळ संरक्षणाचा विचार केलेला नव्हता, तर राजकारण, प्रशासन, सैनिक व्यवस्थापन आणि दीर्घकालीन टिकाऊपणा या सर्व बाबी लक्षात घेऊन गड उभारण्यात आला. वळणावळणाच्या पायवाटा, धान्यकोठारे, पहारेकऱ्यांच्या चौक्या यामुळे गड एक परिपूर्ण राजधानी ठरला.

**सांस्कृतिक वारसा :** आजचा राजगड हा फक्त एक पुरातन अवशेष नाही, तर जिवंत वारशाचे प्रतीक आहे. येथे होणारे उत्सव गडाच्या ऐतिहासिक महत्त्वाची आठवण करून देतात. दिवाळीच्या वेळी होणारा दीपोत्सव संपूर्ण गडाला दिव्यांच्या उजेडात न्हाऊ घालतो. शिवजयंतीच्या दिवशी तर हजारो लोक गडावर जमतात. पारंपरिक वाद्ये, भाषणे, शिवचरित्रावर आधारित नाटिका यामुळे गड पुन्हा एकदा इतिहासाच्या सोनेरी क्षणात जगू लागतो.

**जागतिक ओळख :** इतिहास, वास्तुकला, युद्धतंत्र आणि सांस्कृतिक महत्त्व यांचा अनोखा संगम असलेला राजगड आज युनेस्कोच्या जागतिक वारसा स्थळांच्या मालिकेत समाविष्ट होऊन भारताचे आणि मराठ्यांचे वैभव जगभर पोचवत आहे. राजगड किल्ला केवळ ऐतिहासिक वारसा नाही, तर तो एक साहस, एक प्रवास आणि मराठ्यांच्या अदम्य शौर्याला वाहिलेली आदरांजली आहे. येथील प्रत्येक दगड भूतकाळाच्या कथा सांगतो. इतिहासप्रेमींना येथे मराठ्यांच्या विजयगाथांचा अनुभव येतो. ट्रेकिंगच्या चाहत्यांसाठी हा किल्ला एक रोमांचक आहे. निसर्गप्रेमींना येथे सह्याद्रीच्या भव्य सौंदर्याचे दर्शन होते. येथील शांतता आणि वारा मनाला ताजेतवाने करतो. राजगड महाराष्ट्राच्या वैभवशाली इतिहासाची आठवण करून देतो. छत्रपती शिवाजी महाराजांच्या दूरदृष्टीचे आणि पराक्रमाचे साक्षीदार असलेला हा किल्ला आजही दिमाखात उभा आहे. येथे आल्यावर प्रत्येक क्षण संस्मरणीय वाटतो. एकदा का तुम्ही येथे पोहोचलात, तर हा प्रवास केवळ एक ट्रेक राहणार नाही, तर तो एक ऐतिहासिक अनुभव बनून हृदयात कोरला जाईल. राजगड तुमची वाट पाहतो आहे, चला निघा गडांच्या राजाला भेट द्यायला!

**– संजय डी.ओरके, विभागीय संपर्क अधिकारी, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई**

हे साप्ताहिक वृत्तपत्र मालक, मुद्रक व संपादक **धनराज (लक्ष्मणराव) शंकरराव पाटोळे** यांनी एस.आर. पब्लिकेशन, मोहन अर्जुन कंम्पाऊंड, शॉप नंबर ८,९,१० घरटनपाडा, वैशालीनगर बस स्टॉप, दहिसर पुर्व, मुंबई-६८ महाराष्ट्र येथे छापून नव निशीगंधा अपार्टमेंट, मनवेलपाडा रोड, विरार (पूर्व), ता.वसई, जि.पालघर येथून प्रकाशित केले. आरएनआय नं. एमएएचएमएआर २०१२/४५५५२. न्यायकक्षा (वसई), वसई कार्यालय, साईद्वारा अपार्टमेंट, शॉप नं.४, विशालनगर, अंबाडी रोड, माणिकपूर पोलिस स्टेशन जवळ, ता.वसई (पश्चिम), जि.पालघर. फोन नंबर ०२५०-२३४५९५९, मोब.: ९८९०७१८८७३, **कार्यकारी संपादक : गणेश मार्तंड चव्हाण,** सहसंपादक (मराठवाडा): **राम पाटोळे,** कायदेशीर सल्लागार : **ॲड.रूपेश शिंदे.** न्यायकक्षा-वसई. E-mail : crimesandhyavasai@gmail.com, whatsapp No. 9890718873 Website: www.crimesandhya.com

# पालघरमधील रस्त्यांची अवस्था बिकट; रस्ते संघर्ष समिती आक्रमक



**बोईसर : वार्ताहर**

पालघर तालुक्यातील प्रमुख रस्त्यांची अक्षरक्ष बिकट अवस्था झाली आहे. पावसाळ्यात शहरी भागासह ग्रामीण भागातील रस्ते देखील खड्ड्यात गेले असून यामुळे नागरिकांना प्रवास करतांना प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे. रस्त्यांच्या दयनीय अवस्थेविरोधात पालघर तालुका पूर्व रस्ते संघर्ष समिती आक्रमक झाली आहे. वारंवार तक्रारी करून देखील रस्त्यांची अवस्था सुधारत नसल्याने तसेच रस्त्यांच्या कामांमध्ये गैरव्यवहार करणारे अधिकारी व कंत्राटदार यांच्या विरोधात कारवाई होत नसल्याने या विरोधात आंदोलनासोबतच न्यायालयीन लढा देण्याचा निश्चय केला आहे. पालघर तालुक्यातील प्रमुख राज्यमार्गासह जिल्हामार्ग व ग्रामीण भागातील रस्त्यांची प्रचंड दुरवस्था झाली आहे. पावसानंतर या रस्त्यांच्या दुरवस्थेमध्ये अधिकच भर पडली आहे. पालघर आणि बोईसर या शहरी भागा सोबतच तारापूर एमआयडीसीला जोडणारा बोईसर चिल्हार रस्ता, मनोर-वाडा, मनोर-केव फाटा, गुंदले-चहाडे, नागझरी-मासवन, चहाडे-तांदुळवाडी, नागझरी-किराट, वेळगाव -मनोर, सोमटा-भोपोली या दळणवळण अधिक असलेल्या प्रमुख रस्त्यांवर मोठ्या आकाराच्या खड्ड्यांसोबतच डांबराचा थर वाहून जाऊन रस्त्यावरील खडी बाहेर आली आहे. खड्डेमय रस्त्यातून वाहन चालवताना वाहन चालकांना प्रचंड कसरत करावी लागत असून अपघातांसोबतच शारीरिक आणि मानसिक त्रास तसेच वाहनांचे नुकसान नागरिकांना सहन करावे लागत आहे. नागझरी ते किराट या रस्त्याचे जून महिन्यात डांबरीकरण करण्यात आले. डांबरीकरण सुरू असताना रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे होत असल्याबाबत स्थानिक नागरिकांनी सार्वजनिक बांधकाम विभागाकडे तक्रार केली होती. मात्र नागरिकांच्या तक्रारीकडे दुर्लक्ष केल्याने काम पूर्ण झाल्यानंतर अवघ्या पंधरा दिवसातच पावसामुळे हा रस्ता उखडला. नवीन रस्त्यांची कामे तसेच देखभाल दुरुस्ती करताना कंत्राटदारांकडून अंदाजपत्रकाप्रमाणे कामे केली जात नाहीत. कामाचा दर्जा व गुणवत्ता राखली जात नसल्यामुळे काही दिवसातच रस्त्याची दुरावस्था होते. सार्वजनिक बांधकाम विभागाचे संबंधित अधिकारी व कंत्राटदार हे रस्त्याच्या कामात संगनमताने गैरव्यवहार करीत असून रस्ते कामांची त्रयस्थ संस्थेकडून तपासणी करून संबंधित अधिकारी व कंत्राटदारांवर कारवाई करणे.

नागझरी-किराट रस्त्याचे काम नव्याने लवकरात लवकर सुरू करण्यात यावे. चहाडे- तांदुळवाडी रस्त्याच्या निकृष्ट कामाबाबत संबंधित ठेकेदार ह्यांच्यावर करवाई करावी. नागझरी-मासवन रस्त्यावरील तसेच तांदुळवाडी - वरई रस्ता आणि पारगाव पुलावरील खड्डे तात्काळ भरावेत या प्रमुख मागण्या सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता महेंद्र कीणी यांची भेट घेऊन करण्यात आली. रस्त्यांच्या दुरावस्थेबद्दल जबाबदार अधिकारी व कंत्राटदारांवर कारवाई न केल्यास आंदोलनासोबतच न्यायालयीन लढा देण्याचा इशारा यावेळी संघर्ष समिती मार्फत देण्यात आला. पालघर तालुका पूर्व संघर्ष समिती तर्फे तालुक्यातील रस्त्यांची दुरवस्था व कामामध्ये गैरव्यवहार झाल्याबाबत कारवाईसाठी निवेदन देण्यात आले आहे. याप्रकरणी चौकशी करून अहवाल मागविण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे खड्डेमय रस्त्यांच्या दुरुस्तीचे काम पावसाळ्यानंतर हाती घेण्यात येईल, असे पालघर सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता महेंद्र कीणी यांनी सांगितले.

# भिवंडी शहरातील जन्मदाखले देण्यासाठी सक्षम प्राधिकरण कोण? आमदार रईस शेख यांचा सवाल



**भिवंडी : वार्ताहर**

शहरात जन्मलेल्या बाळास एक वर्षानंतर जन्मदाखला देण्यासाठी सक्षम प्राधिकरण कोणते असा सवाल तहसीलदार अभिजित खोले यांच्या समोर आमदार रईस शेख यांनी उपस्थित केला आहे. राज्यात बांगलादेशी नागरिकांच्या जन्म दाखल्यां वरून भाजपा नेते किरीट सोमय्या यांनी अनेक महानगरपालिका तहसीलदार कार्यालय पिंजून काढले आहेत.त्यानंतर राज्यातील जुन्या नोंदी वरून जन्म दाखले चर्चेत आले आहेत. सुरवातीला न्यायालयास जन्म दाखला देण्या बाबत अधिकारी होते. त्यानंतर तहसीलदार कार्यालयातील नायब तहसीलदार यांना सक्षम प्राधिकार म्हणून नियुक्त केले होते. परंतु पुन्हा एकदा शासनाने ही अधिकार तहसीलदार यांना प्रदान केले आहेत.परंतु तहसीलदार हे ग्रामीण भागातील दाखले देणे बाबत प्राधिकृत असल्या बाबत शासन निर्णय असल्याने शहरातील महानगरपालिका क्षेत्रातील जन्मदकाले देण्यासाठी प्राधिकृत अधिकारी कोण असा प्रश्न उपस्थित होत आहे. तहसीलदार कार्यालयाकडून सहाय्यक पोलिस आयुक्त कार्यालय प्राधिकृत केल्याचे सांगितले जात आहे.पण त्यांनी सुद्धा या बाबत कानावर हात ठेवल्याने नागरिकांनी कोणाकडे जावे असा सवाल आमदार रईस शेख यांनी उपस्थित केला आहे. त्यांनी या बाबत तहसीलदार अभिजित खोले यांची भेट घेऊन चर्चा केल्यानंतर जिल्हाधिकारी ठाणे यांच्याशी मोबाईल वर संपर्क करीत येत्या आठ दिवसात या बाबत निर्णय घेण्याची मागणी केली आहे. शासन निर्णयानुसार तहसीलदार यांना ग्रामीण भागातील दाखले देण्याबाबत निर्देश असल्याने तहसीलदार कार्यालय स्तरावर जन्मदाखले देण्याची प्रक्रिया सुरू आहे अशी प्रतिक्रिया तहसीलदार अभिजित खोले यांनी दिली आहे.

# अस्मानी संकटात माणूसकी जपणारा महादेव पुन्हा अवतरला

**सोलापूर : इरप्पा बोरीकरजगी**





दक्षिण सोलापूर तालुक्यात ढगफुटी सदृश्य पाऊस होऊन सध्या भिमा आणि सिना नदीने रौद्र रुप धारण केले आहे. अनेक शेतकर्याच्या शेतात, घरात आणि गावात पाणी शिरुर अतोनात नुकसान झाले आहे. अशा अस्मानी संकटात सर्व सामान्य माणसांना दिलासा देण्यासाठी जणू दक्षिण सोलापूर तालुक्यात महादेव अवतरल्याचे चित्र पहायला मिळत आहे. कारण जेव्हा दक्षिण सोलापूर तालुक्यात अतिवृष्टीचा फटका बसला तेव्हा पासून महादेव सध्या पायाला भिंगरी बांधून संकटग्रस्तांच्या मदतीला धावून येताना दिसून येत आहेत. बाधित शेतकरी व बांधित कुटुंबियांची भेट घेत संकटाच्या काळात महादेव कोगनुरे यांनी मदतीचा ओघ सुरु केल्याने त्यांचे सर्वत्र कौतुक होताना पहायला मिळत आहे. ज्या-ज्या वेळी दक्षिण सोलापूर तालुक्यात परिस्थिती गंभीर त्या-त्या वेळी महादेव कोगनुरे खंबीरपणे संकटग्रस्तांच्या पाठीशी उभे राहताना दिसून येत आहेत. सर्व सामान्य माणसाच्या सुखदुःखात नेहमीच सहभागी होणारे महादेव कोगनुरे आता अतिवृष्टीग्रस्तांना मदतीचा हात देत माणूसकी जपताना पहायला मिळतात. विधानसभा निवडणुकीनंतर दक्षिण मधून आता महादेव संपला अशी वल्गना करणाऱ्यांना महादेव कोगनुरे यांनी मोठी चपराक दिली आहे. नेहमीच निस्वार्थ भावनेने जनमानसांची सेवा करणारा महादेव आता पुन्हा एकदा चर्चेत आल्याचे दिसून येत आहेत. कुठलाही स्वार्थ मनामध्ये न ठेवता केवळ जनमानसांची सेवा डोळ्या समोर ठेवून महादेव कोगनुरे दिवसरात्र अतिवृष्टीग्रस्त लोकांना मदत करण्यासाठी फिरताना दिसतायत. अस्मानी संकटात सापडलेल्या संकटग्रस्तांना महादेव कोगनुरे कडून मोठा दिलासा मिळत असल्याने अतिवृष्टीग्रस्तात समाधान व्यक्त होताना पहायला मिळत आहे.

# भिवंडी उपजिल्हा रुग्णालयात आरोग्य शिबिर संपन्न

**भिवंडी: वार्ताहर**




स्वस्थ नारी सशक्त परिवार अभियान अंतर्गत पंधरवडा साजरा केला जात आहे. शहरातील स्व.इंदिरा गांधी स्मृती उपजिल्हा रुग्णालयात भव्य आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराचा शुभारंभ ठाणे जिल्हा रुग्णालयाचे शल्यचिकित्सक डॉ.किशोर पवार यांच्या शुभहस्ते पार पडले. दिवसभर सुरू राहिलेल्या या आरोग्य शिबिरात एकूण १६४२ नागरिकांनी रुग्णसेवेचा लाभ घेतला. या शिबिरामध्ये रक्तदाब, मधुमेह, नेत्र व दंत रुग्णांची तपासणी केली. कान नाक घसा, अस्थिविकार, बालरुग्ण, अस्थिव्यंग, गरोदर माता, रक्ताची तपासणी व हिमोग्लोबिन, क्षयरोग रुग्णाची तपासणी केली, लसीकरण करण्यात आले. सिकल सेल बाधित ११७ तपासणी करण्यात आल्या, तज्ञ डॉक्टरांच्या मदतीने रुग्णांना मार्गदर्शन व तपासणी करण्यात आली. महिलाना, किशोर वयीन मुलींना आहार बद्दल, मासिक पाळी स्वच्छता बद्दल मार्गदर्शन केले. गरोदर मातांची रक्त तपासणी केली गेली. आभा कार्ड व आयुष्मान कार्ड व सिकल सेल कार्ड वाटप करण्यात आले. स्तनाचा, गर्भाशय मुखाचा कर्करोग, मुखाचा कर्करोग यासाठी तपासणी करण्यात आली. यावेळी डॉ. गुलफाम, नीळकंठ स्वामी यांनी जिल्हा रुग्णालय ठाणे यांच्या समन्वयाने रक्तदान शिबीर आयोजित करण्यात आला होता. यावेळी भिवंडी न्यायालयाचे न्यायाधिश यांनी रक्तदान करून नागरिकांसमोर आदर्श ठेवत अवयवदान करण्या बद्दल मानस व्यक्त केला. या सर्व उपक्रमात स्नेहा फाउंडेशन,या स्वयंसेवी संस्थेने सहभाग घेतला होता.हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी इंदिरा गांधी उपजिल्हा रुग्णालयाच्या वैद्यकीय अधीक्षक डॉ. माधवी पंदारे यांच्या नेतृत्वाखाली प्रशासकीय अधिकारी डॉ. इजहार अन्सारी, प्रयोगशाळा विभागाचे राजेंद्र शिंदे,देविदास शेटगे आणि कार्यालयीन अधीक्षक सीमा माने, पारिचारिका सौ.हेमलता जाधव व सर्व नर्सिंग स्टाफ, तसेच सर्व अधिकारी, कर्मचारी, सर्व डॉक्टर यांनी विशेष मेहनत घेतली.

# दुपारेपाडा येथे नवरात्रोत्सवात ज्येष्ठ नागरिकांचा सत्कार



**वाडा : वार्ताहर**

दुपारेपाडा येथे सुरू असलेल्या नवरात्रोत्सव साजरा करत असताना एक आणोखा उपक्रम राबवून गावातील ७५ वर्षे पूर्ण केलेल्या जेष्ठ नागरिकांचा सत्कार करण्यात आला. श्रीगणेश नवतरुण मित्र मंडळ दुपारेपाडा यांच्या वतीने हा सत्कार सोहळा आयोजित करण्यात आला होता. मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी दामोदर पांडुरंग दुपारे नामदेव पांडुरंग दुपारे, आनंता हारी वलटे, लोडु लडकु वलटे, त्रीबंक लडकु वलटे, भागोजी लडकु वलटे, पांडुरंग लडकु वलटे, लक्ष्मण मंगा वलटे, वीठ्ठल बाबु वलटे, कृष्णा रामा दुपारे, बाळकृष्ण जाऊ आरज, गजानन लडकु गायकर, बारकु वीठ्ठल दुपारे यांचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन गौरव केला. या वेळी मंडळाचे पदाधिकारी, ग्रामस्थ व तरुण मंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होते. जेष्ठ नागरिकांच्या अनुभवातून तरुण पिढीला प्रेरणा मिळते, असे मत श्रीगणेश नवतरुण मित्र मंडळाचे अध्यक्ष सुरज दुपारे याने व्यक्त केले.

# वसई किल्ल्यातील वास्तूंच्या नामावली आणि स्थळांची अभ्यास सफर संपन्न

वसई : अपरिचित जंजिरे वसई कोट वास्तुविशेष नामक तीन तासांची विनामूल्य अभ्यास सफर आयोजित करण्यात आलेली होती. यावेळी जंजिरे वसई किल्ल्यातील अज्ञात असणाऱ्या स्थळांवर श्रीदत्त राऊत यांनी मार्गदर्शन केले. ऐतिहासिक स्थळांत मानाचे स्थान प्राप्त केलेल्या जंजिरे वसई किल्ल्यातील सर्व वास्तू अभ्यासकांच्या शोधात आहेत. किल्ले वसई मोहिमेचे प्रमुख व इतिहास अभ्यासक श्रीदत्त राऊत गेली २२ वर्ष जंजिरे वसई किल्ला बोलका करत आहेत. गेल्या दोन वर्षांत त्यांनी केलेल्या सखोल परीक्षणाने जंजिरे वसई किल्ल्यातील १८ व १९ व्या शतकातील ज्ञात अज्ञात वास्तूंवर प्रकाश पडत आहे. या नवीन संशोधनात नामावली सहीत विविध मोजमापे, अपरिचित आरमार कोठी, किल्ल्यातील दैवते, किल्ल्यातील लुप्त बंदर, किल्ल्यातील अपरिचित बुरुज ओळख, किल्ल्यातील सर्व उत्सव, किल्ल्यातील शस्त्र व दारूगोळा तपशील, आरमारी साहित्य, किल्ल्यातील शासकीय इमारती, किल्ल्याचे वेळापत्रक, किल्ल्यातील बांधकामे व उपलब्ध जंगल, महाद्वार, किल्ल्यातील लाकडी स्थापत्य, किल्ल्यातील रसद अशा जवळपास १२५ नवीन नोंदी सहीत नवे संशोधन पुराव्यानिशी उलघडा झाला.

# खुपरी ग्रामपंचायतीला मोफत रुग्णवाहिकेची भेट



**वाडा : वार्ताहर**

वाडा तालुक्यातील ग्रुप ग्रामपंचायत खुपरी येथे रुग्णवाहिकेच्या लोकार्पण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. हा कार्यक्रम शिवसेना उपनेते व जिजाऊ संघटनेचे संस्थापक अध्यक्ष निलेश सांबरे यांच्या उपस्थितीत पार पडला. रीजन्सी इस्पात प्रा. लि. यांच्या वतीने खुपरी ग्रामस्थांना मोफत सेवेसाठी ही रुग्णवाहिका देण्यात आली आहे. यावेळी ग्रामपंचायत सरपंच किशोर पवार, उपसरपंच श्वेता शेळके, भाजपा कुडूस मंडळ अध्यक्ष मोनिष पाटील, भाजपा कार्यकर्ते दिलीप पाटील, रिजेन्सी इस्पातचे तानाजी होवाळ, ग्राम विकास अधिकारी गोविंद बटुले, ग्रामपंचायत सदस्य, पोलिस पाटील तसेच मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते. खुपरी ग्रामपंचायतीचे तरुण सरपंच किशोर पवार यांच्या माध्यमातून ग्रामस्थांसाठी अनेक लोकोपयोगी उपक्रम राबवले जात आहेत. त्याचाच एक भाग म्हणून ग्रामस्थांना कंपनीच्या सहकार्याने रुग्णवाहिकेची सुविधा उपलब्ध करून दिल्याबद्दल निलेश सांबरे यांनी सरपंच व ग्रामपंचायतीच्या कार्याचे कौतुक केले.

# जागतिक औषध निर्माता दिनानिमित्त विद्यार्थी परिषदेतर्फे वाड्यात रॅली




**वाडा : वार्ताहर**

जागतिक औषध निर्माता दिनानिमित्त वाड्यात आयडियल इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी, पोशेरी यांच्या विद्यार्थी परिषदेतर्फे रॅलीचे आयोजन करण्यात आले. थिंक हेल्त थिंक फार्माशिस्ट या संदेशासह विद्यार्थ्यांनी समाजात फार्मासिस्टचे महत्त्व पटवून देण्यासाठी ही रॅली काढली. विद्यार्थी व प्राध्यापक मोठ्या उत्साहाने या उपक्रमात सहभागी झाले होते.विद्यार्थ्यांनी फलक व बॅनर घेऊन उत्साहात घोषणाबाजी केली. या उपक्रमाद्वारे नागरिकांना औषधांचा योग्य वापर, जनजागृती आणि फार्मासिस्ट समाजातील आरोग्य संवर्धनात निभावणारी भूमिका याबाबत माहिती देण्यात आली. औषध विक्रेते म्हणजेच फार्मासिस्ट हे फक्त औषध देणारे नसून ते रुग्णांच्या आरोग्य रक्षणाचे महत्त्वाचे घटक आहेत, हा संदेश या रॅलीद्वारे देण्यात आला. जागतिक औषध विक्रेता दिनाचे औचित्य साधून विद्यार्थ्यांनी काढलेली ही रॅली परिसरात लक्षवेधी ठरली.

# भिवंडीत साडे तीन लाखांचा गांजा विक्री करणाऱ्या दोन आरोपींना अटक, आरोपी जवळून पिस्टल जप्त

**भिवंडी : वार्ताहर**



भिवंडी शहरात गुन्हे शाखा घटक भिवंडी यांच्या पोलिस पथकाने केलेल्या कारवाईत दोघा जणांना ताब्यात घेऊन त्याच्या जवळून विक्री साठी आणलेला तीन लाख ५४ हजार रुपये किमतीचा ४ किलो गांजा व घर झडती मध्ये बेकायदेशीर माऊझर पिस्टल व एक जिवंत काडतुस असा मुद्देमाल जप्त करण्यात यश मिळवले आहे अशी माहिती गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक जनार्दन सोनवणे यांनी दिली आहे. १७ सप्टेंबर रोजी दोन व्यक्ती गांजा विक्री करण्यासाठी भिवंडी ते ताडाळी रोड दरम्यान येणार असल्याची माहिती गुन्हे शाखेतील सहाय्यक पोलिस उपनिरीक्षक सुनिल साळुंखे यांना गुप्त बातमीदाराकडून माहिती मिळाली होती.त्यांनी गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक जनार्दन सोनवणे यांना याबाबत माहिती दिली. त्यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलिस निरीक्षक श्रीराज माळी, मिथुन भोईर, पोलिस उपनिरीक्षक रविंद्र बी.पाटील, राजेश शिंदे, रामचंद्र जाधव, सहाय्यक पोलिस उपनिरीक्षक सुनिल साळुंके, सुधाकर चौधरी, पोलिस कर्मचारी निलेश बोरसे, साबीर शेख, सुदेश घाग, किशोर थोरात, वामन भोईर, राजेश गावडे, माया डोंगरे, अमोल इंगळे, भावेश घरत, सर्फराज तडवी, रविंद्र साळुंखे या पथकाने पंचांच्या समक्ष सदर ठिकाणी सापळा रचुन छापा कारवाई केली. तेथे प्रशांत उर्फ सलाड सुरेश तायडे वय २७ वर्षे, रा. टिटवाळा, कल्याण,व सोहेल उर्फ पित्तल इरफानअली अन्सारी वय २० वर्षे, रा. भिवंडी यांना ४ किलो ८२७ ग्रॅम वजनाचा गांजा हा अंमली पदार्थ व यामाहा कंपनीची फसिनो स्कुटर या मुद्देमालासह ताब्यात घेतले आहे. त्यांच्या विरुद्ध भिवंडी शहर पोलिस ठाणे येथे गुन्हा नोंद करून अटक केली आहे. विशेष म्हणजे गुन्हे शाखेच्या पथकाकडून आरोपींनी गांजा हा अमली पदार्थ विक्रीसाठी कोठुन आणला याचा शोध घेत असताना आरोपी प्रशांत उर्फ सलाड सुरेश तायडे याचे घरझडती मध्ये एक अवैध माऊझर पिस्टल व एक जिवंत काडतुस आढळून आले आहे.या गुन्ह्यात एकूण ३ लाख ८५ हजार १०० रुपये किमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.या दोन्ही आरोपींना भिवंडी न्यायालयात हजर केले असता २४ सप्टेंबर पर्यत पोलिस कोठडी ठोठावण्यात आली आहे अशी माहिती गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक जनार्दन सोनवणे यांनी शेवटी दिली आहे.

# मुलींसाठी मासिक पाळी आणि स्वच्छतेबाबत जागरूकता कार्यक्रम




**वाडा : वार्ताहर**

उत्कर्ष ग्लोबल फाऊंडेशनच्या वतीने महिलांसाठी एक महत्वाचा सामाजिक उपक्रम घेण्यात आला. वाडा तालुक्यातील शासकीय मुलींचे वसतिगृह येथे आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमात मोठ्या संख्येने युवती उपस्थित होते. कार्यक्रमाचे उद्दिष्ट मासिक पाळीच्या काळातील स्वच्छता, सुरक्षितता आणि सामाजिक अडचणींविषयी जनजागृती करणे हाही होता. यावेळी मुलींना मासिक पाळीच्या काळात योग्य स्वच्छतेसंबंधी सल्ला देण्यात आला तसेच आरोग्य विषयक माहिती पुरवण्यात आली. या प्रसंगी बोलताना डॉ. अपर्णा पाल यांनी सांगितले की, मासिक पाळीमध्ये महिलांना अनेक सामाजिक अडचणींना सामोरे जावे लागते. योग्य माहिती, स्वच्छता आणि सुसंस्कारा यामुळे आरोग्यविषयक समस्या दूर होण्यास मदत होते. कार्यक्रमादरम्यान सहभागी मुली अत्यंत उत्साही दिसल्या आणि या सामाजिक कार्यात मोठ्या प्रमाणत सहभाग घेतला. समाजातील आरोग्यविषयक समस्या दूर करण्यासाठी अशा उपक्रमांचे आयोजन महत्त्वाचे असल्याचे मत उत्कर्ष ग्लोबल फाऊंडेशनच्या वाडा युनिटच्या प्रशिक्षिका प्रणाली (स्मिता) पाटील यांनी व्यक्त केले. वसतिगृहातील मुलींसह प्रभारी दीपाली पाटील व युनिटच्या प्रशिक्षिका मनीषा भोईर उपस्थित होत्या.

29 SEPTEMBER TO 05 OCTOBER 2025 - Page 6 (CRIME SANDHYA):Layout 1 9/27/2025 10:06 PM Page 1



## लातूर जिल्हा पोलीस अधिकारी आणि कर्मचारी पतसंस्थेच्या वतीने मुख्यमंत्री सहायता निधीला १ लाख ११ हजार रुपयांचा धनादेश सुपूर्त



लातूर : वार्ताहर

अतिवृष्टीमुळे नुकसानग्रस्त झालेल्या शेतकऱ्यांना मदतीचा हात पुढे करत लातूर जिल्हा पोलीस अधिकारी व कर्मचारी पतसंस्थेने मुख्यमंत्री सहायता निधीला १ लाख ११ हजार रुपये धनादेश सुपूर्द केला आहे. महाराष्ट्र राज्याचे मा. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा लातूर जिल्ह्यातील अतिवृष्टीने नुकसान झालेल्या भागाचा पाहणी दौरा आयोजित करण्यात आला होता. मागील काही दिवसांपासून राज्यात, विशेषतः मराठवाड्यात पावसानं शेतकऱ्यांचं मोठ नुकसान झालं आहे. या संकटाच्या काळात शेतकऱ्यांना थोडासा मदतीचा हात मिळावा आणि आपणही समाजाचा एक घटक आहोत आपली समाजाशी बांधिलकी आहे. या जाणिवेतून लातूर जिल्हा पोलीस अधिकारी व कर्मचारी सहकारी पतसंस्था यांनी पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांच्या संकल्पनेतून मदतीकरिता खारीचा वाटा उचलण्याचे ठरवले त्याचाच एक भाग म्हणून... लातूर जिल्हा पोलीस अधिकारी व कर्मचारी सहकारी पतसंस्था मर्या. लातूर यांच्या वतीने १,११,१११/- (एक लाख अकरा हजार एकशे अकरा रुपये) इतकी मदत मुख्यमंत्री सहाय्यता निधीत जमा करण्याकरिता धनादेश राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे सुपूर्द करण्यात आला आहे. यावेळी जिल्हा पोलीस अधीक्षक अमोल तांबे, पोलीस पतसंस्थेचे अध्यक्ष परमेश्वर ढेकणे, सचिव नामदेव सारोळे, गोविंद सरोदे, अयुब शेख, खुर्रम काझी, रवी कांबळे, माधव केंद्रे, श्रीमती दीपा शिवलकर व अनुराधा मेहकर हे हजर होते.

## तोतया पोलिसाला विरार पोलिसांनी केली अटक

विरार : वार्ताहर

एका मोठ्या कारवाईत, विरार पोलिस स्टेशनच्या डीबी टीमने एका धूर्त भामट्याला अटक केली आहे जो पोलिस अधिकारी असल्याचे भासवून लोकांकडून पैसे उकळत होता. आरोपीचे नाव ज्ञानेश्वर पाटील (वय ३५, रा. मोरेगाव, नालासोपारा पूर्व) असे आहे. २० सप्टेंबर रोजी विरार पोलिस स्टेशनमध्ये सलग तीन तक्रारी दाखल करण्यात आल्या होत्या, ज्यामध्ये पोलिसांचा गणवेश परिधान केलेला किंवा स्वतःची ओळख पटवून देणारा एक माणूस परिसरातून जाणाऱ्यांना थांबवून त्यांच्याकडून पैसे उकळत असल्याचा आरोप करण्यात आला होता. तक्रारी मिळताच वरिष्ठ पोलिस निरीक्षक लालू तुरे यांनी तात्काळ डीबी टीमला तपास करण्याचे आणि कारवाई करण्याचे आदेश दिले. परिसरातील सीसीटीव्ही फुटेज आणि गोपनीय सूत्रांकडून मिळालेल्या माहितीच्या आधारे, टीमने आरोपीचा माग काढला आणि त्याला नालासोपारा येथे अटक केली.

मिळालेल्या माहितीनुसार, झोन ३ चे पोलीस उपायुक्त सुहास बावचे, सहाय्यक पोलीस आयुक्त बजरंग देसाई यांच्या मार्गदर्शनाखाली, विरारचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक लालू तुरे, सहाय्यक पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर फडतरे, पोलीस उपनिरीक्षक दयानेश्वर कोकाटे, पोलीस कॉन्स्टेबल समीर जाधव आणि सचिन बालीद यांच्या नेतृत्वाखालील विरार पोलिसांच्या पथकाने आरोपीला यशस्वीरित्या अटक केली. पोलिसांनी आरोपींकडून २०,००० रुपये रोख जप्त केले. तपासात असे दिसून आले की पाटील दारू दुकाने सोडणाऱ्या लोकांना लक्ष्य करत होता. तो रस्त्यांवर आणि रस्त्यावर गुटखा थुंकणाऱ्या लोकांना आणि रस्त्यावरून जाणाऱ्यांनाही थांबवत असे आणि त्यांना म्हणत असे की, मोठा साहेब पुढे उभा आहे, चला त्याच्याकडे जाऊया. अशाप्रकारे तो लोकांना धमकावत असे आणि त्यांच्याकडून पैसे उकळत असे. विरार पोलिसांनी आरोपीला न्यायालयात हजर केले आणि त्याला पोलीस कोठडी सुनावली. अधिकाऱ्यांचे म्हणणे आहे की त्याच्याविरुद्ध फसवणूक आणि धमकीच्या गंभीर कलमांखाली गुन्हा दाखल करण्यात आला आहे आणि पुढील तपास सुरू आहे. वरिष्ठ पोलीस निरीक्षक लालू तुरे यांनी नागरिकांना आवाहन केले आहे की, अशा वेशातील पोलिसांपासून सावध राहावे आणि जर कोणताही संशयास्पद व्यक्ती पोलिस असल्याचे सांगून पैसे उकळण्याचा प्रयत्न करत असेल तर त्याची माहिती तात्काळ स्थानिक पोलिसांना द्यावी.

## रत्नागिरीत वर्कशॉपमध्ये घुसून व्यावसायिकाला जबर मारहाण

रत्नागिरी : वार्ताहर

रत्नागिरीच्या एमआयडीसी रेल्वे ब्रिज जवळच्या वर्कशॉपमध्ये घुसून शाहबाद शौकत गोलंदाज (३४) या व्यावसायिकांवर तीन अज्ञात हल्लेखोरांनी हल्ला केला. तसेच त्यांना ठार मारण्याची धमकी दिली. या प्रकरणी रत्नागिरी ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. रत्नागिरीतील कोकण नगर भागात राहणारे शाहबाद शौकत गोलंदाज यांचे एमआयडीसी रेल्वे ब्रिज परिसरात वर्कशॉप आहे. २४/९/ २०२५ रोजी सायंकाळी ४ वाजता त्यांच्या वर्कशॉपमध्ये तीन अनोळखी इसम घुसले व त्यांनी फिर्यादी शौकत याना लाथा बुक्क्यांनी व पाईपने मारहाण केली तसेच ठार मारण्याची धमकी दिली. मारहाणीत त्यांच्या डाव्या कुशीला दुखापत झाली आहे. या प्रकरणी रत्नागिरी ग्रामीण पोलीस ठाण्यात गु.र.क्र. १८४/२०२५, कलम ११८१ ३५२,३५१ २ ३५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून या प्रकरणी पो.उप. निरीक्षक नितीन कदम अधिक तपस करीत आहेत

पान १ वरून....

### एकांतात गाठून त्याने अचूक साधला...

ही आपल्या मोबाईलवरून कोणाशी तरी बोलत होती. एकदा त्याने तिच्या माघारी तिचा मोबाईल चेक असता तिच्या मोबाईलवर आपल्याच भावकीतील महांतेश बुकनट्टी याचे वारंवार फोन येत होते. तसेच अक्षता ही त्याच्याशीच फोनवर बोलत असल्याची त्याला दिसून आले. तसेच ते दोघे ही बाहेर भेटत होते आणि आपण घरी नसताना महांतेश हा घरी येवून अक्षता हिच्याशी लगट करीत असल्याची माहिती त्याला मिळाली. या कारणातून बसवराज आणि त्याची पत्नी अक्षता याची रोज भांडणे होत होती. या भांडणात बसवराज हा तिला अर्वाच्च भाषेत शिव्या देत मारहाण करीत होता. त्याचा तिच्यावरील संशय खरा ठरत असल्याने त्याच्या पायाखालची जमीनच सरकली होती. आपली पत्नी आपल्या माघारी भाऊबंदातील तरूणाच्या नादी लागून गुलछर्रे उडवित आहे हे तो सहन करू शकत नव्हता. यातच संपुर्ण भावकीतच आता अक्षता आणि महांतेश याच्या त्या संबंधाची चर्चा होऊ लागली होती.या चर्चेने बसवराज याला मान खाली घालावी लागत होती. त्याच्या डोक्यातील किड काही जात नव्हती. तो भांडणात अक्षताला महांतेशचा नाद सोडून दे. संसाराकडे लक्ष दे असे सांगत होता. परंतु ती काही कोणाचे ऐकत नव्हती. बायको ऐकत नाही म्हणून त्याने एकदा दोनदा महांतेशला एकटे गाठून आपल्या बायकोच्या नादाला लागू नकोस, तिचा नाद सोड नाही तर त्याचे परिणाम गंभीर होतील अशी धमकी ही दिली होती. परंतु दोघे ही त्या संबंधात चटावलेले असल्याने दोघे ही एकमेकांचा नाद सोडायला तयार नव्हते. यातच अक्षदा ही बसवराज याच्याबरोबर वारंवार भांडण काढून सारखी चिक्कोडी येथील आपल्या माहेरी निघून जात होती. ती चिक्कोडीला गेली की महांतेश हा तेथे ही तिला भेटायला जात असल्याची माहिती बसवराज याला मिळाली होती. त्यामुळे तो आता दोघांच्यावर ही चिडून होता. दोघांचे अनैतिक विवाहबाहय संबंध फार पुढे गेले आहेत हे त्याने ओळखले होते. अक्षताच्या माहेरच्या लोकांनी मात्र तिला समजावण्या ऐवजी बसवराज यालाच उलटे बोलत सुनावत चार शहाणपणाच्या गोष्टी सांगून अक्षतावर उगाच संशय घेऊ नकोस असे सांगितले होते. त्यातच अक्षताच्या माहेरच्या लोकांनी भांडणात या कारणातून बसवराज यालाच मारहाण केलेली होती. त्यामुळे त्याचे डोके सणकलेच होते. काही करून आपल्या संसाराचे वाटोळे करणाऱ्या महांतेशला आणि बायको अक्षता हिला सोडयाचे नाही हे त्याने ठरविले. त्यातच मागील एक दोन महिन्यापूर्वी त्याला त्याच्याच घरात महांतेश आणि अक्षता हे दोघे नको त्या अवस्थेत दिसले होते. त्याने त्या दोघांना रंगेहात पकडल्यावर महांतेशला तर त्याने तंबी देवून मारहाण केलीच पण बायको अक्षता हिला ही जबर मारहाण करून तिला तिचा जीव नकोसा करून टाकला होता. या भांडणात अक्षता ही मुलाला सोडून माहेरी चिक्कोडीला आलेली होती. ते दोघे ही बसवराज याला रंगेहात सापडल्यावर बसवराज याची पार अब्रु गेली होती. त्याने आता महातेंशला कायमचे संपवायचे असा विचार केला. कारण बायको अक्षता आणि तो ही एकमेकापासून दुर व्हायला तयार नव्हते. त्याच्या त्या संबंधामुळे बसवराज याला जास्तच दारूचे व्यसन लागले होते. महांतेशची कशी गेम करायची याचा तो विचार करीत असताना त्याने याबाबत आपला दुसरा भाऊबंद विठ्ठल बुकनट्टी याला विश्वासात घेतले. त्याने महांतेश याची गेम करायची आहे मला मदत कर असे सांगितले. विठ्ठल बुकनट्टी हा त्याचा भाऊबंद असल्याने त्याला ही बसवराज याची बायको अक्षता आणि भाऊबंदातील महांतेश याच्या त्या संबंधाची पुर्णपणे माहिती होती. त्यामुळे तो ही बसवराज याला मदत करण्यास तयार झाला. ते दोघे ही एकत्र दारू प्यायला बसत असल्याने दारू पित असताना त्यांनी महांतेश याला कसे मारायचे याचा प्लॅन केला. महांतेश हा बेळगावीहून रात्री ८ ते ९ च्या दरम्यान शहाबंदर येथे बसने येत असतो याची त्यांना माहिती होती. बसमधून उतरल्यावर तो पाय वाटेने मळयातील घराकडे जात असतो रात्रीच्या अंधारात मळ्यातील वाटेवर कुणी नसताना त्याची गेम करायची असा प्लॅन केला. बुधवार दि.१७ सप्टेंबर २०२५ महांतेश हा येण्या आधी त्या दोघांनी फुल्ल दारू प्याली. रात्री ८.३०च्या दरम्यान महांतेश हा बसने उतरून पाय वाटेने आपल्या घराकडे चालला होता. त्यावेळी रात्रीच्या अंधारात दबा धरून बसलेले बसवराज आणि विठ्ठल यांनी त्याला मागून गाठले. महांतेश हा पुढे बघून घराकडे चालला होता. त्याच वेळी मागून आलेल्या बसवराज याने महांतेशच्या मानेवर आपल्याकडील कोयत्याने वार करीत कन्नडमध्ये शिवी देत माझ्या बायकोबरोबर संबंध ठेवतोस काय? इग सायी मग्नान्ना असे म्हटले. त्याचेवळी बसवराज याने परत त्याच्या छातीवर हातावर कोयत्याने वार केले. त्यासरशी महांतेश हा रक्ताच्या थारोळ्यात ओरडत खाली पडला. त्यावेळी पाय वाटेवर कुणीच नसल्याने आणि रस्त्यावर संपुर्ण अंधार असल्याने महांतेशच्या ओरडण्याचा काहीच फायदा झाला नाही. त्याला मारून दोघे ही तेथून पळून गेले. रात्री उशिरा पाय वाटेने जाणाऱ्या एकाला रक्ताच्या थारोळ्यात पडलेला महांतेशचा मृतदेह दिसला. त्याने या घटनेची माहिती महांतेशच्या घराच्या लोकांना दिल्यावर महांतेशची आई बहिणी ओरडतच घटनास्थळी आले. लागलीच या घटनेची माहिती लोकांना समजल्यावर त्यांनी ही घटनास्थळी गर्दी केली. कुणी तरी या घटनेची माहिती यमकनमर्डी पोलीसांना दिल्यावर पोलीस ही तातडीने घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी घटनेचा पंचनामा करून या घटनेची माहिती घेतली. मयत महांतेशच्या घरच्या लोकांनी दिलेल्या माहितीवरून महांतेश याचा खून नात्यातीलच बसवराज बुकनट्टी याने केल्याची माहिती पोलीसांना मिळाली. बसवराज बुकनट्टी याच्या बायकोवर महातेश याचे विवाहबाहय संबंध असल्याची शंका बसवराज याला असल्याने त्याने त्याचा खून केला असावा अशी शंका महांतेशच्या नातलगांनी बोलून दाखवली. पोलीसांनी घटनेचा आणि घटना स्थळाचा पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदनासाठी यमकनमर्डी येथील सरकारी रुग्णालयात पाठवून दिला. या घटनेनंतर बसवराज हा पळून गेला होता. त्याचा शोध पोलीस घेत होते. घटनास्थळी जिल्हा पोलीस प्रमुख डॉ.भीमाशंकर गुळेद यांनी भेट देवून या घटनेची माहिती घेतली. त्यांनी पोलिसांना तपासाच्या योग्य त्या सुचना दिल्या. यमकनमर्डी पोलीस बसवराज याचा शोध घेत होते. त्यातच बसवराज याची बायको अक्षता ही त्याच्याशी भांडण करून तिच्या माहेरी चिक्कोडी येथे गेल्याचे आणि तिला ही मारण्यासाठी बसवराज हा चिक्कोडी येथे गेल्याची माहिती पोलीसांना मिळाली. बसवराज हा चिक्कोडी येथे जावून त्याची बायको अक्षता हिचा ही खून करणार असल्याची यमकनमर्डी पोलीसांना माहिती मिळताच ते सर्तक झाले. त्यांनी चिक्कोडी पोलीसांशी संपर्क साधत बसवराज याचा शोध घेण्याची विंनती त्यांना केली. म्हणून चिक्कोडी पोलीसांनी बसवराज याची पत्नी अक्षता हिच्याशी संपर्क करून तिला सर्तक करीत सावध राहण्यास सांगितले. तिने ही चिक्कोडी पोलीसांना सांगितले की, तिचा पती तिचा शोध घेत तिच्या माहेरच्या घराकडे आला होता. त्यावेळी त्याने दारूच्या नशेत तिच्या घराचा दरवाजा दोन तीन वेळा ठोठावला, परंतु तिने त्यावेळी दरवाजा न उघडल्याने तो तेथून परत गेला आहे. ही माहिती मिळताच चिक्कोडी पोलीसांनी बसवराज याचा शोध चालू केला. पोलीस त्याचा शोध घेत असताना पोलिसांना तो चिक्कोडी येथील एका लॉजमध्ये दारूच्या नशेत सापडला. पोलीसांनी त्याच्याकडील पिशवीतील वस्तुची पाहणी केली असता त्याच्या पिशवीत रक्ताने माखलेला कोयता होता. चिक्कोडी पोलीसांनी त्याला ताब्यात घेऊन त्याच्याकडे आधिक चौकशी केली असता त्याने हुक्केरी तालुक्यातील शहाबंदर येथे काल रात्रीच आपण आपल्या नात्यातील चुलत भाऊ महांतेश बुकनट्टी याचा खून करून आल्याचे सांगितले. त्याचे आपली बायको अक्षता हिच्याशी विवाहबाहय संबंध होते. ते दोघे ही मला रंगेहात सापडल्याने मी चिडून त्याचा कोयत्याने खून केला असून आता मी माझी बायको अक्षता हिला ही मारून टाकणार असल्याचे सांगितले. त्याने आपला गुन्हा कबुल केल्याने चिक्कोडी पोलीसांनी त्याला यमकनमर्डी पोलीसांच्या ताब्यात दिले. यमकनमर्डी पोलीस या घटनेचा तपास करीत असताना बसवराज याला मदत करणाऱ्या विठ्ठल बुकनट्टी याला ही ताब्यात घेतले होते. त्याने ही आपल्या गुन्हयाची कबुली दिली होती. या घटनेची फिर्याद यमकनमर्डी पोलीसात महांतेश बुकनट्टी याच्या आईने दिल्याने तिने दिलेल्या फिर्यादीनुसार महांतेश सिध्दाप्पा बुकनट्टी (वय २४) रा.शहाबंदर हुक्केरी याच्या खून प्रकरणी बसवराज बुकनट्टी (वय ३०) त्याचा नातलग विठ्ठल बुकनट्टी (वय २८) या दोघांच्या विरोधात आयपीसी कलम १०३(१) प्रमाणे गुन्हा दाखल करून त्यांना हुक्केरी येथील कोर्टात पोलीसांनी उभे केले असता मा.कोर्टाने या दोघाची ही जेलमध्ये रवानगी केली.या दरम्यान पोलीसांनी बसवराज याच्याकडून गुन्हयात वापरलेला कोयता जप्त केला. या घटनेचा तपास यमकनमर्डी पोलीस स्टेशनचे पो.निरी. जावेद मुशापुरी याच्या मार्गदर्शनाखाली पोलीसांनी केला. विवाहबाहय संबंधातील नात्यात महिला जर वाहवत गेली तर नवरा बायकोची भांडणे ही विकोपाला जात असतात त्यातून नवऱ्याची जर सटकली तर खूनाची घटना ही घडतेच हेच या घटनेवरून दिसून येते.

### पित असताना काहीतरी गडबड ...

उर्फ देवा बहिरम आणि विकास महाले नेहमीप्रमाणे एकत्र कामाला गेले. कामावर सुट्टी झाल्यानंतर घरी न येता श्रमपरिहारासाठी एकत्र दारू पिण्यासाठी बसले. त्यानंतर दोघे जण आपापल्या घरी गेले. देविदास हा हात-पाय धुवून विश्रांती घेत बसला होता. तोच तासाभरानं विकास हा देविदासच्या घरी आला. दारात देविदासची भावजय पिंटीबाई उर्फ छोटीबाई ही उभी होती. तिच्याकडे विकासने देविदासबद्दल विचारणा केली, तेंव्हा तिने देविदास घरात बसल्याचे सांगितले. विकासने त्याला बाहेरूनच हाक मारली. विकासची हाक ऐकताच देविदास घरातून बाहेर आला. बाहेर विकास उभा असल्याचे दिसताच तो त्याच्याजवळ गेला, तेंव्हा विकासने त्याला हलक्या आवाजात काहीतरी सांगितले. देविदास तेंव्हा बनियनवर होता. त्याने घरात जावून अंगावर शर्ट-पँट चढवले आणि बाहेर येवून तो विकासबरोबर गेला. त्यावेळी त्याने आपण कुठे जात आहोत, काय करायला जात आहोत हे घरी सांगितले नव्हते. भावजय पिंटीबाईला मात्र तो आपला मित्र विकास महालेबरोबर गेल्याचे माहिती होते. रात्रीचे साडेआठ वाजले होते. देविदास अजूनही घरी आला नव्हता, त्याची सगळे जण वाट पहात बसले होते. देविदासची भावजय पिंटीबाई ही घराबाहेर आली तेंव्हा तिला विकास महाले हा झिंगलेल्या अवस्थेत घराकडे येत असलेला दिसला. बाहेर अंधार होता तरीही अंधुकशा उजेडात तो विकास महाले असल्याचे पिंटीबाईने पाहिले. तो येतोय म्हटल्यावर त्याच्यापाठोपाठ देविदास असेल म्हणून ती बाहेरच थांबली. थोड्याच वेळात विकास तिच्याजवळ येवून पोहोचला आणि त्याने तिच्या हातात देविदासचा मोबाईल दिला आणि तो परत जावू लागला. दोन तासापूर्वी विकासबरोबरच देविदास गेला होता, पण आता तो दिसत नाही म्हटल्यावर पिंटीबाईने विकासला विचारले, 'देविदास तुझ्याबरोबर गेला होता? आता तो कुठे आहे?' यावर विकासने 'मला माहित नाही' असे उत्तर दिले आणि तो घाई-घाईने निघून गेला. त्याचे ते वागणे पिंटीबाईला विचित्र आणि संशयास्पद वाटले. काहीही न बोलता तो देविदासचा मोबाईल देवून पळून गेला होता. तिने घरात बसलेल्या सतनाम नावाच्या आपल्या मुलाला हाक मारून बाहेर बोलावले आणि ती सतनामला घेवून विकास महाले ज्या दिशेने गेला त्या दिशेने झपाझप चालू लागली. काही अंतरावर विकास जमिनीवर पडलेल्या कुणाला तरी दगडाने मारत होता. पिंटीबाई त्याठिकाणी गेली आणि जवळून पाहिले असता जमिनीवर पडलेला तो माणूस तिचा दीर देविदास होता आणि त्याचा मित्र विकास महाले हा भला मोठा दगड घेवून देविदासच्या डोक्यावर मारत होता, त्यामुळे देविदासच्या डोक्याला भली मोठी जखम होवून रक्ताच्या थारोळ्यात बेशुद्ध अवस्थेत पडला होता. ते दृष्य पाहून पिंटीबाई विकास याच्यावर संतापात जोरात ओरडली. त्या आवाजाने विकास भानावर आला. त्याला पिंटीबाई आणि सतनामने पकडण्याचा प्रयत्न केला, पण त्या दोघांच्या हाताला जोराचा झटका देवून अंधाराचा फायदा घेत विकास महाले पसार झाला. पिंटीबाईने आरडाओरडा करत परिसरातील माणसे गोळा केली. त्यांच्या मदतीने देविदासवर औषधोपचार करण्यासाठी ती आणि तिचा पती गोटू यांनी गंभीर अवस्थेतील देविदास बहिरम याला शिरपूर येथील कॉटेज हॉस्पिटलमध्ये नेले. शिरपूरच्या कॉटेज हॉस्पिटलमध्ये उपचार घेत असतांना अतिरक्तस्त्रावामुळे - देविदासची प्रकृती अधिक गंभीर झाली म्हणून तेथील वैद्यकीय अधिकाऱ्यांनी पुढील उपचारार्थ देविदास बहिरम याला धुळे जिल्हा शासकीय रूग्णालयात नेण्याचा सल्ला दिला. गोटू बहिरम यांनी रूग्णवाहिका आणून देविदास बहिरम याला रूग्णवाहिकेद्वारे धुळे जिल्हा शासकीय रूग्णालयात आणले त्यावेळी रात्रीचे अकरा वाजले होते. शासकीय रूग्णालयात आणताच तेथील वैद्यकीय अधिकाऱ्यांनी देविदासची प्राथमिक तपासणी केली असता देविदासची प्राणज्योत रस्त्यातच मालवली असल्याचे सांगितले. देविदास आपल्याला सोडून गेला म्हणताच पिंटीबाई आणि गोटू बहिरम यांनी छाती बडवत हंबरडा फोडला. शिरपूर कॉटेज हॉस्पिटलमधून धुळे जिल्हा शासकीय रूग्णालयात उपचारार्थ देविदास बहिरम याला आणतांना गोटू बहिरम आणि पिंटीबाई बहिरम यांच्यासोबत असणारे चुनीलाल मोतीराम गायकवाड, आनंदराव राऊत, सौरव गोकुळ बहिरम, अमित काळू बहिरम यांनी गोटू बहिरम आणि पिंटीबाई बहिरम यांना सावरून धीर दिला. दुसऱ्या दिवशी म्हणजे मंगळवारी दि. ८ जुलै २०२५ रोजी दुपारी ११ वाजता पोस्टमार्टम करून देविदास बहिरम याचा मृतदेह त्याचा भाऊ गोटू बहिरम व इतर नातेवाईकांच्या ताब्यात दिला. झेंडेअंजन गावात शोकाकुल वातावरणात देविदास बहिरम याच्या मृतदेहावर अंत्यसंस्कार करण्यात आले. या घटनेची प्रत्यक्षदर्शी साक्षीदार पिंटीबाई उर्फ छोटीबाई हिने सांगवी पोलीस स्टेशनला दिलेल्या फिर्यादीनुसार गुन्हा रजि. नं. १९०/२०२५ अन्वये भारतीय न्यायसंहिता २०२३ चे कलम १०३ (१) प्रमाणे दि. १८ जुलै २०२५ रोजी विकास महाले याच्याविरूद्ध खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला. विकास महाले याच्याविरूद्ध खुनाचा गुन्हा दाखल होताच सांगवी पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक जयपाल हिरे यांनी आपल्या सहकाऱ्यांच्या मदतीने संशयित आरोपी विकास महाले याचा शोध घेवून त्याच्या हातात बेड्या ठोकल्या व त्याला गजाआड केले. हे प्रकरण शब्दबद्ध होईपर्यंत विकास विजय महाले याने आपल्या मित्राच्या म्हणजे देविदास बहिरम याच्या डोक्यात दगड मारून त्याचा खून का केला? याचा उलगडा झाला नाही. मी इतकी दारूप्राशन केली होती की या प्रकरणाचे काहीच आठवत नाही असे संशयित आरोपी विकास महाले याचे म्हणणे आहे. देविदासच्या मस्तकात विकास महाले याने दगड का मारला याचे कारण अद्याप गुलदस्त्यातच असल्याने ते शोधून काढण्याचं आव्हान शिरपूर तालुका अर्थात सांगवी पोलिसांसमोर आहे.

पान ८ वरून....

### नैसर्गिक संकटातील शेतकऱ्यांना...

अनेक पदाधिकारी उपस्थित होते. दरम्यान धाराशिव चे खासदार ओमप्रकाश निंबाळकर यांनी अत्यंत धाडसाने पाण्यात सापडलेल्या नागरिकांचा जीव वाचवण्याचा केलेला प्रयत्न आणि स्वतःच्या जीवाची पर्वा न करता अतिवृष्टीने नुकसान झालेल्या भागाची पाहणी करीत असताना केलेले धाडस हे कौतुकास पात्र आहे असे सांगून जनतेच्या प्रश्नाची जाण असणारा खासदार तुम्हाला मिळाला आहे असे सांगितले. दरम्यान काटगाव येथील नुकसानग्रस्त शेतकऱ्यांची व ग्रामस्थांशी उद्धव ठाकरे यांनी संवाद साधला.

### 'स्वस्थ नारी सशक्त परिवार'...

त्याचबरोबर पीएम-जय व आभा कार्ड काढून देण्यात आले. शिबिरात एकूण ११९ रुग्णांची तपासणी करण्यात आली. त्यापैकी ९८ महिला, २१ पुरुष, तसेच ४५ गरोदर मातांची तपासणी झाली. ९५ जणांचे रक्तदाब आणि ९५ मधुमेह तपासणी, ९८ मुखाचा तसेच स्तनांचा कॅन्सर तपासणी, ३६ सिकल सेल तपासणी, ४० हिमोग्लोबिन तपासणी, ३ टीबी तपासणी तर ३० जणांना आयुष्यमान भारत कार्ड देण्यात आले. याशिवाय ९८ महिलांना समुपदेशन सेवा पुरविण्यात आली. या उपक्रमाद्वारे ग्रामीण भागातील महिलांना आरोग्य तपासणीबरोबरच आहार, स्वच्छता, मासिक पाळीतील काळजी आणि संतुलित जीवनशैलीबाबत मार्गदर्शन मिळाले. स्वस्थ नारी - सशक्त परिवार या अभियानाचा खरा संदेश सोमटा येथे शिबिरातून पोहोचविण्यात आला.

### गणेश नाईक यांची राष्ट्रीय पोषण ...

७ पर्यवेक्षकांनी विविध पौष्टिक पदार्थ बनवण्यात घेतलेल्या सहभागाबद्दल पालकमंत्री गणेश नाईक यांनी अंगणवाडी सेविकांचे कौतुक केले. स्वस्थ नारी सुरक्षित परिवार या आरोग्य अभियाना अंतर्गत अत्याधुनिक HEALTHCARE मशीनद्वारे नागरिकांच्या एकाच वेळी १६ आरोग्य तपासण्या करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. BP, SUGER, HB, URIC ACID अशा चाचण्यांचा रिपोर्ट मोबाईलद्वारे नागरिकांना देण्याची सुविधा पुरविण्यात आली आहे.

### वाडा नगरपंचायतीच्या करवाढीविरोधात...

नगरपंचायत प्रशासन जबाबदार राहील, असे निवेदनात स्पष्ट करण्यात आले आहे. याप्रसंगी गणेश पाटील, प्रमोद घोलप, अमीन शेंद्र, निलेश पाटील, सुशील पातकर, कांतीकुमार ठाकरे, देवेंद्र भानुशाली, युवराज ठाकरे आणि महाविकास आघाडीचे कार्यकर्ते उपस्थित होते.

### भिवंडी वाडा रस्त्याच्या दुरावस्थेला शिंदे ...

व भ्रष्ट ठेकेदारांवर कारवाई करून त्यांना काळ्या यादीत टाकावे, खडेमुक्त सुरक्षित रस्ता करण्यात यावा या प्रमुख मागणीसाठी हे आमरण उपोषण असून जोपर्यंत मागण्या मान्य होत नाही तोपर्यंत हे उपोषण सुरूच राहणार असा इशारा देखील पवार यांनी दिला आहे. शिंदे सेनेचे उपनेते असलेले निलेश सांबरे यांच्या जिजाऊ कन्स्ट्रक्शन कंपनीला २४ एप्रिल २०२३ रोजी तीन कोटी ६२ लाख व त्यानंतर सात कोटी दहा कोटी अशा प्रकारचे एकूण ४६ कोटी रुपयांच्या रस्ता दुरुस्तीचा ठेका देण्यात आला आहे. ठेका देतांना शासनाने ठेकेदाराला पाच वर्षाचा दोष दायित्व कालावधीचा नियम घालून दिला होता. त्यानुसार पाच वर्षे रस्त्याची निगा राखण्याची व दुरुस्ती करण्याची जबाबदारी जिजाऊ कंस्ट्रक्शन कंपनीवर होती. या दुरुस्ती दरम्यान ३१ ऑगस्ट २०२३ रोजी २२ वर्षीय तरुण आकाश जाधव याचा दुर्दैवी मृत्यू झाला. या मृत्यू प्रकरणी जिजाऊ कंस्ट्रक्शन कंपनीच्या ठेकेदारावर ९ सप्टेंबर २०२३ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला. या घटनेच्या निषेधार्थ स्थानिकांनी आंदोलन केल्याने १७ डिसेंम्बर २०२३ रोजी अधिवेशनात आ प्रवीण दरेकर यांनी सभागृहाचे लक्ष वेधून जिजाऊ कंस्ट्रक्शन कंपनीला काळ्या यादीत टाकण्याची मागणी केली. या मागणीची दखल तत्कालीन सार्वजनिक मंत्री रवींद्र चव्हाण यांनी घेत जिजाऊ कंस्ट्रक्शन कंपनीला काळ्या यादीत टाकण्याची घोषणा केली. या संदर्भातील प्रस्ताव कोकण विभागीय अधीक्षक अभियंता यांनी १५ जानेवारी २०२४ रोजी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सचिवांकडे सादर केला. असे असतांनाही या ठेकेदार कंपनीवर कोणतीही कारवाई न होता उलट आठ महिन्या नंतर ६ ऑगस्ट २०२४ रोजी निलेश सांबरे यांच्या जिजाऊ कंपनीला नवीन ४० कोटी रुपयांचे भिवंडी वाडा रस्ता दुरुस्तीचा ठेका मिळाला.त्यामुळे यात मोठा भ्रष्टाचार झाल्याचा आरोप प्रमोद पवार यांनी पत्रकार परिषदेत केला.

### उत्तर प्रदेशातील कानपुर व शहाजानपूर ...

केल्यामुळे राज्यात धार्मिक तणाव वाढत आहे. या सर्व प्रकरणाची गांभीर्याने दखल घेऊन तात्काळ कठोर कारवाई करावी, अशी मागणी समस्त मुस्लिम समाजाच्या वतीने निवेदनाद्वारे देवणी तहसील, कार्यालयामार्फत महामहीम राष्ट्रपती, पंतप्रधान, मुख्यमंत्री यांच्याकडे केली. यावेळी सहाय्यक पोलीस निरीक्षक भीमराव गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली चौख बंदोबस्त ठेवण्यात आला होता. या मोर्चात फय्याज भाई शेख, मैनोदीन शेख, मौलाना अजम शेख, हाफ़िज आलमखां पठाण, हाफ़िज युनूस उंटवाले, माजीद तांबोळी, इस्माईल तांबोळी, अहमद सय्यद, सलीम उंटवाले जावेद येरोळे, नदीम मिर्झा, जमीर तांबोळी, बुधलेघर जिलानी, नवाज बुधलेघर फयाज, बुधलेघर युनुस, पठाण फैजुल्लाहखां, सादक खुरेशी, अल्ताफ खुरेशी, मल्लेवाले सुलतान उंटवाले उबेद यांच्यासह मुस्लिम बांधव उपस्थित होते.

# सोलापूर जिल्हा परिषदेच्या अनुकंपा भरतीचे काम राज्यात आदर्श -जयकुमार गोरे

**सोलापूर : इरप्पा बोरीकरजगी**



सोलापूर जिल्हा परिषदे सोलापूरचा वतीने ४४ कर्मचाऱ्यांना अनुकंपा तत्वावर नियुक्तीचे आदेश राज्याचे ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांचे हस्ते प्रदान करण्यात आले. याप्रसंगी आमदार राणाजगजितसिंह पाटील, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहिणकर, उपमुख्य कार्यकारी अधिकारी स्मिता पाटील, विशेष कार्यकारी अधिकारी ज्ञानदेव घुले, उपमुख्य कार्यकारी अधिकारी सुर्यकांत भुजबळ, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रभारी प्रकल्प संचालक अमोल जाधव, मुख्य लेखा व वित्त अधिकारी मिनाक्षी वाकडे, शिक्षणाधिकारी सचिन जगताप, शिक्षणाधिकारी कादर शेख, जिल्हा कार्यक्रम अधिकारी प्रसाद मिरकले प्रमुख उपस्थित होते. या प्रसंगी बोलताना राज्याचे ग्रामविकास व पंचायतराज मंत्री तथा सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे म्हणाले, राज्यात १०० दिवस कार्यक्रम अंतर्गत अनुकंपा पदभरती पारदर्शक पण राबविणेत आली. सोलापूर जिल्हा परिषदेने यात आघाडी घेत सर्व अनुकंपा अंतर्गत १०० टक्के जागा भरून उत्कृष्ठ काम केले आहे. जिल्हा परिषदेच्या सिईओ हे जर प्रशासक असतील तर किती चांगले प्रकारे काम करू शकतात याचे हे आदर्श उदाहरण आहे. समुपदेशन करून पदस्थापना देणेत आली ही बाब कौतुक करणारी आहे.

अनुकंपा भरती प्रक्रियेत जिल्हा परिषद सोलापूरचे पारदर्शक पाऊल टाकत ४४ पदांची यशस्वी समुपदेशनाद्वारे भरती केल्याने मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम व उपमुख्य कार्यकारी अधिकारी स्मिता पाटील यांनी राबविल्याल्या नाविन्यपूर्ण पॅटर्नचे राज्याचे ग्रामविकास व पंचायतराज मंत्री जयकुमार गोरे यांनी कौतुक केले असतानाच आज नियुक्ती पत्र दिलेले कर्मचारी यांचे हातात नियुक्तीचे आदेश हातात प्रदान करताच आनंदाश्रु तरळले..! प्रारंभी सिईओ कुलदीप जंगम यांनी मुख्यमंत्री समृध्द पंचायतराज अभियानाचा बॅच लावून व पुस्तक भेट देऊन पालकमंत्री जयकुमार गोरे यांचे स्वागत केले. सिईओ कुलदीप जंगम म्हणाले, अनुकंपा तत्वावर भरती ही एक संवेदनशील प्रक्रिया असून तिच्या अंमलबजावणीत पारदर्शकता आणि न्यायाचा तत्वधाराच असणे आवश्यक असते. याच अनुषंगाने जिल्हा परिषदेने संपूर्ण प्रक्रिया वर्तमानपत्र जाहिरात, अर्ज छाननी, सूची प्रसिद्धी आणि प्रत्यक्ष समुपदेशन अशा टप्प्यांमधून पार पाडली. यामध्ये कोणतीही अस्पष्टता न ठेवता, अर्जदारांना संधी आणि माहिती दोन्ही समप्रमाणात उपलब्ध करून देण्यात आली आहे. मोहिम पातळीवर काम करून ही प्रक्रिया पार पाडली असल्याचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांनी आपल्या प्रास्तविक भाषणात सांगितले. मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांचे आणि उपमुख्य कार्यकारी अधिकारी स्मिता पाटील यांचे यामध्ये विशेष योगदान राहिलेले राज्याचे ग्रामविकास व पंचायतराज मंत्री जयकुमार गोरे यांनी सन्मानपत्र देऊन गौरव केला. सिईओ कुलदीप जंगम व त्यांचे सहकारी अधिकारी व कर्मचारी यांनी संपूर्ण प्रक्रिया पारदर्शक, तांत्रिकदृष्ट्या सक्षम आणि वेळेवर पार पाडल्या बद्दल अभिनंदन केले. सुत्रसंचालन जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक सचिन जाधव यांनी केले.

सदर अनुकंपा भरती प्रकियेसाठी प्रशासन अधिकारी अविनाश गोडसे, सचिन साळुंखे प्रदीप सगट, महेश केंद्रे, शिवाजी राठोड, मोहित वाघमारे, कृष्णकांत लोंढे, अरविंद सोनवणे, संतोष शिंदे, तुषार इटकर, किरण जाधव, ऋषिकेश जाधव, इराण्णा भरडे, हनुमंत गायकवाड, कृष्णा आधटराव, रोहीत शिंदे, गणेश वटवटे, आदम नाईक यांनी परिश्रम घेतले. उप मुख्य कार्यकारी अधिकारी स्मिता पाटील यांनी आभार मानले. मुख्यमंत्री समृध्द पंचायतराज अभियान प्रभावी पण राबवा-पालकमंत्री जयकुमार गोरे मुख्यमंत्री समृध्द पंचायतराज अभियान प्रभावी पण राबवा. सोलापूर जिल्हा हा राज्यात या अभियानात आघाडीवर असायला हवा. जिल्ह्यात परिस्थिति असलेमुळे या अभियानाची गती मंदावली असली तरी पुरं ओसरलेनंतर या अभियानास गती द्या, असे आवाहन पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी व्यक्त केले.

# भिवंडी पालिका महाश्रमदान 'एक दिवस, एक तास, एक साथ' या उपक्रमाअंतर्गत स्वच्छता मोहीम संपन्न



**भिवंडी : वार्ताहर**

राज्यात १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर दरम्यान 'स्वच्छता ही सेवा अभियान २०२५' सुरू असून, या अभियानाअंतर्गत भिवंडी महानगरपालिकेचे प्रशासक तथा आयुक्त अनमोल सागर यांच्या मार्गदर्शनाखाली गुरुवारी भिवंडी पालिकेत महाश्रमदान - 'एक दिवस, एक तास, एक साथ' या उपक्रमाअंतर्गत स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. या स्वच्छता कार्यक्रमामध्ये अंजूरफाटा ते वंजारपट्टी नाका, वंजारपट्टी नाका ते ग्रीन लँड हॉटेल, वंजारपट्टी नाका ते छत्रपती शिवाजी महाराज चौक, स्व. आनंद दिघे चौक ते साईबाबा मंदिर रांजणोली नाका या मुख्य रस्त्यांवर तसेच स्व. हिंदुहृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे उड्डाणपूल, स्व. राजीव गांधी उड्डाणपूल, ए.पी.जे. अब्दुल कलाम उड्डाणपूल इत्यादी ठिकाणी स्वच्छता अभियान राबविण्यात आले. या उपक्रमात सहायक आयुक्त (आरोग्य) शैलेश दोंदे, आरोग्य विभाग प्रमुख फैसल तातली, मुख्य आरोग्य निरीक्षक जे. एम. सोनावणे, माजी नगरसेवक, स्वयंसेवी संस्था, आणि नागरीक देखील मोठ्याप्रमाणात सहभागी झाले होते. तर प्रभाग समिती स्तरा वरील कार्यक्रमात सहायक आयुक्त तथा प्रभाग अधिकारी प्रभाग समिती क्र. एक चे मकसूम शेख, प्रभाग समिती क्र. दोनचे माणीक जाधव, प्रभाग समिती क्र.तीनचे सुरेंद्र भोईर, प्रभाग समिती क्र. चार चे गिरीष घोष्टेकर, प्रभाग समिती क्र. पाच चे सईद चिवणे, हरीष भंडारी तसेच इतर विभागांचे विभाग प्रमुख, कर्मचारी आणि ४०० सफाई कर्मचारी सहभागी झाले होते.



# प्लेग्रुपमध्ये नियमबाह्य कृत्याबद्दल मनसेचे निवेदन

उल्हासनगर : उल्हासनगर, अंबरनाथ मोठ्या प्रमाणात प्लेग्रुप चालतात. उल्हासनगर मध्ये प्ले ग्रुपमध्ये झालेल्या प्रकरणात मनसे कडून संचालकाला जाब विचारन्यात आला. ह्या पद्धतीने चालवणाऱ्या प्लेग्रूपवर कारवाई करण्याची मागणी मनसे जिल्हाप्रमुख बंडू देशमुख यांचे कडून करण्यात आली. जर या पुढे कुठल्याही प्लेग्रुप मध्ये असे काही घडले तर मनसे तर्फे तीव्र उत्तर दिले जाईल. उल्हासनगर कॅम्प नं. ४ परिसरातील प्लेग्रूपमध्ये, बाळ टाळ्या वाजवीत नाही म्हणून शिक्षिकिणे लगावल्या काणाखाली. व्हिडीओ प्रसारित होताच पालकांच्या तक्रारी नुसार विठ्ठलवाडी पोलीस स्टेशन मध्ये शिक्षिकेवर गुन्हा दाखल करण्यात आला. मनसेने विठ्ठलवाडी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अशोक कोळी यांना निवेदन देत संचालकावर गुन्हा दाखल करण्याची मागणी केली. उल्हासनगर, अंबरनाथ असो वा बऱ्याच शहरी भागात अवैध प्लेग्रुप चालवले जात असल्याचा आरोप मनसे जी. प्रमुख बंडू देशमुख यांनी केला. प्लेग्रुप मधील शिक्षक व इतर कर्मचारी यांची पोलीस पडताळणी बंधनकारक करण्यात यावी, तसेच या प्लेग्रूप मधील शिकवणारे शिक्षक व कर्मचारी हे मानसिक दृष्ट्या सक्षम असल्याचे प्रमाणपत्र सक्तीचे करण्यात यावे. अश्या कडक उपाययोजना करणे आवश्यक आहे.

# मुस्लिम समजातर्फे अहमदपुरात आक्रोश मोर्चा

**अहमदपूर : वार्ताहर**

'आय लव मोहम्मद' (I Love Mohammad Banner) असा बोर्ड लावल्याने निर्माण झालेल्या वादाची ठिणगी अहमदपूर येथे ही पोहोचली. या घटनेच्या निषेधार्थ अहमदपूर येथिल नगर परीषद टिपू सुलतान स्मारक मैदानात सकल मुस्लीम बांधवांच्या वतीने आयोजित निषेध रॅलीत 'आय लव मोहम्मद' असे बॅनर व फलक झळकावून धार्मिक भावना व्यक्त करण्यात आल्या. शहरातील टिपू सुलतान चौकात जमलेला जमाव घोषणाबाजी करत निघाला. रॅलीत तरुण, ज्येष्ठ नागरिकांचा मोठ्या संख्येने सहभाग होता. सर्वांच्या हातात 'आय लव मोहम्मद' अशी लिखाण असलेली पोस्टर्स होती. रॅलीदरम्यान जमावाने आपल्या भावना व्यक्त करणाऱ्या घोषणा दिल्या. त्यांनी कानपूरमध्ये घडलेल्या प्रकाराचा तीव्र निषेध नोंदवत तो तातडीने थांबवला पाहिजे, अशी मागणी केली. रॅलीत स्थानिक मुस्लिम संघटनांचे पदाधिकारी, विविध सामाजिक कार्यकर्ते, स्वयंसेवक आणि धार्मिक नेते मोठ्या संख्येने उपस्थित होते. या सर्वांनी एकमुखाने, धार्मिक भावना दुखावणारी




कोणतीही कृती सहन केली जाणार नाही, असा इशारा दिला. तसेच, अशा प्रकारांना आळा बसवण्यासाठी प्रशासनाने ठोस कारवाई करावी, अशी मागणी तहसीलदार यांच्या मार्फत मुख्यमंत्री यांना केली. उपस्थित मान्यवरांनी समाजातील सौहार्द टिकवण्याचे आवाहनही केले.मोठ्या प्रमाणावर जमलेल्या गर्दीमुळे पोलिसांनीही सुरक्षा व्यवस्था कडक केली होती. अहमदपूर पोलीस ठाण्यांतील अधिकारी व कर्मचारी घटनास्थळी तैनात होते. रॅलीदरम्यान कोणताही अनुचित प्रकार घडू नये, यासाठी पोलिसांनी विशेष खबरदारी घेतली. संपूर्ण परिसरात पोलीस फौजफाटा मोठ्या प्रमाणावर तैनात असल्याचे दृश्य पाहायला मिळाले.दरम्यान, स्थानिक रहिवाशांच्या म्हणण्यानुसार, रॅली शिस्तबद्ध पद्धतीने पार पडली. गर्दी असूनही कुठेही गोंधळ किंवा अराजकता झाली नाही. पोलिसांचा सजग बंदोबस्त असल्यामुळे रॅली शांततेत पार पडली. कानपूरमध्ये घडलेल्या घटनेबाबत धार्मिक नेत्यांनी कठोर शब्दांत निषेध नोंदवला असून, भविष्यात अशा घटनांची पुनरावृत्ती होऊ नये यासाठी प्रशासनाने ठोस उपाययोजना कराव्यात, असे मत त्यांनी व्यक्त केले. तसेच लोकांच्या धार्मिक भावना जपण्यासाठी सर्वांनी जबाबदारीने वर्तन करणे आवश्यक असल्याचे आवाहन करण्यात आले.

# भारतीय जनता पार्टीचा देवणी नगरपंचायतीसमोर आंदोलनाचा इशारा

**देवणी : वार्ताहर**



देवणी शहरांमध्ये अतिवृष्टी झाल्यामुळे ठिकठिकाणी खराब पाणी थांबल्यामुळे व घाणीचे साम्राज्य पसरल्यामुळे देवणी शहरातील आरोग्य हे धोक्यात आलेले दिसून येत आहे ही सततच्या पावसामुळे साथीच्या रोगाने नागरिक व बालक त्रस्त असलेले दिसून येत आहेत व आरोग्याच्या काळजीपोटी देवणी शहरात मच्छर जास्त प्रमाणात वाढल्याने सर्दी, ताप, खोकला, कावीळ, डेंग्यू टायफाईड सारखे आजाराचे प्रमाण वाढले आहे शहरात फॉगिंग मशीन ने निर्जतुकीकरण करून घ्यावे असे निवेदन भारतीय जनता पार्टी तर्फे देण्यात आले आहे तसेच देवणी शहरात जे दिव्यांग बांधव आहेत त्यांना नगरपंचायत च्या रकमेच्या पाच टक्के रक्कम मानधन म्हणून देणे बंधनकारक आहे एकंदरीत गेल्या तीन वर्षे झाले त्या दिव्यांग बांधवांना कसल्याच प्रकारचा निधी नगरपंचायतने दिलेला नसून तो निधी तात्काळ द्यावे अन्यथा येणाऱ्या काळात देवणी नगरपंचायत कार्यालयासमोर भारतीय जनता पार्टीच्या वतीने आंदोलन उपोषण करण्यात येईल असा इशारा निवेदनात देण्यात आला या निवेदनावर बालाजी सूर्यवंशी, अमर पाटील, मनोहर पटने, रमेश मन्सुरे, वैजनाथ आस्टुरे, ईश्वर पाटील यांच्या सह अनेकांच्या स्वाक्षरी आहेत.

# लातुरात अग्रसेन जयंती विविध उपक्रमांनी उत्साहात साजरी



**लातूर : वार्ताहर**

प्रतिवर्षाप्रमाणे यावर्षीही लातुरात समस्त अग्र कुटुंबाच्या वतीने महाराजा अग्रसेन जयंती विविध सामाजिक, सांस्कृतिक उपक्रमांनी उत्साहपूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली. लातूर शहरातील महाराजा अग्रसेन भवन याठिकाणी सोमवारी सकाळी दिनेशचंद्र ब्रिजवासी यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. याप्रसंगी अग्रवाल समाज ट्रस्ट चे अध्यक्ष नंदकिशोर अग्रवाल, कमलकिशोर अग्रवाल, अशोक अग्रवाल, विशाल अग्रवाल, आनंद अग्रवाल यांच्यासह अग्रवाल समाजातील सर्व मान्यवरांची उपस्थिती होती. ध्वजारोहणानंतर आयोजित करण्यात आलेल्या रक्तदान शिबिरात ३१ जणांनी ऐच्छिक रक्तदान केले. अग्रसेन जयंतीच्या पार्श्वभूमीवर विविध स्पर्धाही घेण्यात आल्या. त्यामध्ये दांडिया, क्रिकेट, स्लो सायकल- स्कुटर, नृत्य स्पर्धा, फॅन्सी ड्रेस स्पर्धांचा समावेश होता. तर सायंकाळी मान्यवरांच्या उपस्थितीत सांस्कृतिक कार्यक्रम पार पडला. सायंकाळी सीए संजय अग्रवाल, पुनित मित्तल, नंदकिशोर अग्रवाल यांच्या हस्ते आरती करण्यात आली.

यावेळी आयोजित समारोहात आपले मनोगत व्यक्त करताना सीए संजय अग्रवाल यांनी कोणत्याही परिस्थितीत समाज संघटित होणे अतिशय गरजेचे असल्याचे सांगितले. तुमच्याकडे कितीही मुबलक पैसे असू द्या, जर तुमचा समाजच संघटित नसेल तर त्या पैशाचा काहीही उपयोग नाही. समाजाच्या अडीअडचणी समजण्यासाठी समाजात एकरूप होणे, समाजाच्या प्रत्येक उपक्रमात हिरीरीने सहभागी होणे आवश्यक असते. ज्या समाज बांधवाला अडचण, समस्या आहे, त्याची अडचण-समस्या सोडविण्याची जबाबदारी समाजाचा एक महत्वपूर्ण घटक म्हणून आपणा सर्वांची असल्याचे त्यांनी सांगितले. आज सगळे जग धावपळीचे झाले आहे. घरातील प्रत्येक व्यक्ती - सदस्यही आपल्या कामात व्यस्त असतात. अशावेळी तुम्ही कितीही व्यस्त असलात तरी घरात सगळे एकत्रित येऊन चर्चा करा. आपल्या मुलांवर चांगले संस्कार करा. सुसंस्कारीत पिढीच समाजाला उद्या दिशा देऊ शकणार आहे. मुलांच्या अभ्यासातील कमी-अधिक गुणांकडे फारसे गांभीर्याने न पाहता संस्काराला अधिक महत्व द्या असे आवाहनही संजय अग्रवाल यांनी केले. अशोक अग्रवाल यांनी यावेळी प्रास्ताविक केले. प्रास्ताविकात त्यांनी अग्रवाल समाज सर्वच क्षेत्रात अग्रेसर असल्याचे नमूद केले. देशात विविध उपक्रमांनी आज अग्रसेन जयंती साजरी केली जात आहे. लातूरातही जोरदार पाऊस चालू असतानाही समाज बांधव मोठ्या संख्येने या उपक्रमात सहभागी झाले आहेत, ही बाब समाज संघटित होत असल्याचे लक्षण असल्याचेही त्यांनी सांगितले. नंदकिशोर अग्रवाल यांनीही आपल्या मनोगतात समाज संघटनावर भर दिला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राहुल अग्रवाल आणि अनुराधा अग्रवाल यांनी केले. तर आभार प्रदर्शन कमलकिशोर अग्रवाल यांनी केले. कार्यक्रमास विनोद अग्रवाल. सुरेंद्र अग्रवाल, आनंद अग्रवाल, नितीन अग्रवाल, विपीन अग्रवाल, महेश अग्रवाल, रवी अग्रवाल, प्रवीण अग्रवाल, रोहित अग्रवाल, उमेश अग्रवाल, श्यामसुंदर अग्रवाल, हेमा अग्रवाल, ममता अग्रवाल, नितु ब्रिजवासी, रितू ब्रिजवासी, नीता अग्रवाल, सुमन पोद्दार, मोना बन्सल, रचना ब्रिजवासी, वंदना ब्रिजवासी, ओम पोद्दार, निलेश पोद्दार यांसह समाज बांधवांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी अग्रवाल समाज ट्रस्ट, अग्रवाल समाज, अग्रवाल महिला मंडल आणि अग्रवाल नवयुवक मंडळाच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# 'स्वस्थ नारी, सशक्त परिवार' अभियानांतर्गत विशेष आरोग्य तपासणी शिबिर



**सोलापूर : प्रतिनिधी**

आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालयाच्या वतीने 'स्वस्थ नारी, सशक्त परिवार' या विशेष राष्ट्रीय अभियानाची सुरुवात १६ सप्टेंबरपासून करण्यात आली आहे. या अभियानाच्या अनुषंगाने अक्कलकोट तालुक्यातील जेऊर येथील प्राथमिक आरोग्य केंद्र आणि उपकेंद्र कडबगाव येथे किशोरवयीन मुली, बालके आणि महिलांसाठी विशेष आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिरात पोषण संवाद, विविध आजारांची तपासणी, समुपदेशन आणि बेबी केअर किटचे वाटप करण्यात आले. तालुका आरोग्य अधिकारी, एकात्मिक बाल विकास सेवा योजना आणि केंद्रीय संचार ब्युरो सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने हे उपक्रम राबवण्यात आले. शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी जेऊर ग्रामपंचायतचे उपसरपंच काशिनाथ पाटील, कडबगावचे सरपंच शिवलीला पाटील, क्षेत्रीय प्रचार सहायक अंबादास यादव, अंगणवाडी पर्यवेक्षिका भाग्यश्री कुलकर्णी, प्रज्ञा मोरे आणि कार्यालय सहायक जे.एम.हन्नुरे उपस्थित होते. केंद्रीय संचार ब्युरोचे अंबादास यादव यांनी पंतप्रधान मातृत्व वंदन योजना, लसीकरण, पोषण अभियान, सुकन्या समृद्धी योजना आणि उज्ज्वला गॅस योजना यांची माहिती दिली. यावेळी १२ अंगणवाडी केंद्रांच्या माध्यमातून गरोदर आणि स्तनदा मातांना बेबी केअर किटचे वाटप करण्यात आले. तसेच कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया केलेल्या कुटुंबांचा सन्मान करण्यात आला. सुदृढ बालकांना गौरविण्यात आले. सेविका आणि मदतनीस यांनी घरगुती धान्यांपासून पोषक आहाराची प्रात्यक्षिके सादर केली. उत्कृष्ट मांडणी करणाऱ्या सेविका व मदतनीस यांना पारितोषिके देण्यात आली. पोषण मूल्याची माहिती देण्यासाठी 'पोषण गुढी' उभारण्यात आली. सदर आरोग्य तपासणी तालुका आरोग्य अधिकारी डॉ अश्विन करजखेडे, वैद्यकीय अधिकारी डॉ गजानन मरकड, समुदाय आरोग्य अधिकारी डॉ.भाग्यश्री राऊत, डॉ सुरेखा बिराजदार यांच्या वतीने करण्यात आले.

# २ ऑक्टोंबरला वसईत सुवार्ता साहित्य मेळाव्याचे आयोजन

**वसई : वार्ताहर**

सुवार्ता मासिक हे वसई धर्मप्रांताचे अधिकृत मुखपत्र आहे. मागील सात दशके हे नियतकालिक नियमित प्रकाशित केले जाते. या मासिकातर्फे दरवर्षी सुवार्ता साहित्य मेळावा आयोजित केला जातो. सुवार्ता साहित्य मेळाव्याचे हे ४४वे वर्ष आहे. सालाबादप्रमाणे याही वर्षी गुरुवार दिनांक २ ऑक्टोबर २०२५ रोजी कृपामाता सभागृह, पापडी येथे सकाळी ८.३० ते दुपारी १२.३० पर्यंत सुवार्ता साहित्य मेळाव्याचे आयोजन केले आहे. याप्रसंगी 'व्यसनांच्या विळख्यांतील विश्व' या विषयावर लेखिका आणि माध्यम अभ्यासक मुक्ता चैतन्य वाचकांशी संवाद साधतील. तसेच बण्डा जोशी यांचा 'हास्यपंचमी' हा विनोदी कार्यक्रम सादर केला जाईल. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी वसई धर्मप्रांताचे मेंढपाळ बिशप थॉमस डिसोजा असतील. सदरहू प्रसंगी पुस्तकाचे प्रकाशनही केले जाईल. हा कार्यक्रम सर्व रसिक श्रोत्यांसाठी खुला आहे. अधिक माहितीसाठी 'सुवार्ता' कार्यालय ९३०२०९०२३१ किंवा suvartavasaigmail.com या ईमेलवर संपर्क साधावा असे आयोजकांकडून माहिती देण्यात आली आहे.

# वाडा येथे 'नमो युवा रन फॉर नशा मुक्त भारत' रॅलीत विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग




**वाडा : वार्ताहर**

भाजप युवा मोर्चाच्या वतीने 'नमो युवा रन फॉर नशा मुक्त भारत' या उपक्रमांतर्गत वाडा शहरात भव्य रॅलीचे आयोजन करण्यात आले. या रॅलीत स्वामी विवेकानंद विद्या मंदिरच्या शेकडो विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. रॅलीदरम्यान विद्यार्थ्यांनी विविध घोषवाक्ये देत नशामुक्तीचा संदेश दिला. जब युवा जागता है, तो पूरा भारत बदलता है अशा संदेशफलकांद्वारे समाजात जनजागृती घडविण्यात आली. शहरातील प्रमुख मार्गावरून निघालेल्या या रॅलीत मोठ्या प्रमाणात नागरिकांनीही सहभाग घेत विद्यार्थ्यांचे कौतुक केले. या उपक्रमामुळे तरुण पिढीमध्ये व्यसनमुक्तीबाबत जागरूकता निर्माण होण्यास मदत होणार असल्याचे भाजप युवा मोर्चाचे जिल्हा सरचिटणीस कुणाल साळवी यांनी सांगितले.

29 SEPTEMBER TO 05 OCTOBER 2025 - Page 8 (CRIME SANDHYA):Layout 1 9/27/2025 10:08 PM Page 1



## विरार पूर्वेतील नवरात्रोत्सव : पर्यावरणपूरक मूर्ती प्रतिष्ठापना आणि भव्य अष्टमी महाप्रसाद सोहळा



**विरार : वार्ताहर**

यावर्षी नवरात्र हिमगिरी टॉवर रोड, विरार पूर्व येथील मनवेल पाडा येथे भव्य पद्धतीने साजरी केली जात आहे. श्री साई श्रद्धा मित्र मंडळाने आयोजित केलेल्या या उत्सवात पर्यावरणाची विशेष काळजी घेतली आहे. मंडळाने नऊ दिवसांत फक्त मूर्ती प्रतिष्ठापना, होम-हवन, आरती आणि धार्मिक कार्यक्रम आयोजित करण्याचा निर्णय घेतला आहे. अष्टमीला महाप्रसाद भंडारा आयोजित केला जाईल, ज्यामध्ये चार हजारांहून अधिक भाविक उपस्थित राहतील अशी अपेक्षा आहे. विरार पोलिस स्टेशनने जारी केलेल्या नियम आणि मार्गदर्शक तत्त्वांचे पालन करणे हे मंडळाचे प्राधान्य आहे. सामाजिक जबाबदारी आणि कायदा आणि सुव्यवस्था लक्षात घेऊन हा कार्यक्रम आयोजित केला जात असल्याचे आयोजकांचे म्हणणे आहे. नवरात्रोत्सवा दरम्यान दररोज विशेष आरत्या केल्या जातील आणि धार्मिक विधी भक्तिमय वातावरणात केले जातील असे मंडळाने सांगितले. भाविकांच्या सोयीसाठी आणि सुरक्षिततेसाठी देखील विशेष व्यवस्था करण्यात आली आहे. या प्रसंगी पप्पू गुप्ता, अरविंद भालेकर, रवी भालेकर आणि श्री साई श्रद्धा मित्र मंडळाचे संस्थापक यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते आणि त्यांनी भाविकांना संबोधित केले. मंडळाच्या अधिकाऱ्यांनी भाविकांना नवरात्रीच्या या पवित्र उत्सवात मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आणि धार्मिक आणि सांस्कृतिक वातावरणाचा भाग होण्याचे आवाहन केले.

## स्थानिक पातळीवर समस्याचे निराकरण करण्यात येणार -पालकमंत्री गणेश नाईक



**पालघर : वार्ताहर**

जिल्ह्यातील नागरिकांना आपल्या समस्या सोडवण्यासाठी वरिष्ठ स्तरावर जाण्याची आवश्यकता नाही स्थानिक पातळीवर समस्याचे निराकरण करण्यासाठी या जनता दरबाराचे आयोजन करण्यात आले असल्याचे प्रतिपादन वनमंत्री तथा पालघर जिल्ह्याचे पालकमंत्री गणेश नाईक यांनी केले. विक्रमगड येथे जनता दरबाराचे आयोजन करण्यात आले होते. या जनता दरबारामध्ये नागरिकांनी उस्फुर्त प्रतिसाद दिला. यावेळी आमदार हरिश्चंद्र भोये, जिल्हाधिकारी डॉ.इंदु राणी जाखड, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मनोज रानडे, पोलीस अधीक्षक यतीश देशमुख, अपर जिल्हाधिकारी भाऊसाहेब फटांगरे, सहाय्यक जिल्हाधिकारी अपूर्वा बासूर, विशाल खत्री, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी रवींद्र शिंदे, पालकमंत्री यांचे विशेष कार्य अधिकारी भवानजी आगे पाटील, जव्हार, उपवनसंरक्षक सैपुन शेख, डहाणू, उपवनसंरक्षक निरंजन दिवाकर, विश्वनाथ पाटील, तसेच वरिष्ठ अधिकारी आणि नागरिक उपस्थित होते. पालकमंत्री गणेश नाईक यांनी विक्रमगड येथे आयोजित जनता दरबारात नागरिकांशी संवाद साधताना स्पष्ट केले की मागील काही वर्षात मध्ये विकास कामाबाबतीत अनियमित्ता झाल्याच्या काही तक्रारी प्राप्त झाल्या असून या तक्रारी बाबत माहिती घेऊन सर्व कामांची चौकशी करण्यात येईल अनियमित्ता आढळून आल्यास योग्य ती कारवाई करण्यात येईल. या जनता दरबारात जवळपास १७० निवेदन प्राप्त झाले या मध्ये. रस्ते, वीजपुरवठा, पाणी, शिक्षण व्यवस्था, शाळांची पडझड, आरोग्य सेवा, जमीन अधिग्रहण व मोबदला यासारख्या प्रश्नांवर नागरिकांनी आपल्या समस्या मांडल्या असल्याचे पालकमंत्री गणेश नाईक यांनी सांगितले. पालघर जिल्ह्यामध्ये १ कोटी झाडे लावण्यात येणार, बाबू लागवडी मध्ये जिल्हा प्रगतीपथावर आहे. लोकप्रतिनिधी आणि प्रशासन या बाबतीत समन्वयाने काम करणार आहे. जिल्ह्यामध्ये विकास कामासाठी सर्व विभागांना योग्य निधी वाटप करून तातडीने विकास कामे राबवली जाणार आहेत. कोणत्याही प्रकारचा भेदभाव न करता सर्वसामान्य माणसाच्या अडचणी सोडवणे ही शासनाची भूमिका आहे. ग्रामविकास, वनहक्क, जमीन मोबदला, टॉवर व गॅस पाईपलाईन प्रकरणांमध्ये शेतकऱ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी विशेष लक्ष दिले जाईल. पावसाची परिस्थिती पाहता आरोग्य केंद्रांत आवश्यक औषधसाठा उपलब्ध असावा, शाळांमध्ये अपघात टाळण्यासाठी सुरक्षिततेची काळजी घ्यावी जिल्ह्यातील नादुरुस्त रस्त्यांच्या कामाला गती द्यावी असे निर्देश पालकमंत्री गणेश नाईक यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले.

## 'प्रहार'चा देवणी तहसील कार्यालयावर जनआक्रोश मोर्चा



**देवणी : वार्ताहर**

तालुक्यात उदभवलेली नैसर्गिक आपत्तीत, वलांडी बाजारपेठेतील अतिक्रमण, सांगायो, निराधारचे रखडलेले मानधन, शेत रस्त्यांना क्रमांक द्यावा या चार मुख्य मागण्यांसाठी प्रहार जनशक्ती पक्षाच्या वतीने देवणी तहसिल कार्यालयावर जन आक्रोश मोर्चा काढण्यात आला. तालुक्यातील बहुतांश लाभार्थी या मोर्चात सहभागी झाल्याने तहसिलच्या प्रांगणात तक्रारींचा सुर उमटला.

यावेळी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, सिमा भागातील मुख्य बाजारपेठ असलेल्या वलांडी बाजारपेठत अनेकांनी रस्त्यावर अतिक्रमण केल्याने वाहतुकीस अडथळा निर्माण होत आहे.ते अतिक्रमण तात्काळ हटवुन रस्ता खुला करावा, तालुक्यातील संजय गांधी निराधार योजना, श्रावण बाळ योजना, राष्ट्रीय वृध्पकाळ योजना व इतर योजनेचे रखडलेले मानधन जाचक अटी रद्द करुन लाभार्थ्याच्या बँक खात्यात जमा करावे, तसेच नुकतेच झालेल्या अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांच्या शेतातील पिकांची नासाडी झाल्याने शेतकऱ्यांचे अर्थकारण पाण्यात बुडाले आहे. शासनाने इ पिक पहाणी सारख्या जाचक अटी रद्द करुन सरसकट नुकसान भरपाई द्यावी अशी मागणी तालुकाध्यक्ष ज्ञानेश्वर भोसले बोंबळीकर यांनी केली. शिवाय योजनेचा लाभ देण्यासाठी अधिकारी व कर्मचारी पैशाची मागणी करत असल्याचा आरोपही यावेळी केला. तहसीलदार सोमनाथ वाडकर यांनी आंदोलनकर्त्यांना त्यांच्या मागण्याचा निपटारा लवकर करण्याचे आश्वासन दिले. या आठवड्यात मागण्या मान्य न झाल्यास पुन्हा आंदोलन करण्याचा इशारा प्रहारच्या वतीने देण्यात दिलेल्या निवेदनात केली आहे. यावेळी तहसिलदार सोमनाथ वाडकर यांना निवेदन सादर करण्यात आले. निवेदनावर प्रहार जनशक्ती पक्षाचे तालुकाध्यक्ष ज्ञानेश्वर भोसले बोंबळीकर, जिल्हा उपाध्यक्ष विनोद तेलंगे, उदगीर तालुकाध्यक्ष रवींद्र बेळकोंदे, कामगार आघाडीचे तालुकाध्यक्ष अंतेश्वर सुर्यवंशी, महिला आघाडीच्या मनिषा पाचंगे, मुकेश कांबळे, कृष्णा इंगोले, बालाजी सावरगावे आदीसह कार्यकर्ते लाभार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## नैसर्गिक संकटातील शेतकऱ्यांना कर्जमुक्त करा -उद्धव ठाकरे



**औसा : वार्ताहर**

मराठवाड्यातील अतिवृष्टीने नुकसानग्रस्त झालेल्या शेतकऱ्यांशी संवाद करताना शिवसेनाप्रमुख उद्धव बाळासाहेब ठाकरे यांनी नैसर्गिक संकटातील शेतकऱ्यांना कर्जमुक्त करा अशी मागणी सरकारकडे केली आहे. दरम्यान संपूर्ण मराठवाड्यामध्ये मागील पंधरा दिवसापासून अतिवृष्टीने कहर केला असून शेतकऱ्यांच्या खरीप पिकाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. अनेक ठिकाणी जीवित व वित्तहानी झाली असून शेतकऱ्यांच्या जमिनी पावसाने खरडून गेल्या आहेत. शेतकऱ्यांच्या शेतात पीकही नाही आणि मातीही नाही अशा दैनिया अवस्थेत सापडलेला शेतकऱ्याला उभारी घेणे शक्य नसल्याने राज्यातील शेतकऱ्यांचा सातबारा कोरा करून शेतकऱ्यांना कर्जातून मुक्त करावे अशी मागणी उद्धव बाळासाहेब ठाकरे यांनी केली. दिनांक २५ सप्टेंबर रोजी लातूर तालुक्यातील काटगाव येथील दुष्काळग्रस्त व अतिवृष्टी ग्रस्त भागाची पाहणी करताना शेतकऱ्यांशी संवाद साधताना ते बोलत होते. माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यावेळी बोलताना पुढे म्हणाले की अतिवृष्टीच्या संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना दोन हजार कोटी रुपयांची तरतूद केली असून प्रतिहेक्टरी आठ हजार पाचशे रुपये देण्यात येत असलेले आर्थिक मदत अतिशय तोकडी आहे इतक्या तुटपुंज्या रकमेमध्ये शेतकऱ्यांच्या शेतीची दुरुस्ती ही करता येणार नाही नैसर्गिक आपत्तीमुळे शेतकरी संपूर्णतः कोलमडला असून संपूर्ण खरीप हंगाम वाया गेल्याने शेतकरी हवालदील झाला आहे. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अतिवृष्टीने नुकसान झालेल्या मराठवाड्यातील शेतकरी व सामान्य जनतेची अडचण व गांभीर्य लक्षात घेऊन जास्तीत जास्त मदत करावी आणि शेतकऱ्यांना कर्जमुक्त करावे असे शेवटी स्पष्ट केले. अतिवृष्टी ग्रस्त भागाची पाहणी करीत असताना त्यांच्यासोबत शिवसेना नेते माजी खासदार चंद्रकांत खैरे धाराशिव मतदारसंघाचे खासदार ओम प्रकाश निंबाळकर शिवसेनेचे जिल्हाप्रमुख संतोष सोमवंशी यांच्यासह उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेनेचे ...पान ६ वर

## 'स्वस्थ नारी सशक्त परिवार' अभियानांतर्गत प्राथमिक आरोग्य केंद्र सोमटा येथे आरोग्य शिबिर



**पालघर : वार्ताहर**

प्राथमिक आरोग्य केंद्र सोमटा येथे स्वस्थ नारी-सशक्त परिवार अभियानांतर्गत भव्य आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिराचे उद्घाटन माजी आरोग्यमंत्री तथा अध्यक्ष, कुपोषणमुक्त महाराष्ट्र टास्क फोर्स मा. डॉ. दीपक सावंत यांच्या हस्ते करण्यात आले. शिबिराला उपस्थित मान्यवरांमध्ये डॉ. आशिष भारती (उपसंचालक, आरोग्य सेवा, पुणे), डॉ. सुहास माने (सहसंचालक, वैद्यकीय उपसंचालक कार्यालय, ठाणे), डॉ. रामदास मराड (जिल्हा शल्यचिकित्सक, जिल्हा रुग्णालय पालघर), डॉ. संतोष चौधरी (जिल्हा आरोग्य अधिकारी, जि.प. पालघर), व्यंकटराव हुंडेकर (जिल्हा कार्यक्रम अधिकारी, महिला व बालविकास), डॉ. शशिकांत साळुंखे (सहाय्यक जिल्हा आरोग्य अधिकारी, जि.प. पालघर), डॉ. तनवीर शेख (तालुका आरोग्य अधिकारी, पंचायत समिती पालघर), डॉ. पूजा सावंत (वैद्यकीय अधिकारी, प्रा.आ.केंद्र सोमटा) आदींचा समावेश होता. शिबिरात महिलांसाठी उच्च रक्तदाब, मधुमेह, मुखाचा, स्तन व गर्भाशयाचा कर्करोग यांची तपासणी करण्यात आली. क्षयरोग व रक्तक्षय तपासणीबरोबरच किशोरवयीन मुलींना समुपदेशन देण्यात आले. तसेच सिकल सेल तपासणी, कार्ड वाटप व मार्गदर्शन करण्यात आले. गरोदर मातांची हिमोग्लोबिन तपासणी, आहार विषयक मार्गदर्शन, माता-बाल संगोपन कार्ड वाटप व लसीकरण सेवा पुरवण्यात आल्या.... पान ६ वर

## गणेश नाईक यांची राष्ट्रीय पोषण महाअभियान आणि स्वस्थ नारी सुरक्षित परिवार अभियानाला दिली भेट



**पालघर : वार्ताहर**

पालकमंत्री गणेश नाईक यांनी विक्रमगड पंचायत समितीमध्ये अंगणवाडी सेविका व अंगणवाडी पर्यवेक्षकांनी स्थानिक धान्यापासुन बनवलेल्या पोषण आहाराच्या स्टॉलला व आरोग्य तपासणी शिबिराला भेट दिली. यावेळी जिल्हाधिकारी डॉ. इंदु राणी जाखड, जिल्हा परिषदेचे मुख कार्यकारी अधिकारी मनोज रानडे, पालकमंत्री यांचे विशेष कार्यकारी अधिकारी, भवानजी आगे पाटील आदी वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. अंगणवाडी सेविकांनी स्थानिक विविध जातीच्या रानभाज्या, धान्य, वनौषधी पासुन बनवलेल्या पोषण आहाराच्या पदार्थांच्या स्टॉलला पालकमंत्री गणेश नाईक यांनी भेट देऊन पौष्टिक पदार्थांचा आस्वाद घेतला. एकात्मिक बालविकास प्रकल्प योजनेच्या १५० अंगणवाडी सेविका व ...पान ६ वर

## वाडा नगरपंचायतीच्या करवाढीविरोधात महाविकास आघाडीचे निवेदन



**वाडा : वार्ताहर**

नव्याने स्थापन झालेल्या वाडा नगरपंचायत हद्दीतील निवासी व व्यावसायिक मालमत्तांवरील सुधारित कर आकारणी अन्यायकारक असल्याचे सांगत महाविकास आघाडीने नगरपंचायत प्रशासनाकडे निवेदन सादर केले आहे. सध्या नगरपंचायत कार्यालयामार्फत कर आकारणीच्या नोटीसी वाटपाला सुरुवात झाली असून, त्यात निवासी व व्यापारी मालमत्तांवर मालमत्ता कर, दिवाबत्ती करासह वृक्ष कर, शिक्षण कर, रोजगार हमी उपकर, अग्नीशमन, उपयोगकर्ता कर अशा विविध करांची अवाढव्य वाढ झाल्याचे निदर्शनास आले आहे. या अचानक झालेल्या करवाढीमुळे नागरिक व व्यापारी वर्ग हवालदिल झाल्याचे निवेदनात म्हटले आहे. महाविकास आघाडीने नमूद केले की, वाडा नगरपंचायत ही नव्याने स्थापन झालेली व दुय्यम दर्जाची नगरपंचायत आहे. येथील ग्रामीण पार्श्वभूमी आणि नागरिकांची आर्थिक परिस्थिती पाहता अशा प्रकारची करवाढ परवडणारी नाही. त्यामुळे या वाढीचा पुनर्विचार करून करवाढ शिथिल करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. तसेच नागरिकांच्या संतप्त भावनांचा विचार करून दि. २ ऑक्टोबर २०२५ पर्यत योग्य निर्णय न घेतल्यास दि. ६ ऑक्टोबर २०२५ रोजी महाविकास आघाडीच्या वतीने नगरपंचायत कार्यालयासमोर तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही देण्यात आला आहे. या आंदोलनातून उद्भवणाऱ्या परिस्थितीस... पान ६ वर

## भिवंडी वाडा रस्त्याच्या दुरावस्थेला शिंदे सेनेचे उपनेते जबाबदार

### सामाजिक कार्यकर्ते प्रमोद पवार यांचा पत्रकार परिषदेत आरोप




**भिवंडी: वार्ताहर**

भिवंडी वाडा रस्त्याची प्रचंड दुरावस्था झाली असून या रस्त्याच्या दुरावस्थेला व अपघाती मृत्यूंना शिंदे सेनेचे उपनेते निलेश सांबरे हेच जबाबदार आहेत असा आरोप भिवंडी वाडा रस्ता जन आंदोलन समितीचे निमंत्रक व सामाजिक कार्यकर्ते प्रमोद पवार यांनी शुक्रवारी घेतलेल्या पत्रकार परिषदेत केला आहे. भिवंडी वाडा रस्त्याच्या दुरुस्तीसाठी शिंदे सेनेचे उपनेते निलेश सांबरे यांच्या जिजाऊ कन्स्ट्रक्शन कंपनीने रस्त्याच्या दुरुस्तीच्या नावाखाली अधिकाऱ्यांशी साटेलोटे करून कोट्यावधी रुपयांचा निधी लाटला असल्याचा आरोप देखील यावेळी पवार यांनी केला असून भिवंडी वाडा रस्ता सध्या मृत्यूचा सापळा बनला असून या रस्त्यावर आतापर्यत शासकीय रेकॉर्ड नुसार ८८ जणांच्या मृत्यूची नोंद असली तरी प्रत्यक्षात ६०० हुन अधिक नागरिकांचा मृत्यू या रस्त्यावर झाला असून या दुरुस्ती कामात मोठा भ्रष्टाचार झाला असून शासनाचे लक्ष वेधण्यासाठी ३० सप्टेंबर रोजी अंबाडी नाका येथे आमरण उपोषण करत असल्याची माहिती प्रमोद पवार यांनी या पत्रकार परिषदेत दिली. यावेळी जन आंदोलन समितीचे सुनील लोणे, असगर पटेल, रुपेश जाधव, कल्पेश उर्फ बाळू जाधव, मिलिंद कांबळे, भूषण घोडविंदे, सुशांत चौधरी, मुकेश जोशी उपस्थित होते. या दुरुस्ती कामांची श्वेत पत्रिका काढावी, बेजबाबदार ...पान ६ वर

## उत्तर प्रदेशातील कानपुर व शहाजानपूर येथील घटनेच्या निषेधार्थ देवणीत सकल मुस्लिम समाजाचा भव्य मोर्चा!



**देवणी : वार्ताहर**

उत्तर प्रदेशातील कानपुर व शहाजानपूर येथे घडलेल्या धर्मभावना दुखावनाऱ्या घटनांच्या निषेधार्थ, शुक्रवारी देवणी येथील समस्त मुस्लिम समाजाच्या वतीने निषेध नोंदवत मोर्चा काढण्यात आला. हा मोर्चा जामा मस्जिद मरकज, ते मुर्गी चौक येथून सुरू होऊन मुख्य निलंगा उदगीर राज्य मार्गावरील बोरोळ चौक येथे समारोप करण्यात आला. यावेळी देवणी तालुक्यातील मुस्लिम बांधवांनी सहभाग नोंदवून, शांततेच्या मार्गाने आपली श्रद्धा आणि निषेध व्यक्त केला. कानपूर येथील आय लव्ह मोहम्मद फलक प्रकरणात काही युवकांनी श्रद्धेने प्रेरित होऊन सार्वजनिक ठिकाणी फलक लावला होता. हा फलक पूर्णतः शांततामय आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या चौकटीत असतानाही त्यांच्यावर गंभीर स्वरूपाचे गुन्हें दाखल करण्यात आले. ही कृती संविधानातील धर्मस्वातंत्र्य आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा स्पष्ट भंग आहे शहाजानपूर येथे एका व्यक्तीने प्रेषित मोहम्मद (सल्लाल्लाह आलेय वसल्लम) यांच्याविरोधात अत्यंत द्वेषपूर्ण व अपमानास्पद वक्तव्य केल्यामुळे सामाजिक सलोखा आणि राष्ट्रीय एकात्मतेलाही धोका निर्माण झाला आहे महाराष्ट्रातील काही नेत्यांनी वारंवार मुस्लिम समाजाबद्दल द्वेषमूलक भाष्य ...पान ६ वर